

# इच्छापूर्ती

सौ. कुसुमताई नागनाथ नायकवडी



रशियाच्या दौऱ्यावरील सहप्रवाशांसह क्रांतीवीर श्री. नागनाथअण्णा नायकवडी व सौ. कुसुमताई नायकवडी

# इच्छापूर्ती

(प्रवासवर्णन)

**सौ. कुसुमताई नागनाथ नायकवडी**
बी.ए.,बी.एड.

माजी मुख्याध्यापिका,
जिजामाता विद्यालय, वाळवा, जि. सांगली

**इच्छापूर्ती** (प्रवासवर्णन)
**सौ. कुसुमताई नागनाथ नायकवडी**
बी.ए., बी.एड.
मु.पो.ता. वाळवा, जि. सांगली

**प्रकाशक**
**वैभव नागनाथ नायकवडी**
अध्यक्ष,
पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी
हुतात्मा किसन अहिर सह.साखर कारखाना लि.,
नागनाथअण्णानगर,वाळवे,ता.वाळवा,जि.सांगली
पिन-४१६३१३
फोन नं. ०२३४२ - २६७५३८/४१

**मुद्रक**
**श्री ऑफसेट प्रिंटर्स,** सांगली
फोन : २६२८००८

**प्रथमावृत्ती**
१८ एप्रिल १९९९ (अक्षय तृतीया)

**द्वितीयावृत्ती**
१५ जुलै २०२२

**किंमत** – रु. १००/-

# ✲ अर्पण पत्रिका ✲

**ज्यां**नी सुसंस्कार केले ते वडील कै. यशवंत गोविंद कदम व
आई कै. धोंडूबाई यशवंत कदम. तसेच ज्यांनी कर्तव्य म्हणून आधार दिला,
त्या सासूबाई कै. क्रांतिमाता लक्ष्मीबाई रामचंद्र नायकवडी,
दीर कै. शामराव रामचंद्र नायकवडी,
जाऊबाई श्रीमती हौसाबाई शामराव नायकवडी यांना भक्तीसह
आणि
**क्रां**तिवीर श्री. नागनाथ रामचंद्र नायकवडी व
वाळव्यातील तमाम शेतकरी व कामगार बंधू-बहिणी, कष्टकरी, शेतमजूर,
श्रमिक, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षकांना मनःपूर्वक, प्रेमपूर्वक.
आणि
**हु**तात्मा किसन अहिर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील,
क्रांतिसिंह नाना पाटील यांना सविनय
**न**वांकूर अर्पण !!!

**सौ. कुसुमताई नागनाथ नायकवडी**

# मनोगत

इवलंस!

माझ्या वाचक बंधू-भगिनींनो!

निर्मितीचा आनंद शब्दातीत असतो.

वाळवे जि. सांगली सारख्या खेडेगावात राहून सामान्य जीवन जगणारी मी एक सामान्य स्त्री. भाकरी करताना आकाशीच्या विमानाची घरघर कानावर आली की, स्वयंपाकघरातून धावत बाहेर येऊन अतृप्तपणे पाहत राहायची मी. अंर्तमनाला सांगायची, 'अशाच एका विमानात बसून उंच-उंच आकाशातून रशियाला जायचे आहे, पण कसे? अं हं! ते नाही माहित.'

अहो आश्चर्यम! श्री. नागनाथ नायकवडी रशियाला निघाले. 'मी येणार' असा हट्ट धरला. होकारार्थी उत्तर येत नव्हंत. मन अंधारात चाचपडत, ठेचाळत होतं. आशा-निराशेच्या भोवऱ्यात गरगरत होतं. त्यांचे कागदपत्र, पासपोर्ट सारं तयार झालं, पण माझ काय? भयाण असहाय्य अवस्था! पण काय झाले कोण जाणे! 'ह्यांनी' निरोप पाठवला मला, ''पैसे व फोटो तयार ठेव'' आनंदाला उधाण आले. पैसे, फोटो दिले. ''चराति चरतो भग:'' जो चालतो त्याला भाग्य लाभते असा पूर्वजांचा संकेत आहे, तसेच घडले. Where there is a will there is a way! जिथे तीव्र इच्छा आहे, तिथे मार्ग सापडतोच. रशिया दर्शनाची तीव्र इच्छा होती ती पूर्ण झाली. जे पाहिलं, अनुभवलं, ज्या भावना मनात उद्भवल्या, त्यांनाच शब्दरुप दिले. कल्पनेच्या हिंदोळ्यावर आरुढ होऊन स्वप्नराज्यात संचार केलेला नाही. प्रत्येक अक्षर वास्तव आणि सत्य आहे. मी जे ''याचि देही, याचि डोळा'' पाहिलं, ते माझ्या बंधुभगिनींनाही कळावे म्हणून Short but Sweet! संक्षिप्त पण मधुर प्रयत्न केलाय.

''केल्याने देशाटन, पंडितमैत्री सभेत संचार, शास्त्र-ज्ञान विलोकन, मनुजा, चातुर्य येतसे फार'' अगदी याच भावनेने प्रवास केलाय. हे शब्दरुप आपणा सर्व वाचकांसमोर सादर केलेय, आपणांस ते भावेल नि आपण दाद द्याल अशी अपेक्षा आहे. माझ्या प्रवासाचा व या लिखाणाचा राजकारणाशी अंशतःही संबंध नाही. सध्या रशियात होत असलेल्या राजकीय घडामोडीच्या अगोदर आम्ही प्रवास केला आहे.

**सौ. कुसुमताई नागनाथ नायकवडी**

# !! जीवनपट !!

## सौ. कुसुमताई नागनाथ नायकवडी

| | |
|---|---|
| दि. ९ एप्रिल १९३२ | – जन्म–बुरूंगवाडी–ब्रम्हानंदनगर, ता. तासगांव, जि. सांगली.<br>वडील – कै. यशवंत गोविंद कदम<br>आई – कै. धोंडूबाई यशवंत कदम |
| १९३८ ते १९४८ | – शिक्षण – मराठी मुलींची शाळा नं. १ मिरज,<br>५ वी ते १० वी पर्यंत ज्युबिली कन्याशाळा, मिरज.<br>लग्नानंतर ११ वी (S.S.C.) एस.एस.सी.–<br>मिरज हायस्कूल मिरज |
| १९४८–४९ | – छत्रपती शाहूराजांच्या करवीर नगरीत कोल्हापूर येथे ब्रॅच राजाराम हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री.अय्यर यांचे घरी जुन्या कपड्यावर, क्रांतिवीर श्री. नागनाथ रामचंद्र नायकवडी यांच्याशी शुभविवाह संपन्न. |
| १९४९ | – किर्लोस्करवाडी येथे श्री. नागनाथअण्णा नायकवडी यांना पकडले. |
| १९५६–५७ | – मोठ्या आजारातून सुटका |
| १९५७–५८ | – हिंदी विषय घेऊन राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर येथून बी.ए. पुणे विद्यापीठाची पदवी संपादन केली. श्री. प्रिन्स शिवाजी बोर्डिंगला राहून सर्व शिक्षण पूर्ण केले.<br>– जिजामाता विद्यालय वाळवे येथे<br>शिक्षिका म्हणून सेवेस सुरुवात.<br>– बी.एड. पदवी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून उत्तीर्ण. |

| | |
|---|---|
| १९६५ | – जिजामाता विद्यालय, वाळवे येथे मुख्याध्यापिकापदी नियुक्ती |
| १९७१ | – इस्लामपूर–वाळवे पक्का डांबरी करण्यासाठी साराबंदी चळवळीत सहभाग. |
| १९८१ | – हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि.वाळवे स्थापनेत सहभाग. |
| १९८८ | – वाळवे येथे तिसरे दलित–आदिवासी ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षा. |
| १९८९–९० | – क्रांतिवीर श्री. नागनाथ नायकवडी व सौ.कुसुमताई नायकवडी यांचा उभयतांचा रशिया दौरा यशस्वी. |
| १९९० | – मुख्याध्यापिका, जिजामाता विद्यालय, वाळवे. सेवानिवृत्त. |
| १९९२ | – सांगली जिल्हा परिषदेच्या सदस्या. |
| २५ फ़ेब्रु.१९९३ | – बाबरी मशीद पाडणाऱ्या जातीयवादी धर्मांध शक्तींच्या विरोधात राष्ट्रीय एकात्मतेची ८० किलोमीटरची मानवी साखळीत सहभाग. |
| २६ मे १९९३ | – किणी, जि.कोल्हापूर येथे भव्य परिषदेत शेतमजूर, कष्टकरी, शेतकरी संघटनेच्या स्थापनेत सहभाग. |
| ११ जुलै १९९३ | – समान पाणी वाटप होऊन दुष्काळ कायम हटविण्यासाठी आटपाडी येथे पाणी परिषदेत सहभाग. |

| | |
|---|---|
| ६ मे १९९४ | – पुणे विद्यापीठाला राजर्षी शाहू महाराजांचे नांव देण्याच्या मागणीत सहभाग. |
| ६ मे १९९५ | – शेतमजूर, कष्टकरी, शेतकरी संघटनेच्यावतीने १००० गावांत एकाचवेळी मनुस्मृतीचे सामुदायीक दहन करण्याच्या मोहिमेत सहभाग. |
| २६ जुलै १९९५ | – कृष्णाखोऱ्यातील पाण्याच्या हक्काचा समान वाटा मिळण्यासाठी सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील ८० हजार कष्टकरी स्त्री–पुरुषांची परिषद, आटपाडी यात सक्रीय सहभाग. |
| २८ नोव्हें.१९९५ | – शेतमजूर, कष्टकरी–शेतकरी स्त्री मेळावा सहभाग. |
| १९९६ | – 'इच्छापूर्ती' हे रशिया दौऱ्यावरील प्रवासवर्णनावरील पुस्तकाचे लेखन पूर्ण केले. |
| १० मार्च १९९७ | – क्रांतीज्योती विचारमंच सातारा तर्फे – सन्मानपत्र प्रदान |
| १४ जून १९९८ | – शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल कोल्हापूर येथे "डॉ. पतंगराव कदम पुरस्कार" देऊन भव्य सत्कार केला. |
| १७ जुलै २०१९ | – कुसूमताई नागनाथ नायकवडी अनंतात विलीन |

* * *

# प्रस्तावना. . . .

वाळव्याच्या भूमीने भारतीय स्वातंत्र्याची १९४२ ची चळवळ हिरीरीने लढली. वाळवा म्हटलं की क्रांतिवीर श्री. नागनाथअण्णा नायकवडी असं समीकरण झालं आहे. अनेक जय आणि विजय वाळव्याच्या मातीने पाहिले आहेत. १९५७ ची संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, साराबंदीची चळवळ, शेतीच्या पाण्याचा प्रश्न, रस्त्याचा प्रश्न, शेतकऱ्याच्या मालाचे भाव बांधून द्यावेत, आंदोलन असो, राष्ट्रीय शिक्षण प्रसाराची चळवळ, प्रौढ साक्षरतेची चळवळ यांच्याशी ऋणानुबंध आहे. क्रांतिमाता, क्रांतिवीरांगणा कै.लक्ष्मीबाई नायकवडी, क्रांतिवीर श्री.नागनाथअण्णा नायकवडी, सौ.कुसुमताई नागनाथ नायकवडी, यानंतर श्री.किरण नागनाथ नायकवडी, श्री.अरुण नागनाथ नायकवडी व श्री.वैभव नागनाथ नायकवडी अशा तीन पिढ्या नायकवडी कुटुंबाच्या आपणांस दिसतील की ज्या समाजासाठी सतत झटत आहेत. सर्व मराठी मुलखाला, मराठी मातीला अभिमान व स्वाभिमान वाटावा असे कार्य आहे. म.गांधी, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांचा वारसा जपणारे नायकवडी कुटुंबीय आहेत. वाळव्याचे नांव महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर झाले असले तरी सातासमुद्राच्या पलिकडे इंग्लडच्या संसदेतही उमटले आहे. वाळव्याचे क्रांतिवीर श्री. नागनाथअण्णा नायकवडी यांचे आचार-विचार व कार्य महाराष्ट्राच्या मराठी माणसांच्या घराघरांत जाऊन पोहोचलेले आहे.

१९८८ साली क्रांतिवीर श्री.नागनाथअण्णा व सौ.कुसुमताई नागनाथ नायकवडी हे उभयता सोव्हिएट रशियाच्या दौऱ्यावर जाऊन यशस्वीरित्या परत आले. त्याचे वर्णन, प्रवासाचे हुबेहुब दर्शन सौ. कुसुमताई नायकवडी यांनी केले आहे. त्यांना आम्ही 'माई' म्हणतो. शिक्षिका म्हणून आयुष्यभर त्यानी शिक्षणक्षेत्रात सेवा केली. उत्तम शिक्षिका, उत्तम गृहिणी आदर्श माता अशा भूमिका त्यांनी पार पाडल्या आहेत. त्यांची बऱ्याच वर्षाची रशियाला जायची इच्छा हाती. तीही

स्वखर्चाने. पगारातील पैशावरच. साठवून ठेवलेल्या पैशातूनच त्यानी रशियाचा दौरा पूर्ण केला. स्वावलंबी जीवन माई जगलेल्या आहेत. साधी राहणी, अस्सल भारतीय संस्कृतीच्या प्रतिक म्हणून माईचे उदाहरण सर्वांसमोर यायला हवे.

सावित्रीबाई फुले, कस्तुरबा गांधी, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, श्रीमती सुशिलाबाई बापूजी साळुंखे, वेणूताई यशवंतराव चव्हाण यांच्या सारखे सौ.कुसुमताई नागनाथ नायकवडी यांचे व्यक्तिमत्व विशाल आहे.

रशियाला जाण्याचा हट्ट अण्णांकडे माईंनी धरला तेथून ते परत जाऊन येई पर्यंतचे प्रवासातील विविधतेचे वर्णन वाचनीय असे आहे. कोणत्याही जाणकार कसबी लेखकासारखे जे घडले ते अलगद कागदावर उतरले आहे. ३१ ऑक्टोबर १९८८ ला वाळव्यातून रात्री ११ वाजता ते उभयता निघाले. ते सोव्हिएट रशियाला जाऊन येईपर्यतचे वर्णन यात समाविष्ट आहे.

रशियात पुष्कळ सरोवरे आहेत. 'बैकल' हे गोड्या पाण्याचे मोठे सरोवर आहे. आठ ते नऊ महिने हिवाळा असतो. सर्वतोपरी समृध्द असलेला देश, जिथं कामगार शेतकरी याचं राज्य आहे. जिथे गरीब-श्रीमंत असा भेदाभेद नाही, जिथे माणसाला माणसारखे वागविले जाते, जिथे श्रमाची प्रतिष्ठा मानली जाते असा देश म्हणजे रशिया होय. साम्यवादी राष्ट्र, औद्योगिक, वैज्ञानिक प्रगती, अंतराळ संशोधन आणि सर्वांहून इतर राष्ट्रांना मदत करण्याची प्रवृत्ती रशियाची आहे.

सौ.नायकवडी यांनी प्रवासातील अगदी बारीक सारीक वर्णन अचूकपणे केले आहे. जे घडले तसे उतरले आहे. उदा. ''मोराचे पिस मॉस्कोत भेट देण्यासाठी दिल्लीत विकत घेतले होते. ते पिस इथे या तपासणीत काढून घेतले गेले. तपासणीच्या घाईत, मी माझी पर्स तिथेच ठेवली. पट्ट्यावरुन जाणाऱ्या बॅगाबरोबर आम्ही दोघे पुढेपुढे गेलो. पर्स नसल्याचे नंतर माझ्या ध्यानात आले. तोवर तिथल्याच ड्युटीवर असणारी एक बाई पर्स उंच धरुन पर्स कोणाची म्हणून विचारात होती. पळत जावून पर्स घेतली. त्या पर्समध्ये सर्व कागदपत्रे, डॉलर्सचे चेक व भारतीय रुपये (चलन) होते. पर्स हरवली असती अगर दिली नसती तर काय? या विचारानेच मनाचा

थरकाप झाला. बाईंचे आभार मानून पट्ट्याजवळ आले''.

ताश्कंदहून मॉस्कोला पोहोचलो. ताश्कंदपेक्षा इथे भयंकर गारठा होता. गार, बोचरा वारा जोरदारपणे वहात होता. बर्फ पडत होते. आपल्याकडे जोराचा पाऊस आल्यावर जसे आपण निवारा पकडतो तशी अवस्था होती.

जेवणानंतर लोक दारु पितात किंवा दुधाशिवाय चहा किंवा कॉफी पितात. पण भारतीय पाणीच पितात.

आज दि.७ नोव्हेंबर १९८८ हा रशियाचा क्रांतिदिन आहे. आजच्या क्रांतिदिनाच्या उत्सवासाठी तर आम्ही भारतातून इथे आलो आहोत. मॉस्को नगरी एखाद्या नववधुप्रमाणे सजली होती. वऱ्हाडी माणसांसारखे मॉस्कोवासी नटून थटून इकडे तिकडे मिरवत होते.

राष्ट्राला उद्देशून राष्ट्राध्यक्षांनी दोन मिनीटेच भाषण केले. घोषणा वगैर फारशा नव्हत्याच. बहुतेक हवामानाचा परिणाम असेल.

भारत सोडल्यापासून सूर्यदर्शन नाही. सूर्यदर्शन तसं फारच दुर्मिळ असते. एक तास सूर्य दिसला. मनाला थोडा उबदारपणा आला.

लेनिन चौक मोठा आहे. या चौकात लेनिनचा पुतळा आहे. या चौकात दोन वीत लांबी रुंदीचे दगड बसविले आहेत. हे दगड काळेभोर आहेत. मॉस्को शहरात भूयारी रेल्वे आहे. ३२ मजले असलेली मॉस्को विद्यापीठाची इमारत आहे. क्रेमलिनमधून रशियाचा सर्व कारभार चालतो. मॉस्को शहरात ४५०० पेक्षा अधिक वाचनालये आहेत. जगातील सर्वात मोठे लेनिन वाचनालय आहे. क्रेमलिनच्या भिंतीजवळच लेनिनची मोठी कबर आहे.

''इच्छापूर्ती'' हे रशियाचे प्रवासवर्णन वाचल्यानंतर आपणच दौरा करुन आल्यासारखे वाटते, एवढे वास्तव प्रवासवर्णन आहे.

मराठी मुलखातील, मराठी वाचक या पुस्तकाचे स्वागत मनापासून करतील असा आत्मविश्वास आहे. वाळव्यातून निघाल्यापासून रशियाचा दौरा करून येईपर्यंत

ज्या ज्या गोष्टी बारीक सारीक घडल्या त्याचे वर्णन शब्दबध्द केले आहे. ''इच्छापूर्ती'' हे पुस्तक एका अनुभवसंपन्न शिक्षक मातेच्या लेखणीतून उतरलेले आहे. नव्या युगाचा नवा माणूस घडवण्यासाठी या माऊलीने आयुष्याच्या संध्याकाळपर्यंत कंबर कसली आहे. समाजाचा संसार आपला मानला. दुजाभाव कधी केला नाही. या मराठी मातेचे पुस्तक, मराठी मातीतील मराठी माणसं डोक्यावर घेतील असा आत्मविश्वास आहे. मी लहानतोंडी मोठा घास घेतला आहे याची मला कल्पना आहे. परंतु जे भावले ते मांडले आहे. २६ वर्षाच्या नायकवडी कुटुंबियांच्या ऋणानुबंधाचा प्रदीर्घ अनुभव आहे.

वाचकवर्ग या पुस्तकाचे स्वागत करेल अशी आशा आहे.

धन्यवाद!

दि.१८ एप्रिल १९९९

**प्रा. दिनकर विष्णू पाटील**
शांताई, ३ अ, जनता बँक कॉलनी,
फुलेवाडी, रिंग रोड, कोल्हापूर- ४१६ ०१२

# क्रांतिच्या नौबती

(क्रांतिवीर श्री. नागनाथअण्णा नायकवडी जीवन व कार्य)

लेखक - **प्रा. दिनकर पाटील**
एम.ए., एम.फिल

क्रांतिसिंह नाना पाटील यांचे विश्वासू सहकारी, सातारा प्रतिसरकारचे सरसेनापती श्री. नागनाथअण्णा नायकवडी, म. फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वारसदार. शेतकरी, कामगार, शेतमजूर, हमाल, स्त्रिया, श्रमिक, दलित, अदिवासी यांच्या सर्वांगिण विकासाचे स्वप्न सत्यात आणणारे क्रांतिवीर श्री. नागनाथअण्णा नायकवडी यांची चरित्र कहाणी नव्या पिढीला सतत प्रेरणा देत राहील.

* कीर्ती प्रकाशन, कोल्हापूर *

''**वहिनी!** अहो वहिनी !! झालं का ? चला लवकर ! साहेब गाडीत बसलेत, हं ! आलेच म्हणत मी उठले नि सामान घेवून चालू लागले. तोवर सौ.विशाखाने (मुलीने) पिशवी घेतली, नात सुप्रियाने पर्स घेतली, वॉचमनने बॅग घेतली नि आम्ही सर्व मी, सौ.काकी, सौ.विशाखा, चि.सुधामती, सौ.पाटील, सौ. सुमन व छोटी नातवंडे हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पोर्चकडे धावू लागलो. तिथे माणसांची इतकी गर्दी होती की आत पोर्चमध्ये जाताही येईना. कशीतरी प्रयत्न करुन मी गाडीपर्यंत पोहाचले. माझ्याबरोबरच्या सर्वजणी लांब राहिल्या. पिशवी, पर्स त्यांच्याकडेच होती. पर्समध्ये पैसे, पेन इत्यादी आवश्यक सामान होते. गाडी एक मिनीटांत हलणार, मी अजून गाडीच्या बाहेरच होते. गाडीच्या दाराला हात लावतो, श्री.नायकवडींनी मला सांगितले की, ''मागच्या गाडीत बैस.'' मागील गाडीत जागा नव्हती. आता काय करायचे? मी मागच्या गाडीकडे जात नाही हे पाहून श्री. नायकवडींचा नाईलाज झाला व त्यांना दार उघडावे लागले. मी आत बसेपर्यत नात रुपा उर्फ सुप्रिया गर्दीतून धावत आली. तिने पर्स माझ्या हातात दिली. इतक्यात कुणीतरी ओरडून सांगितले की, ''पिशवी व सुटकेस मागील गाडीत आहेत.'' हे सांगेपर्यंत गाडी हलली नि शेकडो हात निरोप देण्यासाठी उंचावले. कारण.. कारण आम्ही वाळव्यापासून खूप दूर.... रशियाला निघालो होतो.

ता.२९, ३० व ३१ ऑक्टोबर १९८८ या तीन दिवशी द्वितीय दलित-आदिवासी-ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलनाचा सोहळा सुरु होता. सकाळी साडेआठ पासून कार्यक्रम सुरु होई. दुपारी व रात्री जेवणासाठी वेळ दिला जाई, तेवढाच मोकळा वेळ! कार्यक्रम संपायला रात्रीचे बारा-एक सुध्दा वाजत असत. अशा या साहित्य सोहळ्याचा समारोप झाला. त्यानंतर पोवाड्याचा कार्यक्रम होता. लोक ऐकत होते. तोवर एकाएकी ते पळू लागले कारण त्यांचे लाडके पुढारी रशिया दौऱ्यावर निघाले होते. निरोप देण्यासाठी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे कामगार, शेतकरी, शिक्षक, विद्यार्थी, साहित्य संमेलनास आलेले पाहुणे व पोवाडा ऐकणारे रसिक श्रोते धावत येवून निरोप देण्यासाठी हात उंचावत होते.

गाडी (कार) ने गेट ओलांडले नि इस्लामपूरच्या दिशेने ती धावू लागली. श्री.नायकवडी झोपणार होते. त्याप्रमाणे ते झोपी गेले. टॅक्सीत मागील सीटवर माणूस झोपल्यावर किती जागा शिल्लक राहते? अर्थातच उत्तरेपर्यंत मला अवघडल्या अवस्थेतच बसून रहावे लागले. दोष द्यायचा तरी कोणाला? साहित्य संमेलनामुळे ते थकले होते. त्यांना दिवसरात्र झोप नव्हती नि मला रशियाला जायची ओढ होती. आधीच नको म्हणत होते. स्वतःचे एकट्याचे कागदपत्र तयार करुन घेतले होते. पासपोर्ट त्यांना मिळाला होता.

सप्टेंबर १९८८ मधील एक गुरुवार! मी गुरुवारचा उपवास करते. देव मानते. देवावर माझी नितांत श्रध्दा आहे. रात्रीचा स्वयंपाक केला नि सुप्रियाला सांगितले, ''तू जेव. तोपर्यंत मी शाळेत जावून येते''. ती ''बरं'' म्हणाली. मी हुतात्मा किसन अहिर विद्यालयात गेले विद्यालयाजवळच घर आहे. रात्रीचे नऊ वाजले होते.

श्री. नायकवडी जेवण उरकून कॉटवर बसले होते. श्री.दत्ता शेळके वर्तमानपत्र वाचून दाखवित होते. मी ऑफिसमध्ये गेले. ऑफिसमध्ये हे दोघेच होते. मी विचारले, ''मी का आले माहित आहे?'' श्री. नायकवडी हसले व म्हणाले, ''रशियाला नेण्याविषयी विचारण्यास. पण आता नको, पुन्हा जावू. आत मी एकटाच जावून येतो'' मी सांगितले की मी पुन्हा येत नाही पण आता येणारच. होकारार्थी - नकारार्थी काहीच उत्तर मिळाले नाही. मी जिजामाता विद्यालयातून दररोज चिठ्ठी पाठवून द्यायची की, ''मी येणारचं रशियाला.'' काही वेळा ते चिठ्ठी वाचायचे ही नाहीत. पण काय वाटले कोण जाणे. शेवटी माझ्यासाठी फॉर्म आणला. ''पासपोर्टसाठी फोटो लागतात. फोटो काढून आणा'' असे गड्याकडून कळविले. तसेच पैसेही तयार ठेवण्यास सांगितले. ते स्वतः आमदार आहेत. परंतु जवळ कधी चार पैसे असत नाहीत. आता प्रवासासाठी पैशाची आवश्यकता होती. विद्यालयाच्यासमोर पुतळा आहे त्या थोर हुतात्म्याचा, किसन अहिरांचा, त्या पुतळ्यासमोर अगोदरच सभा आयोजित केली होती. त्या सभेत त्यांनी सांगितले की, ''त्यांच्या धाकट्या बंधूनी

व चिरंजीवानी आठ हजार रुपये द्यावेत''. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या कामगारांनी, हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या शिक्षकांनी नि जिजामाता विद्यालयाच्या शिक्षिकांनी एक दिवसाचा पगार द्यावा. ठीक आहे. सर्वजण तयार होते. पण खरी कौतुकाची गोष्ट अजून सांगायची राहिलीच. हुतात्मा साखर कारखान्यातील जीप व ॲबॅसिडर गाडीवर जे ड्रायव्हर आहेत, त्यांनी आपापसात ठरविले की आपण सर्वांनी एक-एक महिन्याचा पगार साहेबांना द्यायचा. ठरल्याप्रमाणे त्यांनी पुतळ्यासमोर सभेतच जाहीर केले की, ''ड्रायव्हर्स एक-एक महिन्याचा पगार देणार आहेत.'' जाहीर केल्याप्रमाणे त्यांनी तो दिला सुध्दा. ह्यांच्या पैशाची सोय झाली. पण मी कोणाकडे पैसे मागायचे? मला कोण देणार? मी जिजामाता विद्यालयात मुख्याध्यापिका आहे. पगाराचे पैसे आवश्यक खर्चासाठी घरी खर्च करायचे. बाकीचे बँकेत ठेवायचे. आयुष्यात कधी चैन केली नाही की कधी जीभेचे चोचले पुरविले नाहीत. बाजाराला साहित्य आणण्यासाठी गेल्यावर किती ओझे असले तरी दोन्ही खांद्यावर पिशव्या अडकवायच्या, दोन्ही हातात घ्यायच्या नि स्टँडवर यायचे. आठवडाभर खांदे दुखायचे पण कधी रिक्षाने आले नाही. असे साठविलेले श्रमाचे, घामाचे पैसे रशियाला जाताना उपयोगी आले. पैसे व फोटो दिले. तसेच फॉर्म भरुन दिला. आणि काय? आमदारांची रशियाला जाणारी सहलच रद्द झाली अशी बातमी आली. म्हणतात ना, 'नकटीच्या लग्नाला सतरा विघ्न' तशातलीच माझ्या जाण्याची अवस्था मनाला हुरहूर लागून राहिली, आता कधी जाणे जमणार....?

नंतर थोड्याच दिवसांत रशियाला जायचे नक्की झाले. दिल्लीत ''हॉलिडे मेकर्स'' या नावाची प्रवासी कंपनी आहे. या कंपनीमार्फत जाणे निश्चित झाले. यासाठी सुध्दा कॉ. दत्ता देशमुखांना खूपच खटपट करावी लागली, मगच आम्हां दोघांचा ''दिल्ली ते मॉस्को'' सहलीत समावेश झाला नि माझ्या मनाने समाधानाचा निश्वास सोडला. सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे सोमवार ता.३१ ऑक्टोबर १९८८ ला रात्री ११ वाजता वाळव्यातून निघून पहाटे पुण्यात पोहचलो. पुण्याच्या इन्स्पेक्शन बंगल्यावर सकाळी ७ पर्यंत झोपलो. पहाटे झोपल्यामुळे उजाडलेले समजलेच नाही. डोळे उघडले तर खोली लख्ख सुर्यप्रकाशाने उजळून निघाली होती. उठून गडबडीने

प्रातःविधी उरकले. आंघोळ केली. त्यामुळे आळस गेला. प्रसन्न वाटले. घाईतच पुणे स्टेशनवर आलो. मुंबई रेल्वे पकडली. मंगळवारी दुपारी म्हणजेच १ नोव्हेंबरला मुंबईत पोहचलो स्टेशनवर तिकीट कलेक्टरच्या समोरुन बाहेर आलो. श्री.नायकवडी एकटेच अगदी धावतच गेटच्या बाहेर आले. पण ते का धावत आहेत हे मला मुळीच समजले नाही. आम्हीही त्यांच्या मागोमाग सामान घेवून धावत आलो. त्यांच्याजवळ गेल्यावर समजले की टॅक्सी मिळविण्यासाठी रांगेत उभा रहाण्यासाठी ही पळण्याची शर्यत होती. टॅक्सी करुन आमदार निवासांत आलो. श्री.नायकवडी यांच्या ताब्यात १२५ नंबरची रुम आहे. ही रुम अशी आहे की इथे सूर्यप्रकाश व हवा कुठूनही येऊ शकत नाही. प्रकाशासाठी सतत लाईट सुरु असायचा व हवेसाठी पंखा सारखा फिरायचा. खोलीत गेलो सामान ठेवले. हातपाय स्वच्छ धुतले. अजून पोटपुजा व्हायची होती म्हणून जेवायला गेलो. रहायचे एके ठिकाणी, जेवायचे दुसरे ठिकाणी व काम करायचे तिसरे ठिकाणी ही मुंबईची प्रथा आहे. जेवायच्या ठिकाणी भला मोठा क्यू! आमच्या अगोदर साठ माणसे जेवण्यासाठी थांबली होती. बाप रे! आता कधी जेवण मिळायचे? पावणेतीन वाजता आम्हाला भरभर जेवण मिळाले जेवण चांगले होते. गुजराथी खानावळ होती. अनेक पदार्थ होते. उशीरा जेवल्यामुळे गळंगल्यासारखे झाले. लोळणे, वर्तमानपत्र वाचणे इतकेच काम होते. उशीरा जेवल्यामुळे रात्री जेवणाचा प्रश्नच नव्हता.

बुधवारी दोन नोव्हेंबरला सकाळी भराभर आवरले. श्री.नायकवडींचे दोस्त श्री.गुजराथी यांच्या घरी जायचे होते. टॅक्सीने गेलो. स्वागत छानच झाले. जागा मोठी होती. त्यांच्या पत्नींनी चहा बिस्किटे दिली श्री.गुजाराथींनी विचारले, ''कपडे खूप घेतलेत ना?'' इतक्यात त्यांची मुलगी बाहेर आली ती नुकतीच रशियाहून आली होती. तिने व श्री.गुजराथींनी सांगितले की, ''तिकडे खूप थंडी आहे. भरपूर गरम कपडे बरोबर घ्या.''

दोस्त श्री.पारेखभाई यांना श्री.नायकवडींनी अगोदरच सूचना दिली होती की, ''बुधवार दुपारसाठी आम्हास जेवण द्या. बुधवारी सकाळी खानावळीत लवकर

मिळणार नाही नि वाटेत कुठल्या स्टेशनवर घेण्याची इच्छा नाही.'' त्यामुळे त्यांनी भरपूर जेवण स्टेशनवर आणून दिले. तसेच प्लॅस्टिकचा जार पाणी भरुन आणून दिला. मंगळवारी रात्री पिता-पुत्र दोघेजण आम्हास भेटण्यास खोलीवर आले होते. आम्ही दोघे रशियाला जातो आहोत हे ऐकून त्यांना समाधान वाटले. त्यांनी येतानाच चंदनाचे दोन हार आम्हास घालण्यास आणले होते.

मुंबईतून बुधवारी दुपारी ११.३० वाजता दिल्लीला जाण्यासाठी निघालो. तिकीटे अगोदर काढलेली होती. श्री.पवार सर दिल्लीपर्यंत येणार होते. स्टेशनवर आम्हास निरोप देण्यासाठी कॉ. दत्ता देशमुख, श्री.पारेखभाई, त्यांचे वडिल, जयवंत अहिर, महेश, बबन इ. आले होते. तेवढ्यात कॉ. दत्ता देशमुखांनी विनोद केला, ''रशियाला जावून हनिमून साजरा करुन या.'' हसलो फक्त! कारण हे हास्यास्पदच होते आयुष्यात कधी सुखासमाधानाने चार दिवस एकत्र रहाता आले नाही. अगदी सध्या सुध्दा. गाडी हलली नि दिल्लीच्या रोखाने वेगाने धावू लागली. निरोप देणारी माणसे अस्पष्ट होत दिसेनाशी झाली. सेकंड क्लासच्या छोट्या डब्यात बसलो होतो, पण तिथे काहीच सोय नव्हती भूक लागल्यावर तिघेजण जेवलो. त्यातीलच थोडे थोड काढून डॉ. मीना, (कै. डॉ. गायकवाड, सर्जन, मिरज यांच्या कन्या) यांना दिले नंतर भांडी विसळली. डॉ. मीनाही रशियाला येणार होत्या. त्या फर्स्टक्लासच्या डब्यात बसल्या होत्या. आमच्यापासून थोड्या दूर अंतरावर होत्या. गाडी दिल्लीच्या दिशेने सुसाट धावत होती. त्या तालावर आम्हीही डोळे बंद करण्याच्या नादात होतो. थंडी नव्हती. रात्री जेवण्याचाही प्रश्न नव्हता, दुपारीच जेवण संपवले होते.

गुरुवारी ता.३-११-८८ ला सकाळी १०.३० ला दिल्लीत पोहोचलो. टॅक्सी ठरवली नि जिथे मंत्री किंवा आमदार उतरतात तिथे खोली मिळते कां पाहिले. पण खोली मिळाली नाही. तिथूनच लगेच I.I.P.A. Indian Institutions Public Adminastration हाऊसवर गेलो. तिथे एकूण गर्दी कमी होती. ६३ नंबरची रुम मिळाली. त्याच खोलीत कोल्हापूरचे, पूर्वी कायापालट करणारे शिल्पकार कै. जे. पी. नाईक रहात होते म्हणे. प्रातःविधी, आंघोळ करुन जेवण्यास गेलो. I.I.P.A. मध्ये

जेवण्याची सोय आहे. दोन वेळ चहा व दोन वेळचे जेवण माफक दरात देतात. जेवणही चांगले असते. वेटर्स व्यवस्थित वाढतात. त्यातल्या त्यात ह्यांच्याशी तर तिथले सर्वजण खूपच चांगले वागतात. पैसे असले की अक्षरक्षः २०-२० रुपये टिप देतात. नसले की त्यांच्याकडूनच ऊसने घेतात. यह ग्रँड आदमी आया की I.I.P.A. मधले सर्व सेवक खूष असतात. जेवणानंतर श्री.नायकवडींची काही ऑफिशियल कामे करण्यात आली. तसेच बाजारात जावून गरजेचे कपडे कोट, स्कार्फ व बूट इ.खरेदी केली. खोलीकडे परतलो. बराच वेळ झाला होता. चि. वैभव (छोटे चिरंजीव) दिल्लीस आले होते. विद्यापीठाचे काम होते म्हणे सध्या ते स्टुडंटस् कौन्सिलचे अध्यक्ष (चेअरमन) आहेत ना! ते अजून भेटले नाहीत. महाराष्ट्र सदनावर त्यांच्यासाठी ''भेटा'' म्हणून निरोप ठेवला आहे. आज थोडा वेळ शिखांच्या मंदीरात संध्याकाळी जावून आलो. जाताना चपले बाहेर काढून ठेवली. चप्पल ठेवण्याची मोफत सोय आहे. ठेवल्याबरोबर तिथल्या शीखांच्या बाईंनी ती हातात घेतली, कपाळाला लावली नंतर पादत्राणे ठेवण्याच्या जागी ठेवली. शीखांच्या देवाला फुले वाहिली नि त्यांनी दिलेली दोन फुलं घेवून बाहेर आलो. त्या बाईनी चप्पल पुन्हा आपल्या कपाळाला टेकवली नी आमच्या पुढे ठेवली. वाहवा! केवढा हा मनाचा मोठेपणा! आपण इतरांची चपले उचलत नाही आणि उचलायला लागली तर आपणास कमीपणा वाटतो गर्दीतून वाट काढीत खोलीवर परतलो. पण माझ्या मनातून त्या शीख भगिनीची कृती मात्र पुसली जात नव्हती, नि कधी जाणारही नाही.

शुक्रवार ता.४ नोव्हेंबर ८८ ला तशी काही घाई नाही. जेवून आरामशीर विश्रांती घ्यायची होती; पण आज Holiday Makers ने प्रवासाबाबतची मिटींग आयोजित केली होती म्हणून सर्व भरभर आवरले. चहा घेतला. चि. वैभवची वाट पहात होते. इतक्यात श्री. नायकवडी बाहेरुन खोलीत आले नि म्हणाले, ''वैभव पुण्याला गेला आहे तिथून थोड्या वेळातच वाळव्यास जाण्यास निघेल.''

सकाळी दहाच्या सुमारास हॉलिडे मेकर्सच्या ऑफिसवर गेलो आम्हीच श्री. नायकवडी, मी, डॉ. मीना व श्री. पवारसर तिथे प्रथम पोहचलो होतो. इतर

(लोक) प्रवासी थोड्या वेळाने आले. आम्ही एकूण ३९ प्रवासी होतो. दुसऱ्या दिवशी कितीला जमायचे? विमान तळावर कितीला जायचे वजन किती किलो बरोबर असावे उली कपडे भरपूर असावेत इ. संबंधी एजंटनी माहिती सांगितली. तिथे आणखी १,०००/- रुपये मागितले. सर्वांनी काढून दिले. सर्वजण जाण्याच्या मूडमध्ये असल्याने कोणीही विचारले नाही की हे One Thousand कां घेत आहात? आम्हाला दोन व्हिसा, दोन एअर बॅग्ज मिळाल्या. आम्हास अगोदर २५० डॉलर्स मिळाले होते. आता आणखी वीस डॉलर्सचा चेक दिला. नंतर सर्वांना चहा बिस्किटे दिली. आपली ओळख करुन द्या म्हणून सांगण्यात आले. म्हणजे संपूर्ण नांव, पत्ता व राज्य इंग्रजीतून सांगायचे होते. या प्रवासात आम्ही सहा जोडपी दाखल झालो होतो. ज्या स्त्रिया होत्या, त्यांच्या नवऱ्यांनी, आपआपल्या बायकांची नांवे सांगितली. माझ्यावर टर्न आली. मी उभी राहिले व सांगितले. माझा आवाज मोठा व उच्चार स्पष्ट होते. प्रवासात एक वकिल होते त्यांनी लगेच सांगितले की, ''तुम्ही अतिशय सुंदर सांगितलेत मला खूप आवडले.'' सर्व साहित्य घेवून I.I.P.A.च्या खोलीवर आलो दुपारचा दीड वाजला होता. घाईनेच जेवायला गेलो. मी घेतलेले कॅनव्हास बुट मॉस्कोच्या थंडीत उपयोगी नाहीत म्हणून पुन्हा बाजारात जायचे ठरले. मंगळवार, शुक्रवार हे दोन दिवस श्री. नायकवडी पाळतात. त्यांच्या जीवनात दुःखद घटना या दोन्ही दिवशी घडलेल्या आहेत. म्हणून नवीन काम किंवा विचारविनिमय या दोन्ही दिवशी करत नाहीत. आज शुक्रवार असल्यामुळे हे बाजारात येणार नव्हतेच. श्री.पवारसर, सौ.मीनाताई व मी पावणेचारला बाजारांत गेलो. मीनाताईना एक मंकी टोपी, स्कार्फ व एक हँडबॅग इ.खरेदी करायची होती. तीन वेळ हिंडलो, मनपसंत वस्तू कांही मिळत नव्हत्या. सर्वजण कंटाळलो शेवटी एके ठिकाणी सर्व विकत घेतले. अजून बूट विकत घ्यायचे होते. बुटांच्या कंपनीच्या दुकानांत गेलो. वॉटर प्रुफ बुटाची किंमत फक्त १९२/- रुपये सांगितली. काहींही न बोलता परतलो व अगोदर चौकशी केली होती त्या ठिकाणीच १०० रुपयाला बूट घेतले. श्री.पवारसरांनी आपल्या मुलाला दोन ड्रेस घेतले. खोलीवर परत येईपर्यंत अंधार झाला. जेवायला जायचे होते. उशीरा जेवल्यामुळे मला भूक नव्हतीच. पण शनिवारी सकाळी ७.३० ला विमानतळावर जायचे होते पुन्हा जेवण कधी मिळेल हे निश्चित नसल्यामुळे वॉश घेवून जेवायला

गेले. सगळे सामान आवरायचे होते ते आवरुन, बांधून ठेवले. कपडे रात्रीच धुतले. रात्री बारा वाजता झोपलो. शनिवारी लवकर उठून, सर्व लवकर उरकायचे आहे असा धाक मनावर होताच. श्री.नायकवडी तर पहाटे तीनलाच उठवायला आले. उठून प्रातःविधी, आंघोळ आवरुन बसलो. उशिरा झोपून लवकर उठल्यामुळे न्याहरी घेण्याचीही इच्छा नव्हती. मी फक्त अर्धा कप चहा घेतला. तोवर "हे" शीखांच्या मंदीरात जावून आले कारण १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीतील फौजी सेनेला शिक्षण देण्यासाठी, पंजाबप्रांतातील लुधियाना येथील दोन शीख आणले होते. त्यातील एक पोलीसांबरोबर झालेल्या गोळीबारात हुतात्मा झाले नि दुसरे आपल्या गावी परत गेले. त्यावेळपासून हे शीख मंदीरात शक्य असेल तेव्हा जातात. सकाळी ७.१५ वाजता Holiday Makers च्या कार्यालयाकडे निघालो. तिथे पहातो तो काय, आमच्या अगोदरच प्रवासी भरुन विमानतळांकडे जाणारी बस सज्ज होती. आम्ही बसलो नि बस (खास मोटर) दोन मिनिटांत विमानतळाकडे सुसाट धावू लागली. विमानतळ शहराच्या बाहेर बराच दूर आहे. विमानतळावर पोहचलो. विमानतळ मोठा व भव्य आहे. या विमानतळास इंदिरा गांधी आंतराष्ट्रीय विमानतळ असे नांव दिले आहे. तिथे पोहचल्यावर विमानतळाच्या आतील भागात जाण्याअगोदर आम्हां प्रत्येकास एक छोटा फॉर्म देण्यात आला. त्या फॉर्मवर नांव, गांव, जन्मतारीख, जन्मगांव, कां जात आहेत? किती दिवस रहाणार आहात? व्यवसाय काय? इ. सर्व माहिती भरुन द्यावी लागते. ती भरुन दिली. बॅगा त्यांच्या ताब्यात दिल्या. पुन्हां अंगझडती पुरुषांचा पुरुष व स्त्रियांची स्त्री कर्मचारी घेत होते. झडती तपासणी झाल्यावर आम्ही सर्वजण आत गेलो. थोड्या वेळातच विमानांत बसलो.

साधारणपणे विमाने तीन प्रकारची असतात. मालाची वहातूक करणारी, प्रवासी वहातूक करणारी व युध्द काळातील लढावू विमाने. सध्या त्यात अनेक प्रकार झालेले आहेत. आकाशांत जेव्हा विमान दिसायचे तेव्हां मी घरातून धावत बाहेर येवून पहायची एवढीच माझी विमानाशी ओळख! खेडयात राहणारी मी! विमान व विमानतळ पहायला कुठे नि कशाला जाणार? पण घडले. विमानात बसायला मिळाले विमानातून

प्रवासही करणार होते. आमदार श्री.नायकवडी यांच्या नशिबाने व स्वतःच्या पैशाने मी रशियाला निघाले होते.

ध्यानी, मनी, स्वप्नी सारखा रशिया देश दिसत होता. असा हा देश या देशाची भौगोलिक माहिती मी प्रथम मिळविली. भारताच्या सातपट मोठा असून, तो जगातील सर्वात मोठा देश आहे. या देशाने इ.स.१९५७ मध्ये ''स्पुटनिक'' हा कृत्रिम उपग्रह अंतराळात सोडला. ते पाहून सर्व जग आश्चर्यचकित झाले. पूर्वी हा देश मागासलेला होता. पण इ.स.१९१७ मध्ये इथे मोठी क्रांती झाली. तेव्हांपासून या देशाने अनेक पंचवार्षिक योजना राबविल्या नि देशाची प्रगती केली. या देशांत अनेक वंशाचे, विविध धर्मपंथाचे व भिन्न भिन्न भाषा बोलणारे लोक रहातात.

सोव्हिएट रशियात एकूण सोळा घटक राज्ये आहेत. या सर्वांना मिळून ''युनियन ऑफ सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक (यु.एस.आर.)'' असे म्हणतात. म्हणजेच समाजवादी जनसत्तांक संघ असा याचा अर्थ आहे.

हा देश आकाराने विशाल व विस्तीर्ण आहे. जगाच्या भूभागापैकी सातवा हिस्सा याने व्यापला आहे. याचे पूर्व-पश्चिम अंतर इतके मोठे आहे की ते पार करण्यास लेनिनग्रांड ते ब्लॉडिव्होस्टाक पर्यंत रेल्वेने जाण्यास १० दिवस लागतात.

बराच प्रदेश सखल मैदानाचा आहे. कांही प्रदेश पर्वतमय आहे तर कांही पठारांचा प्रदेश आहे. अनेक नद्या आहेत. पण ''व्होल्गा'' ही नदी अधिक महत्वाची आहे. ही नदी कॅस्पियन समुद्रास मिळते. हिच्या उगमाजवळील कालव्याने ही बाल्टिक समुद्रास जोडलेली आहे. उत्तरेकडे वहात नद्या हिवाळ्यात गोठतात, त्यामुळे त्यांचा जलवाहतुकीस उपयोग होत नाही. या देशांत पुष्कळ सरोवरे आहेत. ''बैकल'' हे या प्रदेशातील गोड्या पाण्याचे मोठे सरोवर आहे.

रशियाच्या उत्तर सीमेवर पर्वत रांगा नसल्यामुळे हिवाळ्यात आर्क्टिक महासागरावरुन येणाऱ्या शीत वाऱ्यामुळे कडक थंडी पडते येथे आठ ते नऊ महिने हिवाळा असतो. तो सर्व बर्फाच्छादित असतो उन्हाळा अगदी थोडा काळ असतो.

हवामान एकूण थंड व विषम आहे पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्यापासून पाऊस मिळतो. उन्हाळ्यात दिवस सोळा ते अठरा तासांचा असतो.

उत्तरेकडील प्रदेश जंगलांनी व्यापला आहे. त्यास ''तैगा'' असे म्हणतात. जगातील एक तृतीयांश जंगले एकट्या रशियात आहेत. यात पाइन, फर, सीडर, स्प्रुस, लंबि इ. झाडे आहेत. येथे केसाळ प्राणी आहेत. केसाळ कातड्यांना जगांच्या बाजारात चांगली मागणी आहे. तैगा प्रदेशाच्या उत्तर भागांत असलेल्या बर्फाळ प्रदेशास ''टुंड्रा'' प्रदेश असे म्हणतात. हा प्रदेश बराच दूरवर पसरला आहे. उन्हाळ्यांत बर्फ वितळते तेव्हां गवत, शेवाळ व खुरटी झुडपे उगवतात. यावर रेनडियर प्राणी जगतो. सील, वॉलरस इ. प्राणी आहेत. व्होल्गेच्या खोऱ्यात रुंदपर्णी वृक्ष आहेत. रशियात स्टेप्स या नावाने ओळखला जाणारा, जंगल प्रदेशाच्या दक्षिणेस गवताळ प्रदेश आहे. या भागातील जमीन काळी कसदार असून येथे गहू अतिशय पिकतो म्हणून या भागांस युरोपातील गव्हाचे ''कोठार'' असे म्हणतात. गवताळ भागाच्या दक्षिणेस मध्यम प्रतीच्या जमिनीचा प्रदेश आहे. येथे किरगीझ हे लोक शेळ्या, मेंढ्या पाळून भटके जीवन जगत असत. पण सध्या कालव्याने या भागास पाणी पुरवठा केल्याने हे ''किरगीझ'' लोक स्थायिक होवून शेती करुन गहू, कापूस इ.पीके घेवू लागलेत.

रशियात गहू, कापूस, बीट, अंबाडी इ.पीके येतात. कापसाच्या उत्पादनात जगात रशियाचा तिसरा क्रमांक असून, गव्हाच्या उत्पादनात पहिला क्रमांक आहे.

खनिज संपत्तीने हा देश समृध्द आहे. येथे तेल, लोखंड, सोने, तांबे, बॉक्साइट, शिसे, कथील, निकेल, युरेनियम, मँगेनीज, प्लॅटिनम इ. खनिजे मोठ्या प्रमाणात सापडतात.

शेती हा येथील मुख्य व्यवसाय आहे. शिवाय लाकूडतोड, खाणकाम, कारखानदारी व इतर अनेक उद्योगधंदे इथले लोक करतात तसेच युध्द सामुग्रीही बनवतात.

येथील रस्ते पक्के असून जलमार्ग, लोहमार्ग व विमानमार्ग ही दळणवळणाची प्रमुख साधने आहेत. येथील विमाने देशातील सर्व मोठ्या शहरांना व महत्वाच्या जागतिक केंद्रांना जातात.

येथून अवजड यंत्रे, यंत्रसामुग्री, विमाने, खते, कागद इ.वस्तु निर्यात केल्या जातात. अशा सर्वतोपरी समृध्द असलेल्या देशाला, जिथं कामगार–शेतकऱ्यांचं राज्य आहे, जिथे गरीब–श्रीमंत असा भेदाभेद नाही, जिथे माणसाला माणसासारखे वागविले जाते, जिथे श्रमाची प्रतिष्ठा मानली जाते अशा देशाला मी जायला सज्ज झाले होते. मनाचे वारु विचारांवर स्वार झाले होते नि भन्नाट धावत होते, त्यांना आवरता आवरता पुरेवाट होत होती, दमछाक होत होती.

रशियालाच जाण्याचे कारण म्हणजे जेव्हांपासून मी वाचू लागले तेव्हांपासून जे जे वाचायला मिळाले ते ते वाचत गेले. त्यावरुन रशियाबद्दल अनुकूल ग्रह झाला. तसेच मी शिकत असताना पुण्याचे कै.रघुवीर जादुगार शाळेत आले होते. ते म्हणाले ''जगातील अठरा राष्ट्रांचा मी प्रवास केलाय, पण रशियासारखा देश मला आढळला नाही. मी रशियाला निघालो तेव्हा माझ्या मित्रांनी मला भीती घातली की तिथे पोलादी पडदा आहे. तिथे गेलेल्या लोकांना आपल्या इच्छेप्रमाणे वागता येत नाही. इथे माझी तपासणी झाली. बस येईपर्यंत आम्ही म्हणजे माझे सहप्रवासी व मी तिथे थांबलो, इतक्यांत एक रशियन शेतकरी जवळ आला नि म्हणाला कृपा करुन ही द्राक्षे खाता का?''आणि त्या शेतकऱ्याने रघुवीर व इतर प्रवाशांना द्राक्षे दिली.

एकूण साम्यवादी राष्ट्र, औद्योगिक, वैज्ञानिक प्रगती, शेती संशोधन, शैक्षणिक प्रगती, अंतराळ संशोधन आणि सर्वाहून इतर राष्ट्रांना मदत करण्याची प्रवृत्ती या सर्वामुळे सोव्हिएट युनियनचा ठसा माझ्या अंतःकरणावर खोलवर उमटला होता. मी सतत म्हणायची ''भारत दर्शन करायचे आहे. तसेच रशियाला एकदा जायचे आहे मला'' जवळ असणारी मनांत म्हणत असत. ''एक सामान्य स्त्री, रशियाला जायचे म्हणजे काय चेष्टा आहे होय! कुठे वाळवे नि कुठे रशिया!'' आणि माझ्या वेडेपणाला हसत असत.

तर काय! प्रथमच मी विमान इतक्या जवळून पहात होते. विमानाच्या दाराजवळच हवाईसुदंरी उभी होती. सुंदर पोषाखात, स्मितहास्याने सर्व अनामिकांचे स्वागत करत होती. प्रत्येकजण आपापल्या जागेवर बसले म्हणजेच नंबरप्रमाणे खुर्च्यावर बसले. बेल्ट (पट्टा) बांधा असे पुकारले. इथं कुणाला बेल्ट बांधायला येतोय? शेजारच्या बाईंनी दाखविले त्याप्रमाणे पट्ट्याचे बक्कल घातले. पट्टे नायलॉनच्या दोऱ्यांचे असतात खुर्च्यांच्या दोन्ही बाजूस असतात. उड्डाण करत असताना विमान वेडेवाकडे होते तेव्हा प्रवासी पडू नयेत म्हणून पट्टयांची योजना केली आहे. परंतु व्यवस्थित बसले तर पट्टयांची आवश्यकता भासत नाही. दहा मिनिटात विमान आवाज करत चाकांनी चालू लागले. उत्सुकता शिगेला पोहचली होती. धावपट्टी वरुन दोन फेऱ्या काढल्या तरी विमान वेग घेवून उड्डान करेना. कांही तांत्रिक बिघाड झाला होता. "Get down" खाली उतरा सांगण्यात आले. विमानातून खाली उतरलो. प्रवाशांसाठी असलेल्या हॉलमध्ये बसलो. सकाळी नाष्टा घेवूनही ह्यांना भूक लागली. वीस रुपये दिले सांगितले काही खावून या. परंतू काही खाता आले नाही कारण तपासणी  नंतर एकदा आत गेले की पुन्हा ती लक्ष्मणरेषा ओलांडून बाहेर येता येत नाही, तसेच विमानातही बसता येत नाही. जेव्हां जसे सांगतील, तेव्हा तसे करायचे, विमान तळावरील अंतर्गत व्यवहार डॉलर्समध्ये चालतो, त्यामुळे कांहीच करता येत नाही. विमानातून उतरताना एक कार्ड दिले त्याचा एक भाग दारावरच फाडून घेतला, दोन भाग आमच्याजवळ राहिले. बराच वेळ झाला. कार्डाच्या दोन भागापैकी एक भाग पुन्हा फाडून आम्हांस सांगितले की चहा, कॉफी किंवा थंड पेय घ्या. आम्ही दोघांनी थंड पेय घेतले. नंतर दहा मिनिटांनी विमानात जाण्यास सांगितले. मी तिथल्या बाथरुममध्ये गेले होते, तोपर्यंत ह्यांनी हँडबॅग्ज, स्वेटर कवळ्यातून आणले. खरे म्हणजे घाई करण्याचे काहीही कारण नव्हते. तेव्हांच माझा नवा स्वेटर हरवला कवळयातून आणत असतांना कुठे पडला हे ह्यांना सुध्दा माहित नाही नवाच स्वेटर हरवला म्हणून आपोआपच डोळ्यात पाणी येवू लागले, चि.अरुणने (दोन नंबरच्या मुलाने) १५० रुपयाचा ओसवाल कंपनीचा आणलेला होत. कुठे शोधायचा? सापडणे शक्य नव्हते. शेवटी म्हणाले, ''दुसरा घेवून देतो.'' पण दुसरा घेवून दिला नाहीच आणि हाही हरवला चला, स्वेटरचे एक ओझे कमी झाले.

विमानांत बसलो. बराच वेळ झाला होता. जेवण देणार म्हणून सांगितले गेले. आपापल्या जागेवर खुर्चीवर बसलो. प्रथम पन्ह्यासारखे पेय, पॅक असलेले, नळीने पिण्यासाठी दिले. नंतर प्लॅस्टिकच्या अनेक भांड्यातून पावाचे विविध प्रकार दिले. तसेच मीठाची पुडी, मिरीपुडी, लोण्याची पुडी दिली. खरे तर चव कशालाच नव्हती. त्यात एक सफरचंद होते, ते तेवढे मी काढून घेतले. बाकीचे सर्व पदार्थ तसेच ठेवले. भूक लागली होती, पण ते पदार्थ मात्र खावेसे वाटले नाहीत. ह्यांना खूप भूक लागली होती. इतरांचे जेवण झाले तरी सांगूनही ह्यांना व शेजारच्या माणसाला जेवण मिळाले नाही. खूपच उशिराने मिळाले. जेवण निम्मे झाले तोवर पुन्हां खाली उतरा असे सांगण्यात आले. मुंबईहून विमान वेळेवर आलेच नाही. संध्याकाळी चार ते साडेचारच्या सुमारास सांगितले की आज जाणे रद्द झाले आहे. आता सर्वांनी सेन्टॉर हॉटेलमध्ये जायचे आम्हांस हॉटेलवर सोडण्यास एजंटनी ठरवलेली बस तयार होतीच प्रवाशांची तिथे सोय केली होती.हॉटेलमध्ये जाईपर्यंत अंधार झाला. इथें दिल्लीत संध्याकाळी सहालाच अतिशय रात्र झाल्यासारखी वाटते. हॉटेल नव्हे राजवाडा-मयसभा! हॉटेलमध्ये एकूण ५३२ खोल्या आहेत. सर्वत्र पांढऱ्याशुभ्र संगमरवराचा वापर केला आहे. पुढील पोर्च प्रशस्त आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस दगडी कोरीत तुळशी वृदांवने आहेत. बाहेरच्या बाजूस एक पहारेकरी असून टॅक्सीतील येणाऱ्या, जाणाऱ्या प्रवाशांना टॅक्सीचे दार उघडायचे किंवा बंद करायचे व सलाम करायचा. एवढ्याकरिता ते श्रीमंत प्रवासी त्या पहारेकऱ्यास १०-१० रुपये द्यायचे. हॉटेलमध्ये आत प्रवेश केला जातो. तिथे एक पहारेकरी आहे. आत सर्वत्र गालिचा पसरलेला आहे. सर्वत्र विविध आकाराचे बल्ब लावले आहेत. त्या बल्बच्या सभोवती काचेचे चौकोनी डबे आहेत. हॉटलेमधील काही भागाला रंग देणे सुरु होते. हॉटेलमध्ये दिवसा गर्दी त्यामुळे रंगकाम रात्री सुरु होते. काही कामगार शिडीवरुन चढून रंग देत होते. विदेशी प्रवाशांनी त्यांचे फोटो काढून घेतले.

खोल्या मोठ्या व प्रशस्त होत्या. खोल्या सिंगल व डब्बलही होत्या. बाथरुम सुंदर असून टबबाथ व शॉवरबाथची सोय आहे. गरम व थंडपाण्याची तसेच बेसीनवरही थंड व गरम पाण्याची सोय आहे डबल रुममध्ये दोन टॉवेल्स, दोन

नॅपकीन्स आहेत. तसेच रग्जसह दोन बेडसं तयार होते. कॉटस नव्हत्या. नक्षीकाम असलेले लाकडी पलंग होते. फर्निचर उच्च प्रतीचे आहे. प्रत्येक खोलीत अल्पोहाराचे साहित्य व थंड पेय होती. तसेच टी.व्ही. व रेडिओ नि फोन होता. पहिल्या मजल्यावर वाजणाऱ्या संगीताची धुन प्रत्येक खोलीत ऐकू येत होती जेवणाचा हॉल अतिशय मोठा होता. तिथे पोहचल्यावर दीड तासानंतर जेवण्यास गेलो. वेटर्स फक्त उभे राहिलेले होते. हॉलच्या कडेने नक्षीच्या, शिसवी, काळ्याभोर खुर्च्या मांडलेल्या होत्या. हॉलच्या समोर स्टेज सारखा उंचवटा होता. त्यावर पुष्कळ प्रकारचे देशी विदेशी खाद्यपदार्थ जेवणासाठी ठेवले होते. शाकाहारी व मांसाहारी दोन्ही प्रकारचे पदार्थ होते. खरंच इतके पदार्थ होते की कोणते पदार्थ घ्यावेत, कोणते खावेत, त्यांची चव कशी असेल? काहीही समजत नव्हते. काही पदार्थ तर मी आयुष्यात पाहिलेले नव्हते तर खाणे दूरच. मग नाव कसे माहित असणार तसेच रात्र होती, थंडी होती, हवेत चांगलाच गारठा होता तरीसुध्दा तिथे चॉकलेट आईस्क्रिम खाण्यासाठी ठेवले होते. एका बाजूस नॅपकीन्स, प्लेट, चमचे, काटे-चमचे यांचे ढीग होते. येणारी व्यक्ती आपल्या हाताने नॅपकीन, प्लेट, चमचे घेवून आपणांस हवे ते पदार्थ व हवे तितके वाढून घेत असे. यालाच Self-service असे म्हणतात. पदार्थात घेण्यासाठी चमचा असतो. भातसुध्दा उत्तम होता. सर्व पदार्थ गरम रहावेत म्हणून अक्षरशः खाली मंद ज्योती जळत ठेवल्या होत्या. अशा हॉटेलमध्ये रहाणे कोणास परवडेल? पहा! अगदी छोटा प्रसंग आहे. अनुभवलेला आहे. आम्हीच एक कप कॉफी व एक कप पावडरचे दूध घेतले. चव कॉफी किंवा दूधाला नव्हतीच. किती रुपये असेल चार्ज फक्त ४६.८० इतका होता. बेचव पेयाना इतके पैसे द्यावे लागले म्हणून मन चरफडत राहिले. एका रात्रीचा खोलीचा चार्ज कमीत कमी १,५००/- रुपये आहे. आताही या हॉटेलमध्ये खूप गर्दी आहे. जिथे आम्ही कॉफी घेतली तो भाग तळघरासारखा आहे. मंद संगीत व मंद प्रकाश होती. कृत्रिम धबधबा तयार केला होता. जिथे पाणी पडत होते. तिथे.... तिथे गोल गोल दगडाचे गोटे ठेवले होते. अशा वातावरणात नृत्ये सुरु होती. हे हॉटेल रात्रंदिवस सुरु असते. आम्ही सर्व प्रवासी म्हणत होतो की, ''विमानांत बिघाड झाला ते बरेच झाले. असल्या हॉटेलमध्ये आम्ही कशाला येतोय? आयुष्यात प्रथमच असले हॉटेल आम्ही बघितले. याच हॉटेलमध्ये लवकर

जेवून, लवकर झोपलो. तीन तासांची झोप झाल्यावर जाग आली रात्रीच एजंटनी सूचना दिली होती की,''पहाटे चारला विमानतळावर जायचे आहे.'' झोपतानाच लवकर उठायचे म्हणून झोपी गेलो. मनावर ताण होताच नि त्यामुळेच लवकर जाग आली. दोघेही भरभर आवरुन सामान घेवून खाली आलो आमच्याकडे घड्याळ नव्हते. मॅनेजरकडे चावी द्यायला गेलो ते आमच्याकडे पहात म्हणाले, ''जावून पुन्हा झोपा. अजून खूप अवधी आहे.'' परत खोलीत न जाता तिथल्या हॉलमध्ये आम्ही थांबलो. नंतर आमच्या ग्रुपमधील एक-एक प्रवासी येवू लागला. सहा वाजता बस आली. सहा वाजून वीस मिनीटांनी विमानतळावर पोहचलो. पूर्वीप्रमाणेच नावागावाचा फॉर्म भरला. एकूण पाच ठिकाणी पुन्हा आम्हाला तपासले म्हणजे आमची अंग झडती घेतली. सर्व झाल्यावर सकाळी दहा वाजता विमानाजवळ पोहचलो. सव्वा दहा वाजता विमानात बसलो. विमान खूपच मोठे होते गादीच्या आकर्षक खुर्च्या होत्या. विमानाच्या बाहेरच्या बाजूस ॲल्युमिनियमचा पत्रा वापरलेला असतो. आतील आवरण आकर्षक डिझाइन असलेले प्लॅस्टीकचे असते. खिडक्या खूप होत्या पण अगदी लहान होत्या तसेच त्या प्लॅस्टिकच्या आच्छादनाने बंद केल्या होत्या. प्रत्येक सीटच्या मागील बाजूस जाळी होती. त्यात कागदपत्रे ठेवता येतात त्या जाळीच्या वरच्या बाजूस दुमडणाऱ्या दोन फळ्या असतात. त्यावर अल्पोपहार किंवा जेवण ठेवून जेवायचे अथवा कांही लिहायचे असल्यास त्यावर ठेवून लिहीता येते. आता त्या फळीवर ठेवूनच लिहीत आहे. एस.टी.च्या दुप्पट आतील जागा आहे. अगदी पुढे दोन वैमानिक, एक असिस्टंट व एक इंजिनियर इ. गरजेप्रमाणे असतात. त्यानंतर प्रवासी बसले आहेत नंतर एक छोटी केबीन (खोली) आहे. त्यात प्रथमोपचाराचे सर्व साहित्य होते. त्यानंतर पुन्हा प्रवासी बसलेले आहेत. पुन्हा एक छोटी केबीन आहे. त्यात अल्पोहार व जेवणाचे साहित्य आहे. पुन्हा प्रवासी बसलेले आहेत. त्यामागे टॉयलेट आहे. त्याप्रमाणे पुन्हा एक केबीन आहे. तिथे अनेक कप्प्याचे सेल्फ आहे. खूप मोठे आहे. तिथे हँडबॅग्ज ठेवल्या जातात. तिथूनच एक जिना चढण्या उतरण्यासाठी आहे. विमानाचे पंखे हालत अगर फिरत नाहीत. मशिनच्या सहाय्याने विमान उडते. खरंतर पट्टा बांधण्याचा गरज नसते. पण विमान वेडेवाकडे उडू लागले की पडू नये म्हणून पट्ट्याची दक्षता घेण्यास सांगतात.

जत्रेत किंवा यात्रेत पाळणे असतात. त्यात बसून वर जाताना जसे वाटते, अगदी तसेच विमान उडताना वाटते. उडताना आवाज करत रनवेवरुन वेगाने धावले नि नंतर हळूहळू वर चढू लागले. नेहमी विमानांत बसणाऱ्यांना काय वाटते न कळे. पण माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीस नक्कीच हुरहूरते. मनावर दडपण येते. नंतर हळूहळू ते दडपण कमी होते.

दिल्ली सोडलीय, पण म्हणावा तसा वेग नाही की आंत बसणाऱ्यांना जाणवत नाही कोण जाणे? सकाळचे अकरा वाजलेत. प्रथम नाश्ता व नंतर जेवण होणार आहे. उशीर झाला आहे म्हणून नाश्ता न देता जेवणच दिले. जेवणात तीन तऱ्हेचे पाव, उकडलेल्या बटाट्याच्या फोडी, त्यावर एक प्रकारचा बुळबुळीत पदार्थ, लोणी, साखर, मीठ, मिरी इ. च्या पुड्या वगैरे होत्या. मी थोडे घेतले बाकीचे ''ह्यांना'' दिले.

''ह्यांनी'' प्रवासाबाबतचे कागदपत्र अगोदर तयार करवून घेतल्यामुळे व माझे नंतर करवून घेतल्यामुळे आम्हा दोघांचे सीट नंबर एकत्र आले नाहीत. मला खिडकीजवळ जागा हवी होती. सुदैवाने तशीच मिळाली मी खिडकीजवळ कडेच्या ओळीत होते, तर श्री.नायकवडी मधल्या ओळीत बसले होते. खिडकीतून बाहेर पाहिले तर वेग नाही असेच वाटत होते. पण विमान अतिशय वेगात होते. फक्त तीन तासात ताश्कंद ला पोहचलो. इथे उतरायचे असते म्हणून खाली उतरलो ताश्कंदचा विमानतळ मोठा आहे. पाऊस पडून गेला होता. हवा एकदम थंड होती. जमिनीवर पाय ठेवताच सारे शरीर थरारले. इथे विमानतळाच्या एका हॉलमध्ये एक फॉर्म देतात. त्यावर प्रत्येकाने आपल्याजवळील दागदागिने व रोख रक्कम याची नोंद करायची असते ''ह्यांनी'' एक फॉर्म भरुन घेतला. त्याप्रमाणे दुसरा मी भरला. दिल्लीत विमानात बसण्याअगोदर, पासपोर्ट एजंटनी घेतला होता. ताश्कंदच्या विमानतळावर सर्व काही चेक केल्यावर, कुठूनही मार्ग नाही अशा एका हॉलमध्ये थांबविण्यात आले. एका छोट्या फाटकातून बाहेर जाताना एक छोटी केबीन लागते. तिथे एक ऑफिसर असून तो सर्व पासपोर्ट एजंटकडून घेतो. तो पासपोर्ट त्या त्या व्यक्तीचाच

आहे कां ते ताडून पहातो. सही करुन त्या त्या व्यक्तीस देवून टाकतो. नंतरच फाटकातून बाहेर येता येते.

मोराचे पिस मॉस्कोत भेट देण्यासाठी दिल्लीत विकत घेतले होते ते पिस इथे या तपासणीत काढून घेतले गेले. आणखी प्रसंग सांगितल्याशिवाय रहावत नाही. तपासणीच्या घाईत, मी माझी पर्स तिथेच ठेवली. पट्टयावरुन जाणाऱ्या बॅगाबरोबर आम्ही दोघे पुढे पुढे गेलो. पर्स नसल्याचे नंतर माझ्या ध्यानांत आले. तोवर तिथल्याच ड्युटीवर असणाऱ्या एक बाई पर्स उंच धरुन, पर्स कोणाची म्हणून विचारत होत्या. पळत जावून पर्स घेतली. त्या पर्समध्ये सर्व कागदपत्र, डॉलर्सचे चेक व भारतीय रुपये (चलन) होते. पर्स हरवली असती अगर दिली नसती तर काय? या विचारानेच मनाचा थरकाप झाला. बाईंचे आभार मानून पट्टयावरुन बॅगा घेतल्या. तेवढ्यात श्री.नायकवडींना लघवीला जायचे होते. सर्व बाजूंनी हॉल बंद! टॉयलेट कोठे आहे हे माहीत नाही एका गृहस्थांना विचारले हिंदीत, मराठीत. मराठी शाळेत मुले करंगळी दाखवतात तशी शेवटी चक्क करंगळी दाखविली. त्या गृहस्थांना काही कळेना. मग आमच्या ग्रुपमधील कोणी म्हणाले ''टॉयलेट'' म्हणा ''टॉयलेट'' म्हटल्यावर त्या गृहस्थाने बरोबर नेले. पण आंत जाण्याअगोदर चार आणे किंमतीचे रशियन एक नाणे एका मशीनमध्ये टाकावेच लागते. ह्यांच्याकडे पैसे नव्हते. आता ''टॉयलेट'' मध्ये कसे जायचे? त्या गृहस्थाने एक नाणे मशिनमध्ये टाकले, नि एक नाणे ''ह्यांना'' दिले. पुन्हा प्रसंग आल्यास उपयोगी पडेल म्हणून.

श्रीमंतांची प्रवासी हॉटेल्सही श्रीमंतच. मोठी, भव्य व देखणी आहेत. मास्कोला पोहचण्यास उशीर होणार म्हणून इथे ताश्कंदमध्येच रात्रीचे जेवण दिले गेले. जेवणात विविध प्रकारचे पाव, गाजराचा खिस, लोणी इ. पदार्थ होते. जेवण झाल्यावर बिनदुधाची कॉफी दिली. वास्तविक संध्याकाळ झाली होती तरी खूप अंधार वाटत होता. टुरिस्ट बस आली. बसमधून आम्ही सर्वजण विमानतळावर आलो. विमान सज्ज होतेच उड्डाणाच्या अगोदरचा आवाज येत होता. बसमधून उतरुन विमानात बसू लागलो. पण तिथले एक अधिकारी, कोणत्या देशाचे कोण

जाणे ते विमानात चढू देईनात, विमानाचा तो मागील भाग होता. मागील पंखाजवळ एक केबीन होती. तिथे सर्व प्रवाशांचे सामान ठेवले होते तिथून विमानात चढता येत होते. पण चढू दिले जात नव्हते. तसेच पळत पुढील दाराजवळ गेलो. गडबडीने सर्वजण आत चढलो. मास्कोला जाणाऱ्या प्रवाशांनी विमान अगोदर भरले होते. जिथे जिथे सीट रिकामी होती, तिथे तिथे जागा दिली गेली. आमच्या ग्रुपमधील ह्यांच्यासह सर्वजण पुढे बसले नि मी एकटीच मागे बसले.

ताश्कंदमध्ये कुठे जाताच आले नाही. वेळच नव्हता. बसमधून मात्र पहाता आले. ताश्कंद हे सोव्हिएट संघ राज्यापैकी एक राज्य आहे. इथले रस्ते अतिशय मोठे आहेत. इमारती मोठ्या व प्रशस्त आहेत. १९१७ च्या क्रांतीदिनाची तयारी सुरु आहे. शहरात विविध ठिकाणी लाईटची रोषणाई केली आहे. मोठे मोठे बल्बही लावले आहेत. मोठ मोठे लाल ध्वज वाहत्या वाऱ्याने फडफडत आहेत. झाडे अतिशय उंच आहेत. झाडाखाली वाळलेल्या पानांचा खच पडला आहे. तशा गारठ्यातही स्त्री-पुरुष कामगार खूप कपडे घालून, हातमोजे घालून काम करत होते. इथे टॅक्सीज पुष्कळ आहेत. दिल्लीच्या विमानतळावर जेवढी विमाने होती, त्यापेक्षा खूपच विमाने या विमानतळावर आहेत. छोटी व मोठी दोन्ही प्रकारची आहेत. विमानाला टॅक्सीच्या टायरसारखी दोन चाके असतात. मध्यम विमानाला चार चाके असतात. अगदी मोठ्या विमानास दोन किंवा चार चाके असून साधारण दोन मीटर अंतरावर चार चार चाके दोन्ही बाजूस असतात, तसेच मागील बाजूस ही असतात. उड्डाणाच्या अगोदर विमान ह्या चाकांनीच धावपट्टीवर धावत असते नंतर साधारण एक दोन वेढे काढून अस्ते-अस्ते वर चढते. पंखे हालत नाहीत. पुढील बाजूस दोन्ही बाजूस दोन तसेच मागील बाजूस दोन पंखे असतात. पुढील दोन्ही बाजूस पंख्याखाली बॅरलपेक्षा मोठी ॲल्युमिनियमची एक किंवा दोन नळकांडी असतात. बॅरलसारखीच असून उघडी किंवा बंद असतात. विमान सुरू असतांना बाहेर जसा आवाज येतो तसा आतही येतो. वैमानिकाची केबीन पुढे असते. वैमानिक व त्याचे सहाय्यक तरुण व पॉश असतात.

दिल्ली ते ताश्कंद हा विमानातून आमचा पहिलाच प्रवास! तेव्हा बाहेर पहाण्याची प्रत्येकास तीव्र ओढ होती. सुदैवाने मी खिडकीजवळ असल्यामुळे बाह्य निसर्गदृश्यांचा आस्वाद घेता येत होता. प्रथम छोटी घरे, रस्ते व झाडे दिसली. आपल्याकडे दिवाळीचे किल्ले मुले करतात अगदी तसाच देखावा होता. नंतर त्याहीपेक्षा विमान वर गेले खाली वाळूच्या लहान, मोठ्या टेकड्या दिसत होत्या. त्यावर ढग कापसाच्या ढिगासारखे दिसत होते, विरळ ढग धुक्यासारखे दिसत होते. ढगांच्यावर दहा किलोमीटर ऊंचीवरून विमान निघाले होते. विमानाच्या पुढील बाजूस वर लाईट असतो. तसेच मागील बाजूस वर लाल लाईट असतो तो सतत लागलेला नसतो तर लागतो बंद होतो, लागतो बंद होतो, लहान मुले डोळे मिचकवतात तसे त्याचे सुरु असते. रात्रीच्या वेळी जमिनीवरून विमानाचे हे लाईट दिसू शकतात.

विमानाच्या आतील बाजूस छतास, छतातच बसविलेले बल्ब असतात. आतील बाजू सुबक असते. एस.टी. ला सामान ठेवण्यास वरील बाजूस रॅक असतात. अगदी तसेच विमानालाही असतात. ते बंद करता येतात. उदा. घरातील फडताळाप्रमाणे हे रॅक असतात. विमानाला लगेज रुम असते. प्रवाशांनी आपले सर्व सामान तेथे ठेवायचे व छोटे सामान या कप्प्यातून ठेवायचे असते.

ताश्कंदहून इथे मास्कोला अडीच तासात आलो. मी मागील बाजूने उतरले. श्री. नायकवडी पुढील बाजूने उतरले. लगेज रुममधील सामान गडी गाड्यावरुन नेतात, विमानात चढवतात, उतरवतात. हॉटेलच्या हॉलमध्ये किंवा खोलीमध्येसुध्दा पोहचवतात. त्यामुळे हातातील छोटी बॅग घेवून ''हे'' उतरले.

मॉस्कोच्या भूमीवर पाय टेकले नि क्षणात जाणवले की हाडे थिजताहेत, रक्त गोठत आहे. उद्याचा उत्सव कसा पहायचा ? ताश्कंदपेक्षा इथे भयंकर गारठा होता. गार, बोचरा वारा जोरदारपणे वहात होता. बर्फ पडत होते. आपल्याकडे जोराचा पाऊस आल्यावर जसे आपण निवारा पकडतो त्याप्रमाणे इथे विमानातून उतरुन धावत वेटींगरुममध्ये आलो. अक्षरशः सर्वजणच पळत होतो. वेटींगरुममध्ये आल्यावर थोडे हायसे वाटले. नंतर टुरिस्ट बस आली व आम्ही हॉटेलकडे गेलो रस्त्यावर फक्त

मोटारी धावत होत्या. पायी चालणारे कोणीही आढळले नाही. थंडीच फार, तर पायी कोण नि कसे चालणार ?

ताश्कंदमध्ये जेवणासाठी विविध तऱ्हेचे पाव, लोण्याचे बंडल, जॅम, मीठ, मिरीपुड, टोमॅटोचे सुप होते.

इथेही तसेच जेवण होते. पण इथे जेवणानंतर आईस्क्रीम दिले. सांगायचे म्हणजे जेवणात भात होता. थंडी असल्यामुळे इथले लोक पाणी पीत नाहीत. जेवणानंतर दारु पितात किंवा दुधाशिवाय चहा किंवा कॉफी पितात. आम्हा भारतीयांना मात्र प्यायला पाणी लागायचेच, जेवण हॉलमधून बाहेर आल्यावर पाणी हवे असेल तर विकत घ्यावे लागे. ते बाटलीबंद असे. अशा एका बाटलीस बारा रुपये पडत.

पंचतारांकित हॉटलेमध्ये रहाण्याची व्यवस्था केली आहे. १३ व १२ नंबरची सिंगल रुम ताब्यात घेतली आहे. या खोलीत हंडीटाईप तीन लाईट आहेत. कॉट नव्हते, दोन पलंग आहेत. त्यावर फोमच्या गाद्या आहेत, त्यावर पांढरेशुभ्र कव्हर आहे. पांघरण्यास रग आहेत रगलाही उशीसारखे कव्हर अभ्रा आहे. आणखी एक-एक रग होती मऊ मऊ उशा होत्या. उशीत कापूस किंवा फोम वा स्पंज नव्हते तर कोंबडीची पांढरीशुभ्र पिसे होती. खोली एअरकंडिशन होती. खोलीभर हिरवी जाड सतरंजी अंथरली आहे. एक गोल टेबल व दोन टीपॉय आहेत. एक मोठे चार ड्रॉव्हरचे टेबल आहे. संडास, बाथरुम, बाथरुममध्ये थंड-गरम पाण्याची सोय. आरसा, साबण, तीन टॉवेल्स इ. आहेत खोलीच्या दर्शनीभागावर डबल काच आहे. आतील बाजूने जोड पडदा आहे. भिंतीत खूप मोठे लाकडी कपाट आहे. वरच्या बाजूस सामान ठेवण्यासाठी रॅकसारखी जागा आहे. कपडे अडकवण्यास अनेक हँगर्स आहेत.

जेवण नेहमीच्या पध्दतीचे आहे. जेवण हॉलमध्ये लाईटचा झगमगाट आहे. हॉलमध्येच संगीताचे स्वर संगीताचे स्वर विहरत होते. वेटर व वेटर्सना गणवेश होता.

आज ७ नोव्हेंबर हा रशियाचा क्रांतिदिन आहे. आज लवकर उठायला हवेच होते. आजच्या क्रांतिदिनाच्या उत्सवासाठी तर भारतातून इथे आलो आहोत. दोघांनी

भरभर आवरले व सकाळी आठ वाजता खोलीतून गेलो. पावाची न्याहरी केली व परेड पहाण्यास गेलो एजंट मॅडम बाई बरोबर होत्या. तिथे असलेल्या एका अधिकाऱ्यांनी जाण्याचा मार्ग दाखविला फर्लांगभर अंतरावरुन परेड जाणार होती. आमच्याप्रमाणे इतर देशातून खूप लोक आले होते. बऱ्याच जणाजवळ कॅमेरे होते. हॉटलेच्या बाहेर पडल्याबरोबर अधिक वारा वाहू लागला व अधिक बर्फ पडू लागले. तरीही सर्व शरीर केसांपासून नखांपर्यंत झाकून सर्वजण परेड पहात होते. आम्हीही तसेच केले. नेहमीचे कपडे होतेच, शिवाय स्वेटर, कोट व वरुन शाल घेतली होती. गरम कपड्यांचे अक्षरशः ओझे व्हायचे. आपल्याकडे थंडीची लाट येते त्यापेक्षा इथे खूपच अधिक थंडी आहे.

सर्वात प्रथम पायी चालणाऱ्या परडेस् होत्या. नंतर शस्त्रसज्ज वहाने व क्षेपणास्त्रांची वहाने होती. रस्त्याच्या पलिकडे म्हणजेच लेनिनच्या चौकाच्या चारी बाजूनी रशियन जनता हातात लाल निशाणे व लाल गुलाबांचे गुच्छ, इतर फुलांचे गुच्छ व फुगे घेवून उभी राहिली होती. परेड संपल्यावर "सर्व" रशियन जनता व आम्ही ही परतलो. तोवर कपड्यावर बर्फाचा थर साचला होता. पिट्टी साखर असते तसे दिसत होते. रस्त्यावर, घरांवर, झाडाझुडपांवर सर्वत्र पांढरा थरच्या थर साचला होता. सर्व इमारतीची दारे बंद असतात. आत जायचे असेल तर ढकलून जायचे. नंतर ते आपोआप बंद होते. आज सर्वांना सुट्टी होती. शोकेसेस फक्त उघड्या होत्या. इमारती लाईटनी सुशोभित केल्या होत्या. मास्को नगरी एखाद्या नववधुप्रमाणे सजली होती. वऱ्हाडी माणसासारखे मास्कोवासी नटून थटून इकडे तिकडे मिरवत होते. राष्ट्राला उद्देशून राष्ट्राध्यक्षांनी दोन मिनीटेच भाषण केले. घोषणा वगैरे फारशा नव्हत्याच. बहुतेक हवामानाचा परिणाम असेल.

१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन व २६ जानेवारी प्रजासत्ताकदिन या दोन्ही दिवसांची परेड मी पाहिली आहे. ही परेड त्या तुलनेने मला कमी वाटली. भारतीय राष्ट्रीय उत्सवांत विविधता आहे. नृत्ये व सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित केलेले असतात. शिवाय प्रत्येक राज्याचे वेगळे देखावे असतात.

रात्री साडेसात वाजता बर्फ पडायचे पूर्ण थांबले. वाराही कंटाळला होता नि लोक भराभर रस्त्यावर आले. प्रथम आम्हाला काही कळालेच नाही. नंतर पाहिल्यावर कळले की सर्वजण लेनिन चौकात जात आहेत. या चौकात लेनिनचा पुतळा आहे. चौक मोठा आहे. इथून इतरत्र अनेक रस्ते जातात. चौकात फरशी नाही तर दोन वीत लांबी-रुंदीचे दगड बसविले आहेत. हे दगड काळेभोर आहेत.

हुतात्मा किसन अहिर विद्यालयातील श्री. डी. डी. पाटीलसर यांनी सांगितले होते, ''वहिनी, रशियाला जाताहात तर लाल चौकातील विभूती (माती) आणा.'' मी ''आणीन'' म्हणून सांगितले होते. सकाळी परेड पाहून हॉटेलकडे परत जात असताना, कोपऱ्यावर मातीच्या ढिगासारखा एक ढीग दिसला. माती समजून मी त्यातील थोडी घेतली ती अति थंड होती. उजव्या हातातून, डाव्या हातात करत हॉटेलच्या खोलीत गेले. उष्णता लागल्यावर त्यावरील काळसरपणा कमी झाला नि कळून आले की माती म्हणून घेतलेली माती नसून थरावर थर साचलेले बर्फ होते. सर्व वितळून गेले. पुन्हा मनाला काळजी लागून राहिली की अशा बर्फाच्छादित शहारांत विभूती कुठे मिळेल?

लोक लेनिन चौकात, लाल चौकात जात आहेत. आपणही जाऊया म्हटल्यावर आम्ही चौकात गेलो. खूप गर्दी होती. तिथे आनंदाचा, उत्साहाचा जल्लोष चालला होता. मुले, मुली, स्त्री-पुरुष सर्वजण बेहोष होवून नाचत होते. गाणे गात होते. इतर सर्वजण सभोवती उभे राहून पहात होते. क्रेमलिनच्या जगप्रसिध्द भिंतीपर्यंत जावून आलो येताना बर्फाने ओली झालेली विभूती आणली. खोलीत आल्यावर लाईटच्या आच्छादनावर ठेवल्यावर ती वाळली. रात्री १०.३० पर्यंत लोक लाल चौकात जावून परत येत होते. आपल्याकडे जसे सणाला देवळात जातात तसे लोक या लेनिन चौकांत येत होते. रात्री पुन्हा बर्फ पडू लागले. लोक घाईने परतू लागले.

भारत सोडल्यापासून सूर्यदर्शन नाही. आकाश सतत ढगाळलेलं, मग सूर्य कसा दिसणार! आपल्याकडे आषाढ महिन्यात चार-दोन दिवस सूर्य दिसला नाही तर आपण सर्वजण बेचैन होतो. घरांतल्या आजीसुध्दा म्हणतात की, ''दिस दिसला

न्हाई, सुर्व्यांच्या तोंडावर खांडूक झालंय जणू'' पण इथं अंधारलेल असतं सूर्यदर्शन तसे फारच दुर्मिळ असते. आजच चार ते पाचला फक्त एक तास सूर्य दिसला. मनाला थोडा उबदारपणा आला. शरीराला नव्हे, कारण कोवळे ऊन असते तसे ते ऊन होते. त्यात उबदारपणा अजिबात नव्हता.

लेनिन चौकांत जाण्याअगोदरच जेवलो होतो. गाजर-टोमॅटोची कोशिंबीर, बटाटे व टोमॅटोची भाजी, पाव इ. होते.

लाल चौकातून परतल्यावर रात्रीच कपडे धुतले. कपडे लवकर वाळण्यासाठी असे रात्रीच धुवावे लागत. खोली एअरकंडिशंड असल्यामुळे रात्री धुतलेले कपडे सकाळपर्यंत वाळत असत. चोवीस तास पाणी गरम असे. गरम पाण्यातच मी कपडे धुत असे.

आज तारीख ८ नोव्हेंबर ८८ मंगळवार असून आजच मास्को शहर पहायला जायचे आहे. भारतात आज दिवाळी ना! ही ''दिपावली'' सुख, शांति व समृध्दीची होवो! पहाटे उठले. माझे सर्व आवरुन ह्यांना उठविले. ह्यांनी स्वतःचे आवरले. खोलीतून खाली आलो. न्याहरी घेतली. पुन्हा खोलीत गेलो. कपडे व सामान आवरुन खाली आलो शहरांत जायचे म्हणून टुरिस्ट बसची वाट पाहू लागलो. मास्कोत आल्यावर आम्हास घड्याळे २.३० तास मागे करावी लागली. एजंटनी ठरविलेली बस आली, बसलो, नि सर्वजण निघालो. रस्त्याच्या दोन्ही बाजूस दहा ते बारा मजली इमारती दिसत होत्या. मोटारीच्या वहातुकीसाठी दोन निरनिराळे रस्ते होते. त्यावरुन ट्रॉली बसेस, बसेस, टॅक्सीस इ. वाहने धावत होती. दोन रस्त्यांच्या मध्यावरुन ट्राम गाडी येण्या-जाण्याचा मार्ग होता. रस्त्याच्या फूटपाथला लागूनच झाडे व हिरवळ होती. या रस्त्याखालूनच मेट्रो-भुयारी रेल्वे जात असून रस्त्याच्या दोन्ही बाजूस त्यांची स्टेशने आहेत. पायी चालणाऱ्यास रस्ता ओलांडायचा असेल तर भुयारी रस्त्यांनी ओलांडायचा. कांही ठिकाणी रस्ता ओलांडण्यासाठी सिग्नलही आहेत. इमारतीच्या तळमजल्यावर अपना बझार सारखी मोठमोठी दुकाने होती. इथे वस्तूवर किंमतीचे लेबल होते मास्को शहराची लोकसंख्या ८४ लाखाच्या जवळपास आहे.

भुयारी रेल्वे ज्या भागातून जाते, त्या त्या भागाचे नाव त्या त्या स्टेशनला दिले आहे. शहरांत एकूण तेरा राजमार्ग आहेत. एकूण तीस देशाशी गाडीने संपर्क साधला जातो. शहरांत एकूण पाच विमानतळ आहेत.

**मॉस्को शहराची रचना** : शहराची रचना सोय बघून केलेली आहे. राज्यकारभाराचे मुख्य ठिकाण क्रेमलीन हे असून ते मध्यावर आहे त्यामुळे एकूण वहातुकीवर समान ताण पडतो. मॉस्को शहर वर्तळाकृती वसले आहे. सभोवती दाट जंगल राखून ठेवली आहेत. त्यांत कांही रम्य स्थळेही आहेत. सुट्टीच्या दिवशी लोक तेथे जातात. शिवाय शहरांत उद्याने, झाडे भरपूर आहेत.

या संघराज्यात अजिबात बेकारी नाही. ''हम दो हमारे दो'' किंवा ''हम दो हमारे एक'' अशी भारतासारखी इथे अवस्था नाही. उलट इथे कामाला माणसेच अपुरी पडत आहेत. १९३० सालीच येथील बेकारी पूर्णपणे नष्ट झाली आहे. कामाला माणसे हवीत अशा जाहिराती लावलेल्या असतात. तसेच इथे शंभर टक्के साक्षरता आहे. मॉस्कोत दिवसशाळा व रात्रशाळा आहेत. व्होकेशनल व टेक्निकल शाळा आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनुसार शिक्षण दिले जाते. येथे ३२ मजले असलेली मॉस्को विद्यापीठाची इमारत आहे. दरवर्षी हजारो मुले सरकारी खर्चाने उन्हाळी सुट्टी हिरवळीच्या ठिकाणी पायोनियर कँपमध्ये घालवितात.

**वैद्यकीय सेवा** : येथे वैद्यकीय सेवा मोफत आहे. खरे म्हणजे रोगच होवू नये याचीच दक्षता घेतली जाते. शहराच्या अंदाजपत्रकातील पंचवीस टक्के खर्च ह्यावर होतो. शहरात सुसज्ज रुग्णालये आहेत त्यांत दक्ष व सेवातत्पर डॉक्टर्स व परिचारिका आहेत त्यामुळे आयुर्मान दुप्पटीने वाढले आहे. तसेच फ्ल्यूच्या साथीत मुलांना विशिष्ट किरण दिले जातात. त्यामुळे त्यांना रोगाची बाधा होत नाही.

**संस्कृतीची व कलेची जोपासना** : आरोग्य संवर्धनासाठी खेळाची अत्यंत आवश्यकता असते. मॉस्को शहरामध्ये खेळाची मैदाने, जिम्नॅशियम, पोहण्याचे तलाव इ. सुविधा पुष्कळच आहेत. तसेच बागा व उद्याने विपुल आहेत. इथे रंगीत

टी.व्ही. आहेत. तो आठ चॅनेल्सवर चालतो. टी.व्ही. वर मुलांचे खेळ, नाटके, सामने, गाणी दाखवितात. महिन्यातून शंभर तास मुलांचे कार्यक्रम दाखविले जातात. रशियन जनता रसिक आहे. शहरांत अनेक नाट्यगृहे आहेत. संगीतगृहे, नृत्यगृहे, सर्कशी, फिल्म स्टुडिओज, चित्रपटगृहे इ. आहेत. इथे अनेक हौशी कलासंघ आहेत.

एकट्या मॉस्को शहरात ४५०० पेक्षा अधिक वाचनालये आहेत. जगातील सर्वात मोठे लेनिन वाचनालय येथेच आहे. त्यामुळे ह्या वाचनालयाच्या जवळील स्टेशनला "**बिब्लिओटिका इमेनो लेनिना--लायब्ररी इन दी नेम ऑफ लेनिन**" असे नाव दिले गेले आहे. मुलांचे खास वर्तमानपत्र असून ते एक कोपेकला मिळते. एक कोपेक म्हणजे दहा पैसे होय. शहरात एकूण २४०० पुतळे व ऐतिहासिक इमारती आहेत. जुनी चर्चेस व ऐतिहासिक स्थळे जतन केलेली आहेत.

शहराच्या मध्यावरुन व क्रेमलिनच्या बाजूने "मस्कवा" नदी वाहते. तिच्यावर वहातुकीसाठी पूल बांधले आहेत. फ्लायओव्हर धरुन २०० पूल आहेत.

उपहारगृहास रशियन भाषेत "स्तलोवाया" व बूफेला "बूफेन" म्हणतात. रशियन भाषेत चहाला चाय व साखरेस साखरच म्हणतात. रशियन लोक चहा किंवा कॉफीत दूध घालत नाहीत. रशियन लोकांना आइस्क्रीम फार आवडते. वरुन बर्फ पडत असतो नि लोक चालता चालता आईस्क्रीम खात चालत असतात. रशियन लोक दिवसाला १७० टनापेक्षा अधिक आईस्क्रीम खातात.

२२ जून १९४१ रोजी नाझी जर्मनीने सोविएत रशियावर हल्ला केला. ८० डिव्हिजन्सनी हल्ला केला. हजारो विमान हल्ले चढविले तोफांचा मारा केला. परंतु ७ नोव्हेंबर १९४१ रोजी महान ऑक्टोबर क्रांतीच्या दिवशी सोविएत सेना लाल चौकातून सरळ आघाडीवर गेली. मॉस्कोतील पाच लाख नागरिक आघाडीवर होते. सोविएत सेनेने शत्रु सैन्यास मॉस्कोतून परतविले.

**क्रेमलिन व परिसर :** सोविएत संघाचा सर्व राज्यकारभार क्रेमलिनमधून चालतो. ११ मार्च १९१८ रोजी कम्युनिस्ट पक्षाची मध्यवर्ती समिती व सोविएत

सरकार लेनिनग्राड शहरातून मॉस्कोला आले. १२ मार्च रोजी ट्रिनिटी गेटमधून प्रथमच क्रेमलिनमध्ये प्रवेश केला.

''बोरोबिटस्की'' टेकडीवर हा किल्ला वसला आहे. क्रेमलिनच्या भिंती २२३३ मीटर लांब आहेत. त्याला एकूण पाच बुरुज आहेत. त्यापैकी ''स्पास्काया'' टॉवर हा अतिशय सुंदर आहे. येथून क्रेमलिनमध्ये जाण्याचा मुख्य राजमार्ग आहे. या बुरुजावर खूप मोठे घड्याळ आहे. सकाळी ६ वाजता व रात्री १२ वाजता मॉस्को रेडिओवर घंटेचे टोल ऐकू येतात. शिवाय प्रत्येक १५ मिनिटांनी गजर होत असतो. या घड्याळाचा मिनिट काटा सव्वातीन मीटर लांब आहे. क्रेमिलनच्या द्वारातून आत प्रवेश केल्यावर आपणांस सरकारी इमारती दिसतील. ह्याच ठिकाणी तिसऱ्या मजल्यावर कॉ. लेनिन यांची रहाण्याची जागा व अभ्यासिका स्मारक म्हणून ठेवण्यात आल्या आहेत. तेथे १०,००० पुस्तके असलेले एक वाचनालय आहे. लेनिन नवीन पुस्तकांची नोंद प्रथम स्वतः करत असत. परंतु ते काम नंतर दुसऱ्यावर सोपवण्यात आले. ते येथे चार वर्षापर्यंत राहिले होते. आजारीपणामुळे गॉर्की लेनिनस्की इथे १२ डिसेंबर १९२६ ला गेले. येथूनच पुढे फुलांची बाग व लेनिन यांचा पुतळा लागतो.

**युबोत्निक** : श्रमदानाचा दिवस, सोविएत संघराज्यात श्रमदानाचा दिवस १० मे हा पाळण्यात येतो. ''सुबोडा'' म्हणजे शनिवार होय. घरातील गृहिणी ज्याप्रमाणे एखादे राहिलेले काम करण्यासाठी जादा श्रम करते त्याप्रमाणे १० मे रोजी आपले नेहमीचे काम संपल्यावर मॉस्को कशागन रेल्वेतील कामगारानी स्वतःच निर्णय घेवून विनामूल्य जादा काम केले. आणि विशेष म्हणजे जादा केलेली ही कामे नेहमीपेक्षा जास्त झाल्याचे दिसून आले. त्यामुळे त्याठिकाणी नादुरुस्त इंजिने दुरुस्त करण्यांत आली. हे पाहून इतर कारखान्यातील कामगारांनाही स्फूर्ती मिळाली. त्यांनीही अशी राहिलेली कामे पूर्ण केली. तेव्हापासून ''सुबोत्निक'' हा श्रमदानाचा दिवस पाळण्यात येतो. १९८० साली झालेल्या ऑलिम्पिकचा सर्व खर्च सुबोत्निक मधून भरुन काढला गेला. १९८१ साली श्रमदान मिळकतीतून कॅन्सर रिचर्स सेंटर बांधले

गेले. तसेच १९८२ सालापासून असे येणारे उत्पन्न राष्ट्राच्या विविध कार्यासाठी उपयोगात आणले जात आहे.

**लाल चौक :** क्रेमलिनसमोर लाल चौक आहे. या चौकाला महान इतिहास आहे. या चौकाने झारशाहीविरुध्द लोकांनी केलेले उठाव पाहिले आहेत. १९१७ नंतर येथे कामगार क्रांतीचा लाल झेंडा डौलाने फडकू लागला. याच ठिकाणी १९१७ च्या क्रांतीत हुतात्मे झालेल्या वीरांचा दफनविधी मोठ्या इतमामाने करण्यात आला आहे. १९२४ साली आपल्या लाडक्या नेत्यास, लेनिन यांना येथेच लोकांनी निरोप दिला आहे. २४ जून १९४५ रोजी या चौकाने व्हिक्टरी परेड पाहिली आहे. सध्या दरवर्षी ७ नोव्हेंबर रोजी याच चौकात लष्करी संचलन होते. ते पहाण्यासाठीच आम्ही भारतातून इथे आलो आहोत.

**लेनिनची दफनभूमी व म्युझियम :** लाल चौकातच पण अगदी क्रेमलिनच्या भिंतीजवळ, लेनिनची मोठी कबर आहे. येथे सोविएत कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक व पुढारी लेनिन चिरनिद्रा घेत आहेत. थंडी अगर पाऊस असला तरी त्यांचे दर्शन घेण्यासाठी येथे लोकांची रांग लागलेली असते. कमीत कमी एक तास तरी असे उभे रहावे लागते. शवपेटीतील त्यांचा देह अजूनही सतेज आहे. लेनिन यांच्या कबरीपाठीमागे काही पुढाऱ्यांचे व साहित्यिकांचे दफन केले आहे. ह्या ठिकाणी दर तासाला पहारेकरी बदलत असतात. लालचौकासमोर जगातील मोठ्या मार्केटपैकी एक ''गुम'' नावाचे मार्केट आहे. या मार्केटची लांबी २५० मीटर आहे. काऊंटरची लांबी २.५ किलोमीटर आहे. रोज चार लाख लोक तरी या मार्केटला भेट देतात. जवळच लेनिन म्युझियम आहे. त्यांच्या जीवनाविषयी व कार्याविषयी माहिती देणारी एकूण ३४ दालने आहेत. लेनिन यांच्या पुस्तकांची भारतीय भाषात झालेली भाषांतरे येथे आहेत.

क्रेमलिन भिंतीच्या एका बाजूने अलेक्झांडर बागा आहेत. तिथेच अनेक स्तंभ आहेत. त्यावर समाजवादी तत्ववेत्ते व क्रांतीकारकांची नावे आहेत. या स्तंभाचे उद्घाटन ७ नोव्हेंबर १९१८ ला झाले आहे. येथेच ८ नोव्हेंबर रोजी अनामिक सैनिकांचे स्मारक उभारले गेले आहे. येथे अखंड ज्योत तेवत असते. त्या खाली ''तू

अनामिक आहेस पण तुझे कार्य अमर आहे'' असे कोरले आहे. १९४२ ते १९४५ सालांत देशासाठी प्राणार्पण केलेल्यांचा तिथे उल्लेख आहे. लेनिनग्राड, कीव्ह, व्होल्गोग्राड, ओडेसा, तुलानेस्ट, फोस्ट्रेस इ. शहरांतून अनेक वीर देशासाठी लढण्यास आले, तर कांही हुतात्मे झाले. म्हणून ९ मे या विजयीदिना दिवशी संबंध संघराज्यभर एक मिनीटभर स्तब्ध राहून ज्ञात- अज्ञात हुतात्म्यांना श्रध्दांजली वहाण्यात येते.

लाल चौकांतून जरा पुढे गेल्यावर स्वर्डलोव्ह स्क्वेअर किंवा चौक लागतो. त्यापुढे जगप्रसिध्द बोल्शाय थिएटर आहे. त्याला पाच मजले असून, एकावेळी त्यांत २००० प्रेक्षक बसू शकतात. नव्या सोविएत प्रजासत्ताकाच्यावेळी परिषदा, सभा व पक्ष अधिवेशने येथे भरविली जात असत. सांगायचे म्हणजे येथे लेनिननी तीसपेक्षा जास्तवेळा भाषण केले असा तेथे फलक आहे. येथेच ३० डिसेंबर १९२२ ला ''सोविएत संघ'' निर्माण करण्याचा निर्णय घेतला गेला. जवळच मुलांच्यासाठी ''सेंट्रल चिल्ड्रन थिएटर'' आहे. सोविएत युनियमध्ये मुलांकरिता पन्नासपेक्षा अधिक थिएटरस आहेत. येथे जवळच थोडे बाजूला ''सूम'' नावाचे मोठे मार्केट आहे. तसेच ''डेंझी मिर'' (मुलांचे जग) हे चार मजली मार्केट मुलांच्यासाठी आहे. इथे मुलांसाठी सर्व म्हणजे सर्व तऱ्हेचे साहित्य, कपडे, पुस्तके, कमी अधिक किंमतीची छोटी मोठी खेळणी इ. मिळते. येथून जवळ मार्क्स अव्हेन्यू व मार्क्सचा पुतळा आहे. येथेच जगप्रसिध्द लेनिन वाचनालय आहे.

क्रेमलिनच्या दुसऱ्या बाजूस ''रोसिया'' हॉटेल आहे. या हॉटेलात एका वेळी पाच हजर पाहुण्यांची सोय होवू शकते. मुंबईतील फोर्ट भागासारखा कांहीसा हा भाग आहे.

मॉस्को पहातांना आमचे सहप्रवासी मुंबईचे श्री.वगळ आडनावाचे वयस्कर वकील आमच्या बरोबर होते. ते पहात पहात ग्रुप सोडून कोठे दुसरीकडेच गेले. थोडा वेळ वाट पाहून बस हॉटेलकडे आली. अर्ध्या तासाने टॅक्सीने श्री.वकीलसोा हॉटेलकडे आले. हॉटेल जवळ असल्यामुळे चुकण्याचा प्रश्न नव्हता. त्यावेळी संध्याकाळचे सहा वाजले होते, तर रात्रीचे आठ वाजल्यासारखे वाटत होते, नेहमीचेच जेवण तेथे

केले. कारण रात्री साडेनऊला स्टेशनवर जायचे होते. रेल्वे रात्री बरोबर अकराला होती, दहा तासांच्या प्रवासानंतर आम्ही लेनिनग्राडला पोहचणार आहोत बस आली. प्यूनने बॅगा बसमध्ये चढविल्या. आपल्याकडे सामान एस. टी. च्या टपावर ठेवतात. इथे बसला सामान ठेवण्यासाठी साईडला, सिटिंग प्लेसच्या खाली जागा असते. तसेच डोक्यावरच्या बाजूसही रॅक असतात. इथे प्रत्येक वाहनांत हीटर असतो. बसला हीटर असल्यामुळे थंडी वाजत नव्हती. बसने स्टेशनवर आलो. बर्फ पडू लागला. गाडी उभी होतीच. पळापळ, गोंगाट कांही नाही. आश्चर्य वाटले. भारतीय स्टेशनवरील कोलाहल व येथील स्टेशनवरील शांतता, दोन्हीत जमीन अस्मानचे अंतर! सीट रिझर्व्ह केल्याप्रमाणे आम्ही पहिल्या वर्गाच्या डब्यात बसलो. पहिल्या वर्गाचा डबा म्हणजे अलिशान सुंदर खोलीच! दोन बाक, दोन्ही बाजूस बसण्यासाठी. दोन बर्थ झोपण्यासाठी. या चारीवर गादी, गादीला कव्हर, उशी, उशीला कव्हर असून उशी गादीला आणखी एक एक कव्हर असते. छोटी फळी टीपॉयसारखी दोन्ही बाकाच्यामध्ये खिडकीच्या बाजूला आहे. त्यालाही कव्हर आहे. उशाजवळ दोन्ही बाजूस लिहिण्यासाठी अगर वाचण्यासाठी बल्ब आहेत. त्या बल्बखालीच रेडिओचे बटन आहे. रेडिओवरील प्रोग्रॅम ऐकण्याची अशी सोय होती. पाठ टेकतो तिथे जाळीचे पॉकेट आहे. कागदपत्रे व पर्स ठेवण्यासाठी तिथेच आता पर्स ठेवली आहे. त्यापलिकडे स्टीलची छोटी दांडी आहे. त्यावर ''ह्यांची'' पॅंट ठेवली आहे. त्याखाली इलॅस्टिकची पट्टी आहे. त्यात खोवून ठेवता येते. त्यांत स्कार्फ ठेवला आहे. त्या जवळ हूक आहे. त्याला स्वेटर अडकवला आहे. छताला डबल ट्यूब लाईटस आहेत. प्लॅटमध्ये असते तशी सामान वर ठेवण्यास जागा आहे दार बंद करण्यास दोन कड्या आहेत. दार बंद केले की दाराच्यामागे सुंदर आरसा आहे. ओळीने असे कंपार्टमेंटस आहेत. दाराच्या बाहेर विरुध्द बाजूस फोल्डींगच्या खुर्च्या आहेत. खुर्चीवर बसून बाहेरील दृश्य पहाण्याची अशी सोय केलीय. खिडक्यांना गज, काचा व डबल पडदे आहेत. डब्यात खाली गालीचे अंथरलेले आहेत. या तुलनेने भारतीय रेल्वे रफ अँड टफ आहे असे म्हणावे लागते. डब्याच्या बाहेर चहाची सोय आहे. एक पेलाभर चहा, दूध न घातलेला एक रुबलला दिला जातो. चहा देण्यासाठी खास

बाया असतात. स्वच्छता करण्यास स्त्री प्यून असतात. पलिकडेच संडास, बेसीन, गरम पाणी, आरसा इ. आहे.

मॉस्कोचे लोक एकूण उंच, धिप्पाड, देखणे, हळू बोलणारे व अधिक जलद चालणारे आहेत. स्त्रियांही तशाच सुंदर, देखण्या, उंच व ताडमाड चालण्याऱ्या आहेत. छोटी मुले असली तर ती सुध्दा शांत असतात. बँ-बँ करणं, किंवा रडणं, भेकणं नाही. मुलाला कडेवर न घेता छोट्या बाबागाडीत बसविलेले किंवा झोपविलेले असते. मुलाचे सर्व शरीर गरम कपड्याने आच्छादलेले असले तरी चेहरा उघडाच असतो तरी बर्फ वाऱ्याने गारठून ते रडत नाही. स्वस्थ इकडे तिकडे टुकूटुकू पहात असते.

बोलाचालीतून समजले की सात नोव्हेंबर क्रांतीदिनादिवशी सर्व जगातून लोक येत असतात. येथे मोकाट फिरणारी जनावरे व कुत्री कोठेच आढळली नाहीत. मला तर वाटते की सर्वात जास्त कुत्री असणारा देश भारत हा जगात एकमेव असेल. मालकाने धरलेली, गळ्यांत पट्टा बांधलेली व साखळी असलेली कुत्री अगदी कमी आहेत. उघडीप असल्यावर एखादा कावळा उडत असतो. कावळा गर्द, चकचकीत काळाभोर असतो. तसेच पाळीव चारदोन कबुतरे व चिमण्याही दिसल्या. वृक्षवेली-वृक्षच आहेत. वेली नाहीतच. बर्फ वर्षावामुळे निष्पर्ण आहेत. पुरे आता रात्रीचे साडेबारा वाजलेत. लोक आता निद्रादेवीच्या प्रेमलिंगनांत मश्गुल आहेत. Good Night.

आज ता. ९-११-८८ बुधवार आहे. सकाळी ८.३० ला लेनिनग्राडला पोहचलो. आपल्याकडे सकाळी सहाला जसा प्रकाश असतो, तसा इकडे सकाळी ८.३० ला होता. आगगाडीतून उतरलो. एजंटसह इतर सहप्रवासी बसमध्ये जावून बसले. आम्ही दोघे प्लॅटफॉर्मवरच "ह्यांना" आपल्या बॅगा लगेजच्या गाडीत ठेवायच्या होत्या. वास्तविक प्यून ठेवतात. आपण कांहीही करायचे नसते. एकदा सामान प्यून कडे दिले की फुटले, हरवले तर प्यून व रेल्वे जबाबदार असते. बॅगा "ह्यांनी" उचलून ठेवीपर्यंत मध्ये कांही वेळ गेला. मीही ह्यांच्याकडे पहात उभी

राहिले नि आमचे लोक कोणत्या दिशेला गेले कळले नाही लोक गेले. त्यांच्या विरुध्द दिशेला दीड फर्लांग प्लॅटफॉर्मवरुन चालत जावून पाहिले. जिकडे गेलेच नाहीत तिकडे कसे दिसतील. पुढे दिसत नाहीत म्हणून परतलो. आमच्या सारखेच श्री. वगळ वकील चुकामूक झालेले होते. आमच्या ग्रुपचे लोक इतक्या झटकन दृष्टीआड झाले होते की, वकीलसोा नाही समजले की कुठल्या दिशेला गेलेत. प्लॅटफॉर्मवरुन निघालो. स्टेशन खूपच मोठे होते. स्टेशनच्या बाहेर आलो. थंडी मी म्हणत होती. बर्फ पडत होते. स्टेशन बाहेर मोठा चौक होता. सगळीकडूनच माणसे जातही होती नि येतही होती. पन्नासात एखाद्यास इंग्रजी येते. मराठी, हिंदी कोणालाही येत नाही. फक्त India शब्द सर्वांना कळतो. मग ते आपल्या देशाचे नांव सांगतात. खूप प्रवासी, अगदी जगातले मॉस्को, लेनिनग्राड, सोविएत संघ राज्यात प्रवासात येतात. मेक्सिको, समरकंद, फ्रान्स, ब्रिटन, पोलंड एवढ्या देशांचे प्रवासी तरी भेटले. नि काय तेवढ्यात ''हे'' ही दिसेनासे झाले. आता आली कां पंचाईत? आता हो काय करायचे ? कांहीशी गांगरुन मध्येच मी उभी राहिले. क्षणभर इतके अपसेट झालं की पुढे काय? थोड्या वेळात स्वतःस लगेच सावरले. श्री. नायकवडी शोधण्यास येतीलच असे प्रथम वाटले. नंतर वाटले, नाही आले तर टी.व्ही.केंद्रावर जावे काय? इतक्यांत ह्यांची हाक ऐकू आली, ''इकडे ये'' जीव भांड्यात पडला. फार उशीर झाला म्हणून इतर सर्वजण कटकटत होते. श्री.वगळ आमच्याबरोबर आले नाहीत. ते आणखी कोठे गेले. नि आले तेंव्हा म्हणू लागले की, ''मला सोडून आलात.'' श्री.नायकवडींनी एका पोलीसाला खुणेने Indian group कोठे गेला असे विचारले. तेंव्हा पोलिसाने पाहिले होते म्हणून Indian या शब्दावरुन भारतीय प्रवासी गेलेली दिशा दाखविली. पण ''ह्यांनी'' त्या पोलीसास आमची बस दाखवेपर्यंत सोडलेच नाही. बस दिसल्यावर त्याचा हात सोडून दिला. बसमधून हॉटेलमध्ये आलो. हॉटेल अतिशय मोठे व प्रशस्त होते. प्रथम छोटा चौक होता. तिथे रखवालदार होता. पुढे विस्तृत मोठा आडवा हॉल होता. हॉलमध्ये विविध स्टॉल होते. त्याच्यापुढे सहा लिफ्टचा छोटा हॉल होता. लिफ्टस स्वयंचलित होत्या. मॉस्कोमधील हॉटेलचा जिना पितळ या धातूचा होता. लेनिनग्रांडमधील आजच्या हॉटेलचा जिना संगमरवरी होता. जेवणाचे व न्याहरी घेण्याचे अनेक हॉल होते. हॉल मोठे व प्रशस्त होते. खुर्च्या शिसवी लाकडाच्या

असून वा बैठक आहे. टेबल्स् शिसवी लाकडाचे असून चकचकीत आहेत. जेवण नेहमीप्रमाणेच असून जेवणाचा दर्जा जरा कमी वाटतोय. पितळेची मोठी नळकांडी व त्यावर गोल किंवा चौकोनी मोठी, जाड काच टेबल म्हणून लावले आहे. छताला झुंबरे आहेत. त्यांत लाईट लावले आहेत, इतके लावले आहेत की डोळे दिपतात. जेवणाच्या हॉलमध्येच, बाजूस वाद्याचा संच आहे. वेटर्स व वेटरेस अतिशय ॲक्टिव्ह आहेत. विविध स्टॉल वर बहुतेक स्त्रियाच आहेत. प्रवाशांशी सर्व नीट वागतात. हॉटेलच्या दर्शनी भागातून आत आल्यावर एक संगमरवरी चौकोन आहे. त्या चौकोनाच्या एका बाजूस एका स्त्रीचा पुतळा आहे. त्या पुतळ्याच्या हातातून करंगळी एवढे पाणी त्या चौकोनात पडत असते, पडलेले पाणी ॲटोमॅटिकली वाहून जाते. हॉटलेच्या आतच विविध वनस्पतींच्या कुंड्या शोभेसाठी ठेवल्या आहेत. बाहेर बर्फात वनस्पती रहातच नाहीत. बाहेरच्या झाडावर सहा इंच बर्फाचा थर आहे. सर्वत्र बर्फ साचलाय. मॉस्कोपेक्षा बर्फ अधिक पडलेले दिसतयं. स्त्री-पुरुष कामगार छोट्या मोठ्या फावड्यांनी बर्फ गोळा करुन त्यांचे ढीग करतात. नंतर तिथे ट्रक येतात आणि ॲटोमॅटिकली भरले जातात, नि शहराच्या बाहेर दूर ओततात किंवा नदीच्या पात्रात ओततात. बर्फ काढून रस्ते अगोदर वहातूकीसाठी मोकळे करतात. वाळूतून चालताना जसे वाटते तसेच बर्फातून चालतांना वाटते. अनेकजण एकाच वाटेने गेले की ती पायवाट बनते. आपल्याकडे जसे मातीच्या पायवाटेवरुन जावून, पावसाळ्यात निसरडे होते व घसरले जावून पडायला होते. अगदी तसेच बर्फाच्या पाऊल वाटेवर घसरुन पडायला होते. सकाळी साडेनऊला हॉटेलमध्ये आलो. खोली ताब्यात घेतली. प्रातःविधी उरकले. न्याहरी घाईनेच करुन, बसने लेनिनग्रांड दर्शन करण्यास गेलो. इथे इमारती मोठ्या तशाच भक्कमही आहेत. रस्ते डब्बल असून प्रशस्त व स्वच्छ आहेत. या नदीवर अनेक भक्कम पूल आहेत. या पूलावरुन अहोरात्र रहदारी सुरु असते. नदीचे पात्र खूप मोठे आहे. पाणी भरपूर आहे. पात्रात इंजिनवर चालणारी जहाजे व बोटी आहेत. नदीच्या दोन्ही कडा भिंतीनी भक्कम बांधून घेतल्या आहेत. पात्रांत पडलेले बर्फ एकत्र येवून ते कागदाप्रमाणे, विविध आकारात तरंगत होते. तसेच सूर्याचे सोनेरीकिरण त्यावर पडल्यावर ते स्फटिकासारखे चमकत होते.

शहरात चर्च अनेक असून मोठी भव्य आहेत. झारचा राजवाडा बाहेरुन पाहिला. बाहेरुनही त्याच्या भव्यतेची कल्पना येते. राजवाड्यावर विविध नक्षीकाम आहे. तसेच पुतळेही आहेत.

रस्त्यावरुन पुष्कळ बसेस धावतात. दारे उघडण्याची किंवा बंद करण्याची कळ ड्रायव्हरजवळ असते. दारे मागे पुढे असतात. बसेस आपल्याकडील बसपेक्षा प्रशस्त असतात. टॅक्सीज भाड्याने खूप मिळतात. ट्रॅम्स विजेवर चालतात. हे आपल्याला माहित आहे पण तिथे ट्रॅम्सप्रमाणे विजेवर चालतातच. पण काही बसेसही विजेवर चालतात. त्यांना ट्रॅम्सप्रमाणे रुळ लागत नाहीत. इथे टांगा, रिक्षा, स्कूटर किंवा सायकल मुळीच नाहीत. बस, टॅक्सी किंवा रेल्वेने प्रवास केला जातो. दुपारी साडेबाराला हॉटेलवर येवून जेवून, गरम कपडे घालून पुन्हा शॉपिंगला गेलो, पण आज दुकाने बंद असण्याचा दिवस होता. प्रत्येकी चार, चार रुबल्स देवून टॅक्सीने खोलीवर परतलो. येताना ह्यांनी दोन इंग्रजी वर्तमानपत्र विकत घेतलीत पण एकही ओळ वाचली नाही. माझ्या कॉटवर पडली आहेत. आता वाचायचे तर खूप उशीर झाला आहे. हे तर झोपून दोन तास झाले आहेत.

हॉटेल १९ मजल्यांचे आहे. आम्हाला खोली १२ व्या मजल्यावर मिळाली आहे. खोली प्रशस्त आहे. उभ्या रेषा असलेल्या भिंती आहेत गालिचासारखे हिरवे जाजम खोलीभर आहे. दोन छोट्या टयूब लाईटस आहेत. मोठा टी.व्ही.,एक आडवे मोठे टेबल व तीन खुर्च्या आहेत. बेडस तयार असून पांघरण्यास दोन दोन रग्ज आहेत. थंड गरम पाण्यासह बाथरुम सज्ज आहे. हँगर स्टीलचे असून एका बाजूस संपूर्ण भिंतभर आरसा आहे. खोलीत रस्त्याकडील बाजूस जाड काच असून त्यावर जाळीदार नक्षीचा आकर्षक पडदा रुळत आहे. असो. बराच उशीर झाला आहे. Good Night.

आज गुरुवार असून नोव्हेंबरची दहा तारीख आहे. आज लेनिनग्रांड मधील म्युझियम पाहिले. म्युझियममध्ये निसर्गचित्रे व लढाईची चित्रे आहेत. संगमरवरी व पितळेचे पुतळे आहेत. चित्रे मोठी आहेत. मला वाटते की भारतातील, महाराष्ट्रातील

औंधचे संग्रहालय मोठे असून त्यात विविध विभाग आहेत. म्युझियम पाहून झाले तेव्हा बारा वाजले होते. एजंटनी सांगितले की ४५ मिनिटे आहेत. शॉपींग करुन या सर्वांबरोबर आम्हीही गेलो. नि पुन्हा आमचे पुढचे लोक दिसेनात. कालचा चुकलेला अनुभव ताजा आहेत. म्हणून आम्ही व इतर काहीजण सरळ बसमध्ये येवून बसलो. ४५ मिनीटे होवून गेली. एक तास झाला, दीड तास झाला. निम्मेजणसुध्दा वेळेवर परत आले नाहीत. पावणेदोनला निर्णय घेतला की आहेत तेवढे हॉटेलकडे परतूया, राहिलेले नंतर येतील. बस हॉटेलकडे आली. खोलीवर जाऊन कपडे बदलून जेवणास गेलो. गुरुवार दुपारीच सोडावा लागला. इथे फळांचे स्टॉल्स आढळले नाहीत. तसेच आपल्याकडच्या सारखे ओपन वर फळ विक्रेतेही नाहीत. मग फराळाला फळे कोठून मिळणार! येतांना शेंगदाणे भाजून आणलेले आहेत. जेवल्यानंतर दुपारी भारत-रशिया मैत्रीसंघात गेलो. तिथे असलेल्या वरिष्ठांनी स्वागत गेले. प्रवाशापैकी दोघांनी तिथल्या लोकांना कांही भेटी दिल्या. आम्ही कोणाला कांही दिले नाही नि त्यानीही आम्हास कांही दिले नाही. बातचित इंग्रजी व हिंदीत झाली. मैत्रीसंघामार्फत लेनिनग्रांडची चित्रे असलेले छोटे पुस्तक दिले. खरे म्हणजे इतक्या दुरुन आम्ही भारतीय आलो आहोत. म्हणजे त्यांनी चहा-कॉफी कांही द्यायला हवे होते. पण कांहीही दिले नाही तिथले एक अधिकारी भारतात आले होते तसेच ते महाराष्ट्रतही आले होते. सांगलीतील पटवर्धन राजांना भेटल्याचे त्यांनी सांगितले. ते मराठी सुंदर बोलत होते. शेवटी एक महिती फिल्म दाखविली नि कार्यक्रम संपला. मैत्रीसंघाची इमारत खूप मोठी व भव्य आहे. व्यासपीठ आहे श्रोत्यांसाठी बसण्यास खुर्च्या आहेत. आम्ही या खुर्च्यांवर बसून राहिलो आणि आमच्या सहप्रवासी स्त्री-पुरुष यांनी एक नृत्य सादर केले. त्या नृत्यात रशियन मुलीही सामील झाल्या. कांहीजणांनी कां आलो आहोत व काय वाटते हे सांगितले. मैत्रीसंघाच्या इमारतीतच चित्रांचा स्टॉल होता. त्यांत लेनिनग्रांड शहराची चित्रे व इतर चित्रेही होती. तसेच तिथे रशियन पुढाऱ्यांचे बिल्लेही विकण्यास ठेवले होते. लेनिनग्रांड दर्शनची दोन पुस्तके व एक डझन बिल्ले, भारतात परतल्यावर मुलांना देण्यासाठी घेतले.

लेनिनिग्रांडला मुंबईची कु.पल्लवी प्रदीप देशपांडे ही मुलगी मेडिकल कॉलेजमध्ये असून ती पहिल्या वर्षाला आहे. इथे मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यास

८० टक्के गुण लागतात. प्रथम येतांना व शिक्षण पूर्ण करुन जातांना विमानभाडे अजिबात लागत नाही. विमानभाडे पूर्ण माफ असते. सात वर्षाचा कोर्स असून इंटर्नशिपचे एक वर्ष असते. पल्लवीने सांगितले की, 'मला इथे दरमहा ९० रुबल्स स्टायपेंड दिला जातो.' एक रुबल म्हणजे दहा रुपये, बघा तिला किती रुपये दरमहा स्टायपेंड मिळतो ते. पल्लवी व तिची मैत्रिण स्वयंपाक हाताने करुन खातात. कॉलेजच्या मेसमध्ये जेवण घेत नाहीत. पल्लवीच्या वडिलांनी तिला देण्यासाठी फराळाचे पॅकेट आमच्याकडे देवून, तिला पॅकेट घेवून जाण्याविषयी तार केली. त्यामुळे तिने मैत्रीसंघात येवून आमची भेट घेतली. तिला घेवून हॉटेलवर आलो. तिचे पॅकेट तिच्या स्वाधीन केले. पल्लवी ही गोड मुलगी आहे. ती नक्कीच एक यशस्वी डॉक्टर होवून भारतीयांची सेवा करण्यास भारतात येईल. तिनेही दिपावलीची ग्रिटींग कार्डस वडिलांना देण्यासाठी आमच्याजवळच दिली आहेत. तिला दहा रुबल्स भेट म्हणून दिले. ती परत तिच्या होस्टेलकडे गेली. आम्ही जेवण्यासाठी गेलो. बाहेर बर्फ पडतच होते. थरावर थर साचल्याने ते खडकासारखे ठणक व कठीण बनले आहे. बर्फ अक्षरशः पहारेने फोडून रस्ता साफ केला जात होता.

मुख्यतः म्युझियम पहातांना ध्यानांत राहिलेली गोष्ट म्हणजे म्युझियमची देखभाल करण्यासाठी वयस्कर स्त्रियाच होत्या. त्यांना विरंगुळा व जगण्याचाही आधार म्हणून असे सोपे काम त्यांच्यावर सोपविले असावे. या सर्व स्त्रिया प्रेक्षकांशी खूपच चांगल्या वागत होत्या. एखाद्या ठिकाणी हात लावायचा नसताना हात लावला तर रागवत नव्हत्या, तसेच आमच्या जवळ आमच्या पर्सेस होत्या त्या बाहेर ठेवण्याची सक्ती नव्हती. या उलट औंधचे संग्रहालय पहातांना औंधच्या संग्रहालयांतील कर्मचारी प्रेक्षकांना अतिशय हिडीसपणे वागवतात. पर्समध्ये पैसे अगर कांही मौल्यवान वस्तू असेल तरी पर्स बाहेरच ठेवली पाहिजे अशी औंधच्या संग्रहालयात सक्ती आहे. म्हणूनच म्हणावसं वाटतं की चांगल्यांचे चांगुलपण हे नेहमीच स्तुतीप्रद असते. रशियन स्त्रिया आमच्याशी चांगल्या वागल्या हे त्यांच्या माघारी मी म्हणत आहे नि म्हणत राहीन.

आज शुक्रवार ११ नोव्हेंबर ८८ आहे. दिवस कसा संपतो कळत नाही. काल हॉटेलवर येतांना आम्ही ट्रामने आलो. ट्रामसेवा टूरिस्टना फ्री आहे. स्थानिक लोकांना

पैसे घेतात म्हणजे तेथील रहिवासी तिकीट घेतात. ट्राम स्टॉप पुष्कळ असतात. दाराजवळच तिकिट पंच करण्याचे मशीन असेल त्या ठिकाणी उतरायचे. उतरलेल्या ठिकाणचे काम झाले की पुन्हा ट्रामध्ये बसायचे, पहिले तिकिट असतेच. उतरतांना पुन्हा तेच पंच करायचे व ठेवायचे उतरुन काम करुन पुन्हा ट्राममध्ये बसायचे म्हणजेच वहातूक स्वस्त आहे. ट्रामगाडी तर फारच स्वस्त पण टॅक्सीचे दर मात्र महाग आहेत.

आज लवकर उठायचे हा ताण मनावर होताच. काल रात्रीच कपडे धुतले. दिवसभराचे थोडेसे लिहून झोपायचे म्हटले तरी उशीर झालाच. उशीरा झोपूनही रात्री दीडलाच जाग आली. डोळे दुखत होते, तरी उठणे भाग होते. उठून सर्व उरकले. मी गीतेतला एक अध्याय दररोज वाचते. गीतेतला अध्याय वाचला. नंतर श्री. नायकवडींना उठविले "ह्यांनी" अगोदर खाली कार्यालयात फोन करुन किती वाजले विचारले क्लार्कने अडीच वाजल्याचे सांगितल. पुन्हां झोपलो. साडेपाचला उठून ह्यांनी स्वतःचे आवरले. मी सामान आवरले नि सामानसहीत खाली आलो. सामान ठेवून न्याहरीसाठी गेलो. रशियात नाश्ता केंव्हाही घेण्याची पध्दत आहे. न्याहरीचे पदार्थ मर्यादितच होते. शिवाय दर्जाही चांगला नव्हता. न्याहरीनंतर बसमधून विमानतळावर आलो. वेटींगरुममध्ये आलो तेव्हढ्यात विमान सज्ज होते. विमानांत बसलो. विमानात नंबरप्रमाणे बसायचे असते. पण आज इच्छेप्रमाणे हवे तिथे बसलो. मला खिडकीजवळ बसायचे होते, तिथे मला जागा मिळाली. "हे" मागे जावून बसले माझ्याशेजारी पाटण्याच्या श्रीमती सुशिलादेवी बसल्या. त्यांना एकच मुलगी असून ती मॉस्को मेडिकल कॉलेजमध्ये पहिल्या वर्षाला आहे.

सकाळचे दहा वाजलेत. लेनिनग्रांड सोडून विमानाने "सोची" या शहराकडे उड्डान केले आहे. आज सूर्यदर्शन नऊ वाजताच झाले विमानाने वेग घेतलाय. विमानतळ विस्तृत आहे. रनवे विशाल आहे अनेक विमाने येवून थांबली आहेत. आमच्या विमानाचा नंबर ८२४५ आहे. खालील रस्ते काळभोर दिसत आहेत. इमारती अगदी छोट्या दिसत आहेत. विमान अगदी उंच उडाले आहे. ढगावरुन प्रवास सुरु झाला आहे. ढग नव्हेतच, कापूस आहे असे भासत आहे. फक्त दोन तासात "सोची" शहरांत पोहचणार आहोत. विमानाचा आवाज फार होत आहे. आता ढगांचा कापूस न भासता वाळवंट भासत आहे पांढरे, धुरकट वाळवंटच जणू

काय इतस्ततः पसरले आहे. वरचे आकाश निळेभोर आहे. आता ढग नाहीत. खाली कुठलेतरी चिमुकले शहर दिसत आहे. मुलांनी वाळू व छापड्यांनी बनवलेले शहरासारखे वाटते आज सूर्यदेव पूर्ण तेजाने तळपत आहे. प्रकाशही स्वच्छ व लख्ख आहे. प्रकाशाबरोबर उबदारपणाही आहे.

दुपारी दोन वाजता ''सोची'' शहरांत पोहचलो. बस हजर होती हँडबॅग्ज घेवून बसमध्ये बसलो. मॉस्कोसारखा थंडीचा कडाका नव्हता. एका बाजूस अथांग समुद्र आहे तर दुसऱ्या बाजूस झाडीने गच्च भरलेल्या टेकड्या आहेत. विमानतळ लहान व सुटसुटीत आहे. हॉटेलमध्ये अडीचला पोहचलो ''डॅगोमीज'' असे हॉटेलचे नांव आहे. खोलीत टी.व्ही., रेडिओ, फर्निचर एकूण सर्व सज्ज आहे. तीन वाजता जेवायला गेलो. जेवण पुढे येईतो साडेतीन झाले. जेवून उठेपर्यंत साडेचार वाजले नेहमीचे पदार्थ होते. पीठल्याचे पीठ, मीठ घालून गरगटून दिले. ते झाले सूप. जेवण मर्यादित होते. पाच वाजलेले होते. पदार्थ मागून घ्यावे लागत होते. वेटर जवळपास नसेच. शोचा भपकाच फार आहे. जेवणाचा दर्जा एकूण कमी आहे.

सोची शहर विमानतळापासून खूप दूर आहे. बस व टॅक्सीसेवा उपलब्ध आहे. रस्ते खूप मोठे व स्वच्छ आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूस उंच उंच झाडे आहेत. रस्ते सोडून इतरत्र कमी-अधिक जंगल आहे. विविध तऱ्हेच्या वनस्पती व फुलझाडे आहेत. फुले आकर्षक असून सुवासिकही आहेत. कळकीची बेटे आहेत. बर्फ थोड्या प्रमाणात पडतो. पाऊस व सूर्यप्रकाश यामुळे गवत पुष्कळ आहे. तसेच झाडी विपुल आहे. डोंगराच्या चढउतारावर आकर्षक हॉटेल्स आहेत.

टुरिस्टांची संख्या अधिक दिसते. स्थानिक इमारती कमी उंचीच्या व साध्यासुध्या आहेत. लोकसंख्या विरळ आहे. बाह्य गजबजाटाच्या जगापासून अलिप्त व शांत असे हे शहर वाटले. म्हातारी माणसे हातात मोजे घालून शेतात काम करत असलेली दिसली.

एका बाजूस समुद्र, त्याच्या अगदी शेजारुन रेल्वे लाइन आहे. नंतर उंचवट्याचा भाग, त्यावर रस्ता, त्या रस्त्यावरुनच आमची बस आली आहे. समुद्रात मासे पकडण्यासाठी लाकडी व सिमेंटचे कठडे बांधलेत. येथे कांही लोक मासे पकडण्याचा व्यवसाय करतात. कांही मोटारलाँच समुद्रात दिसतात. भाडे दिल्यावर

टुरिस्टना त्या समुद्रात फिरवून आणतात. हेलिकॉप्टरने किंवा बसने ''सोची'' शहर दर्शन करता येते. इथली बॉटनी बाग पहाण्यासारखी आहे.

आज शनिवार, ता.१२ नोव्हेंबर ८८ आहे. काल रात्री इतकी गाढ झोप लागली की आज सकाळी जागे झालो तर चक्क उजाडले होते. भरभर सर्व आवरुन, न्याहरी करुन शहर पहाण्यास गेलो. शहर मोठे आहे. सुंदर आहे. येथील दवाखाना पाहिला. ''ह्यांची'' दाढ काढून घेण्यास सांगितले. औषधे दिले. भारतातल्यासारखे केसपेपर हे नि ते असे कांही नाही. लगेच तपासणे व औषध देणे हा अनुभव आगळा वेगळा होता.

नंतर एका बागेत थोडा वेळ थांबलो, तिथेच जवळच्या हॉटेलमध्ये जेवणाची व्यवस्था केली होती. नंतर शॉपिंगला सर्वजण गेलो. कशाचे शॉपिंग! त्या तुलनेने वाळव्याच्या श्रमिकनगरच्या जवळपास रोज अधिक विक्रेते आपला माल विकण्यास बसतात. शिवाय इथल्या दुकानांत पसंतीला वावच नाही. आम्ही सर्वजण लगेच हॉटेलवर परतलो. दुपारी जेवण उशीरा झाल्यामुळे रात्री जेवण कमी गेले. जेवणानंतर पावणेआठला हॉटेलच्या एका हॉलमध्ये जायचे होते. आज रशियन नृत्याचा कार्यक्रम होता. फुकट नव्हें, तिकिटाने.

हे डॅगोमिज हॉटेल मोठे आहे. काऊंटरवर सर्व स्त्रियाच काम करतात. प्रवाशांना बसण्यास मोठा हॉल आहे. विविध स्टॉल्स आहेत. बाल्कनी, बियरबार, बँक इ. आहे. अंतर्गत रचना इतकी गुंतागुंतीची आहे की मला कांहीच समजत नाही.

थिएटर अतिशय प्रशस्त व स्वच्छ आहे. पडदा तपकिरी सॅटिनचा आहे. खुर्च्या तपकिरी मखमलीच्या आहेत. प्रकाशासाठी छतातच शंभरपेक्षा अधिक बल्ब लावले आहेत. खेळ सुरु होण्यापूर्वी छतातील लाईट ऑफ करुन दोन्ही बाजूस भिंतीवरील लाईट सुरु केले. तसेच छतातच स्टेजच्यावर रंगीत लाईट होते. अगोदर रशियन गायकाने गाणे म्हटले. रशियन भाषेचे एक अक्षरही समजत नाही. काय कळाले गाण्यातील आम्हास? सर्वांनी टाळ्या वाजविल्या नि मग आम्हीही वाजविल्या. त्यानंतर ५ रशियन नृत्ये सादर केली. पाचही चांगली होती. नर्तक मुले व मुली प्रसन्न व हसतमुख होती. नृत्ये अगदी अचूक केली. नृत्ये आवडली पण गाणी किंवा वाद्यसंगीत मुळीच आवडले नाही.

कार्यक्रम मर्यादित व सुटसुटीत होता. दंगा, गोंगाट, गर्दी कांहीही नाही. सर्व व्यवहार शांतपणे चालतो. बाजारातही शेकडो माणसे होती पण तिथेही अजिबात गलबला नाही. कार्यक्रम बरोबर आठला तर बरोबर आठलाच सुरु झाला नि पावणे दहाला संपला.

बाजारांत सर्वकांही दिसले परंतू अन्नधान्याची दुकाने दिसली नाहीत. जेवणांत मुख्य पदार्थ पावच असतात. त्यामुळे कदाचित धान्यदुकाने नसतील आपल्याकडे महाबळेश्वरवर ज्याप्रमाणे हॉटेल्स चालवून पोट भरतात किंवा उदरनिर्वाह करतात त्याप्रमाणे हॉटेलींगच इथला व्यवसाय वाटतोय. हॉटेल्स इतकी उत्तम आहेत की कांही हॉटेल्समध्ये पोहण्याचे छोटे टँक्स बांधलेले आढळले. भारतातील रात्रीचे बारा वाजून गेलेत. डोळे झोपेसाठी आसुसले आहेत, म्हणून पुरे ! Good Night.

आज ता.१३-११-८८ चा रविवार सुरु झाला. लवकर उठून सर्व आवरुन बसची वाट पहात राहिलो. आज बॉटनिक बाग पहायची होती, पण सर्वजण शॉपिंगला जायचे म्हणाले नि नंतर बाग पहायची आज तर हवा अजिबात चांगली नाही. अखंड रात्रभर बर्फ पडले आहे उजाडल्यापासून पाऊस येवू लागला आहे. सकाळी दहानंतर पावसाला जोरच आला. तसेच शॉपिंग सेंटर जवळ आलो. मालाच्या मानाने गर्दी फ़ार. पसंतीला वाव नव्हताच. ''ह्यांना'' लोकरीचे पायमोजे घ्यायचे होते. अगोदरचे सुती मोजे होते. चार रुबल्सना मोजे घेतले. आता वुलनची पँट घ्याची होती. दिल्लीत घेतलेली वुलनची नव्हती. जी दुकाने उघडी होती तिथे जावून पहिले. तिथे पसंत पडत नव्हती. ज्या दुकानात मिळण्याची शक्यता होती ती दुकाने बंद होती. आता बर्फ व जोरदार पाऊस पडू लागला. वाटेत दोन मुली भेटल्या त्यांना पँटबद्दल सांगितले त्याही आमच्याबरोबर व आम्ही त्यांच्याबरोबर पावसात, बर्फात भटकत राहिलो. त्या मुलींचे कपडे वॉटरप्रुफ होते. आमचे कपडे भिजून ओलचिंब झाले. आता इतरांना कोठे शोधायचे? मुलींना मदत केली म्हणून त्यांना चार रुबल्स दिले. पावसाचा जोर वाढला. काचेची कुत्री, उंदीर व इतर प्राणी होते. ते घ्यावेत म्हटले तर हे नकोत का थांबायला? मी एकटी घेत राहिले नि चुकले तर काय करायचे? टॅक्सीने हॉटेलवर आलो टॅक्सीवाल्यास आठ रुबल्स दिले. ओले कपडे बदलून जेवण्यास गेलो माझे निम्मे जेवून होईतो. ''ह्यांचे'' जेवण झालेही. जेवणाची Self service होती. पावसांत

भिजल्यामुळे सर्दीची लक्षणे दिसू लागलीत. कानांत, घशांत आग होत आहे, शिंका येत आहेत. आता संध्याकाळ झाली आहे. थोड्या वेळाने रशियन सर्कस पहायला जायचे आहे. पैसे अगोदरच एकूण पैशातून दिले गेलेत.

संध्याकाळचे साडेपाच वाजलेत. आकाशांत चंद्रकोर आहे. खाली अथांग सागर आहे. चंदेरी प्रकाशात लाटा उफाळत आहेत. आकाशांत चंद्राच्या पलिकडे ढग आहेत. असं वाटतंय की पाणी व आकाश ढगांनी जोडून त्यांचे समेट घडवून आणलंय अतिशय सुंदर दृश्य दिसत होते. आता पाऊस, बर्फ किंवा वारा नव्हता. अशा वातावरणांत फिरायला जाण्याची तीव्र इच्छा होती. पण....!

बसने सर्कसला गेलो. सर्कसचे ठिकाण हॉटेलपासून पाच मैलावर असेल, सर्कस तंबूत नसून त्यासाठी खास इमारत बांधली आहे. इमारत गोलाकार आहे. सभोवती व्हरांडा आहे. व्हरांडा बंदिस्त आहे. तो ओलांडून आत आले की काचेच्या भिंती आहेत. तिथून आत जाण्याचा मार्ग आहे तिथेच डोअरकीपर आहे. डोअर किपर्स् स्त्रियाच आहेत. आपल्याकडील प्रमाणांचे अर्धे तिकीट फाडून घेतात व अर्धे परत देतात. आत जाण्यासाठी एकूण आठ ठिकाणी मार्ग होते. तिकीटावरील नंबरप्रमाणे बसायचे असते. बहुतेक सर्व जागा भरल्या होत्या. आम्ही बसलो होतो त्याच्यावर दुसऱ्या मजल्यावर तीन ठिकाणी लाईटची योजना होती. तिथून विविध रंगाचे प्रकाश झोत काम करताना कलाकारावर सोडले जात होते. चौथ्या ठिकाणी वाद्यवृंद होता. त्या तालावर कलाकार कसरत करत होते वाद्यवृंदाच्या बाजूस मॅनेजरची खोली होती. सर्व कलाकार तीस वर्षापेक्षा अधिक वयाचे होते. तीस ते अंदाजे पंचावन्न वर्षापर्यंतचे होते. स्त्री, पुरुष, पोपट, मांजर, माकडे, अस्वले, घोडी, वाघ व इतर प्राणी होते. सर्वांचीच कामे उत्कृष्ट झाली. भारतात आम्ही पुष्कळ सर्कशी पाहिल्या होत्या. कसरतीची कामे तशीच होती. एक मात्र दिसून आले माणसे व प्राणी सर्व धष्टपुष्ट होते. कोणीही त्यांत अशक्त किंवा दुबळे नव्हते. पूर्वी आम्ही पाहिलेल्या कांही सर्कसमध्ये प्राणी अशक्त आढळले होते.

सर्कसची जागा फार मोठी नव्हती. कसरतीच्या ठिकाणी असे वर्तुळाकार विविध रंगाचे रेशमी कापड होते. सर्व लाईटस एकदम बंद केले व ते कापड काढून घेतले. त्याच्याखाली हिरवे जाड जाजम होते त्यावरच खेळ सुरु झाला. ज्या कलाकाराचे

काम ज्या प्रेक्षकास आवडेल तो त्या कलाकारास फुले भेट देई. वजन उचलणाऱ्या कलाकारास एका तरुणीने फुले दिली. त्याने तिथेच चुंबन घेऊन प्रतिसाद दिला. सर्कसला Interval होता. सर्कस बरोबर आठला सुरु झाली व दहाला सुटली खोलीवर येण्यास अकरा वाजले. सर्कस संपली तरी आमची बसच आली नाही. सर्व लोक गेले, वाहने गेली. आम्ही तिथेच रस्त्यावर थंडीने कुडकुडत उभे होतो. इतक्यांत कोणी ओरडले, 'आली, बस आली.' आम्ही सर्वजण बसमध्ये बसलो. तेव्हा कुडकुडणे कमी झाले खोलीवर आल्यानंतर कपडे धुणे आवश्यक होते. कारण तीन वाजता उठून आवरुन, साडेतीनपर्यंत खाली जायचे होते. पहाटेच न्याहरी करुन विमानतळ गाठायचा होता. लवकर उठण्याचे दडपण मनावर असल्यामुळे झोपही, 'निर्धास्त तू झोपणार नाहीस तर मीही तुझ्याजवळ येणार नाही', म्हणून रुसून गेली. खूप आर्जव केली पण झोप कांही आली नाही. शेवटी उठलेच. बाहेर पाहिले तर आकाश निरभ्र होते. चांदण्या डोळे मिचकावत होत्या. बरे वाटले.

आज सोमवार १४-११-८८ ला सोची शहर सोडून 'कीव्ह' शहराकडे प्रयाण करायचे आहे. ठरल्याप्रमाणे साडेतीनला सर्व आवरुन खाली आलो. न्याहरी चहा, पाव, हवे असल्यास अंडे अशी होती. साडेचारला विमानतळावर गेलो. तिथे पोहचेपर्यंत पूर्ण उजाडले. सोचीचे वेटींगरुम स्वच्छ होते. तसेच ते आटोपशीर होते. मला बाथरुमला जायचे होते. तेथे अगदी म्हाताऱ्या आजीबाई होत्या. त्यांनी अगोदर खुणेने दाखविले. मला बरोबर समजले व मी जावू लागले तरीही त्या दाखविण्यास आल्या.

सोची शहरापासून सकाळी सात वाजता कीव्ह या शहरांत जाण्यासाठी विमानांत बसलो. कीव्ह हे एक पर्यटनस्थळ आहे. एजंटने अगोदरच तिकीटे दिली होती. तपासणी केली नाही. एस.टी.सारखे मनाला येईल तिथे बसलो. एस.टी. सारखेच उतरुन वाटेला लागलो. आमची अंग तपासणी किंवा सामान तपासणे वगैरे कांहीही केले नाही. सकाळी पावणेनऊला कीव्हला पोहचलो. आम्ही बसलो ते विमान मध्यम होते. एस.टी.च्या दीडपट रुंद होते. दोन्ही बाजूस तीन तीन सीटस च्या ओळी होत्या. मध्यावर दार होते. मॉस्कोला जाताना, विमानांत चढतांना कळत नव्हते की तो विमानाचा भाग आहे. विमान विमानतळाला इतके संलग्न केले होते की

बोगद्यातून जावून विमानात बसायचे. अगोदरच्या विमानांत थंड हवेचे पंखे पुढील सीटच्या पाठीमागील बाजूस असायचे परंतु या विमानात छोटे पंखे वर होते. ट्युब लाईटस मध्यावर वर होत्या तरी प्रत्येक सीटच्या डोक्यावरच्या बाजूस अर्धा इंच चौरस, छोटे लाईटस होते. तीन सीटस तर तिन्हींच्या वर छोटा छोटा लाईट होता विमान सुरु होताना खूप मोठा आवाज झाला. विमानाने चटकन उड्डान केले. वेगही खूप होता. कोठे काठ, किनारा दिसत नव्हता. मन भयभीत झाले होते. त्याचवेळी सूर्योदय झाला कर्ता करविता परमेश्वर आहे असा देवावर भार टाकला नि मनाने निःश्वास सोडला. तोवर विमान खूप उंच, वर गेले होते. ढगाशिवाय कांहीही दिसत नव्हते. हवाई सुंदरीने जागे असणाऱ्यास कसले तरी पेय दिले भारतीय पहाटे उठले होते ना! मस्तपैकी साखर झोपेच्या कुशीत विसावले होते.

कीव्हचा विमानतळ मोठा आहे. आम्ही बसलेल्या विमानासह वीस विमाने होती. छोटी-मोठी दोन्ही प्रकारची होती. खूप प्रवासी होते एस.टी.स्टँडवर जसे बाकावर बसतात तसेच बाकावर बसले होते. इथेही तपासणी नाही त्यामुळे मनाला मोकळे वाटले.

विमानांत चढतांना आकाश स्वच्छ होते. पण उतरतांना चक्क बर्फच पडू लागले. विमानातून उतरुन वेटिंगरुमपर्यंत बसने आलो. तिथून हॉटेलमधील खोलीवर पोहचलो. आतापर्यंतच्या खोलीच्यामानाने ही खोली लहान व डावी आहे. फर्निचरही कमी आहे. इतर सोई नेहमीप्रमाणे आहेत.

एक वाजेपर्यंत सर्व आवरुन शहर पहाण्यास बाहेर पडलो. बर्फ पडायला जोर चढला. बस हजर होतीच. बस हलली नि बर्फ अधिकच पडू लागले. गाईड माहिती सांगत होता. ट्राम बससेवा उपलब्ध आहे. रस्ते मोठे व स्वच्छ आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूस शोकेसेस आहेत. सर्व रस्ताभर बर्फ आहे. आवश्यक वहातुकीच्या रस्त्यावरील बर्फ लगेच लोखंडी फावड्याने हलविले जाते. एकदोन ठिकाणी उतरुन, सर्वांनी ती स्थळे पाहिली. तेवढ्यात कोण उताणे, कोण पालथे पडले तिघेजण तर पडलेच. मग मात्र बर्फावरुन पडून कांही दुखापत करुन घेण्यापेक्षा न उतरणे चांगले असे समजून आम्ही दोघेजण व आणखी कांहीजण बसमधून खाली उतरलोच नाही. बसमधूनच शहर पाहून परतलो. सोचीपेक्षा सूर्यदर्शन दुर्मिळ आहे. बर्फ आहे तसा

हवेत गारठापण फार आहे. वृक्ष उंचच्या उंच आहेत. पण बर्फामुळे निष्पर्ण आहेत विमानातून एक जंगल पाहिले होते. खूपच झाडे होती. उंच नि अगदी सरळ, फांद्या व पाने झाडाच्या अगदी शेंड्यास आहेत. ही झाडे इतकी दाट आहेत की सूर्य असताना सूर्यप्रकाश खाली पोहचणार नाही. वेली अजिबात नाहीत. गवत आहे पण बर्फामुळे जनावरे चरु शकत नाहीत. तसेच कोणतेही प्राणी रस्त्यावर आढळत नाहीत. तुरळक चार दोन कावळे मात्र दिसले. इकडे भिकारी व महारोगी अजिबात आढळले नाहीत. नाहीतर आपणाकडे सर्वत्र, त्यातल्या त्यांत देवालयाच्या दारांत किंवा जत्रेच्या ठिकाणी अधिक दिसून येतात.

हॉटेलचे नांव ‘रुस’ असे आहे. या हॉटेलला २९ मजले आहेत. पूर्वीच्या हॉटेल्सच्या तुलनेने हे हॉटेल चांगले वाटत नाहीत. जेवण नेहमीच्या पध्दतीचे आहे पण जेवणानंतर आइस्क्रिम नंतर चहा किंवा कॉफी व त्यानंतर फळे देण्यात येतात. जेवणांत दुभत्याचे पदार्थ अजिबात नाहीत. सोचीत दही मिळे, चहा कॉफीत दुध घातले जाई.

आता रात्रीचे साडेनऊ वाजलेत. क्यूबाच्या एक प्रवासी बाई भेटल्या आहेत. खूप बोलक्या आहेत. मोडक्या, तोडक्या इंग्रजीत बोलत आहेत. त्यांना Indian Tea फार आवडतो म्हणे. त्यांचा पत्ता घेतला आहे त्यांना विमानाने चहा पाठविन असे ‘‘ह्यांनी’’ सांगितले आहे. थोड्या वेळाने त्या उठून गेल्या. उद्या सकाळी पावणेनऊला एक शाळा पहाण्यास जायचे आहे अशी सूचना दिली आहे.

आज मंगळवार असून नोव्हेंबरची १५ तारीख आहे. सर्वजण शाळेला भेट देण्यास जाण्यासाठी तयार झालो. सकाळी नेहमीप्रमाणे लवकर आवरायचे म्हणून आवरले. श्री. नायकवडी नेहमीच लवकर झोपायचे नि मला झोपायला उशीर व्हायचा. धुणे रात्रीच धुवावे लागे दिवसा वेळच नसे. नंतर झोपायचे त्यामुळे उशीर व्हायचा. हे उठायचे, किती वाजले बघून यायचे नि मला उठवायचे. वास्तविक मला उठवण्याची कांहीही गरज नसायची. पावणेनऊला जाण्याऐवजी नास्टा ९.४५ ला म्हणून नोटीसबोर्डवर लिहीले व त्यानंतर शाळा पहायला जायचे म्हणजे पुष्कळ वेळ होता. जागे करुन आणखी दोन तास झोप म्हणून सांगितले कसं शक्य आहे. एकदा जागे झाल्यावर पुन्हा मला झोप येत नाही उठून माझे आवरण्यास सुरुवात केली. ‘‘ह्यांना’’ कधीही झोप

लागते उठून स्वतःचे आवरुन दोघांनी नाश्ता घेतला. बस आली. कालच्यापेक्षा आज बर्फ अधिक पडत होते. ट्राम्स बसेस सुरु होत्या. रस्त्यावर तुरळक रहदारी होती. उघडीप असल्यावर लोक जसे मोकळेपणी फिरतात तसे बर्फ पडत असतांना हिंडत नाहीत. शाळा, कॉलेज, कार्यालये सुरु असतात.

शाळेजवळ बसमधून उतरलो. शाळेचे नांव नव्हते. नंबर होता, नंबर ३९ ची शाळा. मुलामुलींची मिळून बहुउद्देशीय शाळा होती. एका वर्गात १६ पासून ३० पर्यंतच विद्यार्थी असतात. अधिक विद्यार्थी घ्यायचेच नसतात. मर्यादाच तीस असते. नाहीतर आपल्याकडे बघा ७५ ते ७८ विद्यार्थी एका वर्गात असतात. कारण तुकडी सुरु करायची तर कमीत कमी एका वर्गांत ४० विद्यार्थी असावे लागतात. इयत्ता आठवी नंतर प्रत्येक विद्यार्थी आपल्या आवडीने पसंतीने अभ्यासक्रम निवडतो. वयाचा सोळाव्या वर्षापर्यंत अभ्यासक्रम पूर्ण करायचा असतो त्यानंतर उमेदवारी करायची. उमेदवारी करतांना स्टायपेंड दिला जातो. उमेदवारी नंतर लगेच नोकरी मिळते. गाईडने सांगितले की इतर कोणी इथं निरक्षर नाही तसेच कोणी बेकारही रहात नाही.

आम्ही एका वर्गात गेलो. तेथे तेरा ते चौदा वयोगटांतील मुले-मुली होत्या. शिवणकाम करत होते. वॉल पेपर लावतात तसे तिथे वर्गात केलेले शिवणकामाचे, विणकामाचे नमुने लावले होते. लहान विद्यार्थींच्या वर्गात गेलो. गणिताचा तास होता. नंतर जिम्नॅशियम हॉलमध्ये गेलो. हॉल खूप मोठा होता. व्यायामाची खूप साधने होती विद्यार्थी व्यायाम करत होते. आज अगदी तीव्रतेने चि.रुपा व चि.गोटू यांची आठवण झाली. रुपासारखी मुलगी व गोटू सारखा मुलगा एका वर्गात होते. आमच्याबरोबर असणाऱ्यांनी त्या मुलीचे दोन फोटो घेतले नंतर शाळेच्या जेवणघरांत गेलो. तिथे शासनातर्फे विद्यार्थ्यांना दूध देतात. तसेच स्टाफ व विद्यार्थी यांना पंचवीस कोपेक्समध्ये जेवण मिळते. पौष्टिक असते असे तिथल्या सरांनी सांगितले. लेथ मशीन्स असलेल्या वर्गात गेलो. मुले पंधरा वर्षे वयोगटातील होती. मुले आपल्या कामांत मग्न होती. नंतर सांस्कृतिक कार्यक्रम झाले. मुलींनी गाणी म्हणून दाखविली, नृत्ये करुन दाखविली. नाट्यगृहच होते. स्वच्छ आहे, मोठे आहे. पडदा मखमलीचा आहे. हॉलभरुन खुर्च्या आहेत. सूरपेटीसारखे वाद्य आहे. ती एका शिक्षिकेने वाजविली.

लाईटची सुंदर योजना आहे लाऊडस्पीकर आहे. एकूण सर्व सज्ज व व्यवस्थित हाते. भिंतीवर विविध, सुंदर चित्रे लावली होती. हे सर्व अभ्यासक्रमाला धरुन चालते अधिक भर प्रत्यक्ष करुन घेण्यावर आहे. मुले, मुली मन लावून अभ्यास करतात. शिवाय विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित असल्यामुळे वैयक्तिक लक्ष देतात. होमवर्क अगदी कमी प्रमाणात असते.

लोकांचे सरकार, लोकांच्यासाठी असलेले, लोकांनी चालविलेले असे सरकार जनतेच्या भावी पिढीचा विचार करणारच. सरकार जनतेचे व जनता सरकारची असा अतूट नि अविभाज्य संबंध दोन्हीत आहे.

ती सुंदर शाळा पाहून परतलो. जेवण घेवून दुपारी दोन वाजता खोलीवर आलो. हे लगेच झोपी गेले. पावणेपाचला 'शो' बघायला जायचे आहे. गाणी व रशियन लोकनृत्य सादर करणार आहेत. कुठलाही कार्यक्रम अगदी ठरलेल्या वेळी सुरु होतो व ठरलेल्या वेळीच संपतो रशियन भाषा येत नसल्यामुळे गाण्याचा अर्थ आकलन होत नाही लोकनृत्ये सुंदर होती, पण तीही अभिनयावरुन व हावभाव करुन समजतील तेवढीच, पूर्णपणे समजत नव्हती. शो पाहून संध्याकाळी साडेसातला परतलो.

तीन डबे असलेल्या ट्रामगाड्या होत्या. येणारे जाणारे रुळ वेगवेगळे होते. त्यामुळे क्रॉसिंग कुठेही व्हायचे. आजही बर्फ अधिक पडलंय रहदारीचे मुख्य मार्ग सोडल्यास अक्षरशः शहर ओसाड पडलंय अस भासतंय.

आजचे कार्यक्रम आवरल्यात जमा आहेत. उद्या सकाळी न्याहरी करुन प्रवासातील शेवटच्या शहराला जाण्यासाठी निघायचे आहे. उद्या ताश्कंदला जाणार आहोत. कालपासून क्यूबाचे प्रवासी आलेत. काळ्या पक्क्या रंगाचे आहेत. केसही काळेभोर, अगदी दाट व अतिशय कुरळे आहेत. नाक पसरट व आखूड आहे. ओठ जाड असून डोळे मध्यम व उंची मध्यम आहे. हे लोक मात्र अत्यंत फॅशनेबल आहेत. कपडे उंची आहेत. त्यातील स्त्री-पुरुषांना इंग्रजी येते.

आज बुधवार, उजाडत आलंय, ता.१६-११-८८ आहे. प्रवास संपायला लागलाय. उजाडत आल्याची खूण म्हणजे एखादाच कावळा बर्फ पडणाऱ्या आकाशातून इकडून तिकडे जातोय. अजून माणसांची हालचाल सुरू झालेली नाही. कांही टॅक्सी

मात्र बर्फाच्छादित रस्त्यावरुन धावत आहेत. बाकी सर्वत्र चिडीचूप शांतता आहे.

हॉटेलच्या दर्शनी भागातच मोठा हॉल असतो. तिथे प्रवासी बसलेले असतात. काही गप्पा मारत असतात, कांही टी.व्ही. पहात असतात, कांही खोलीच्या प्रतिक्षेत तर कांही जाण्याच्या तयारीत असतात अशा हॉलमध्ये नोटीसबोर्ड असतो. कॉलेजमध्ये किंवा शाळेमध्ये नोटीस–बोर्डवर ज्याप्रमाणे सूचना लिहिलेल्या असतात. त्याप्रमाणेच या बोर्डवरही त्या त्या प्रवासी ग्रुपच्या सूचना लिहिल्या जातात. हॉटेलचे मॅनेजर व एजंट यांच्या सहमतीने सूचना लिहिल्या वा लावल्या जातात.

न्याहरीची सूचना सकाळी ७.४५ अशी होती. सूचनेप्रमाणेच जावे लागे. अगोदर किंवा उशीरा गेलेले चालत नसे. म्हणून आम्ही दोघे ७.५० ला गेलो तर वेटरने सांगितले ८.१५ ला या. सूचना पहा. सूचना ७.४५ ऐवजी ८.१५ केली होती आम्हास कल्पना नव्हती. सूचना वाचून आम्ही खोलीवर परत आलो. थोडावेळ थांबून ८.१५ पुन्हा गेलो. आमच्या ग्रुपचे लोकही हजर होतेच.

ताश्कंदला जायचे म्हणून सर्व आवरुन बॅगेज तयार करुन ठेवलंय. सकाळी ११ वाजता निघायचे आहे. एजंटने येवून सांगितले बस आली आहे. सर्वजण बसने ११.३० ला विमानतळावर पोहचलो ताश्कंदला पोहचण्यास वेळ होणार म्हणून विमानतळावरच दुपारचे जेवण दिले. जेवण अगदीच अपूरे होते नि त्यांत बटाट्याचा अधिक वापर होता. जेवणात नेहमीचे पदार्थ होते. जेवणानंतर आईस्क्रीम दिले व शेवटी कॉफी दिली. जेवल्यानंतर लगेच विमानाकडे बसने गेलो. तिकिटे अगोदरच आमच्या ताब्यात दिली होती. सांगायला हवेच आमच्या अगोदर इतर प्रवासी विमानात चढण्यासाठी उभे होते. इतर म्हणजे इतर देशांचे त्यांना बाजूस थांबविले व सर्व भारतीय प्रवाशांना अगोदर प्रवेश दिला. आताही माझ्या इच्छेप्रमाणे खिडकीजवळ जागा मिळाली.

विमानाने एक फेरी घेऊन धावपट्टी सोडली नि उड्डाण केले खाली सर्वत्र पांढरेशुभ्र बर्फ पडलेले होते. अर्ध्या किलोमीटर अंतरावरील कांहीही दिसत नव्हते. वैमानिकाने त्या वातावरणातून विमान एकदम निळ्याभोर आकाशात आणले नि काय चमत्कार सूर्यनारायण संबंध अवकाशांत दिमाखाने आपला अधिकार प्रस्थापित करीत होता. हवाहवासा वाटणारा लख्ख व सुखद प्रकाश विमानाच्या खिडकीतून

प्रवाशांच्या मांडीवर अलगद लडिवाळपणे विसावला होता.

गेल्या तेरा दिवसात फक्त दोन दिवस कांही वेळपर्यंत सूर्यदर्शन घडले होते. त्यामुळेच आता ते प्रेमाने, कौतुकाने त्यास कुरवाळत होते तिसऱ्यांदा दिसलेले हे सूर्यकिरण कुठे, किती नि कसे पकडून ठेवू असे झाले होते.

विमान मध्यम प्रतीचे आहे. येतांना जसे होते तसेच आहे. आजचे विमान नवे आहे. विमानात पेय व जेवण दिले. संध्याकाळी सहाला ताश्कंदला पोहचलो. त्यावेळी चंद्र आपल्या चंदेरी प्रकाशाने, आईच्या मायेने नाश्कंदला न्हाऊ घालत होता, नि चांदण्या चमचम डोळे चमकावून त्याला साथ करीत होत्या. खोलीवर पोहचलो. टी. व्ही. रेडिओसह सर्व सोईनी खोली सज्ज आहे. जेवून आलो की आजचे काम पूर्ण झाले.

काल बुधवार, ताश्कंदला मार्गावरच संपला. आज गुरुवार १७ तारीख. आज उठायलाच वेळ कसली लागली कोण जाणे. म्हणतात ना, 'काम नाही कामाड्याला नि दम नाही रिकाम्याला' अशी स्थिती झाली आहे. अजिबात विसावा नाही. आणि मनही स्वस्थ नाही. न्याहरी उरकून एक प्राथमिक शाळा पहाण्यास गेलो. अर्थात शाळा सरकारीच होती. विद्यार्थी विद्यार्थिनी एकत्र होत्या. शाळेच्या बाहेरच्या बाजूस कै.लाल बहादुर शास्त्री यांचा अतिशय मोठा पुतळा आहे. सभोवती बाग आहे कांही शिक्षिकांनी आम्हास फुले दिली, आम्ही कै. लाल बहाद्दुर यांच्या चरणी अर्पण केली. नंतर आम्ही आत गेलो तर लगेच विद्यार्थिनींनी 'नमस्ते' शब्द उच्चारुन आमचे स्वागत केले. ते ऐकून आम्हीच आश्चर्यचकित झालो. शंभर गुण असलेला हिंदी विषय तिथं शिकवतात शाळेत व वर्गावर्गातून 'भारत-रुस-मैत्री' असे लिहिले आहे. तसेच भारताचे राष्ट्रगीत 'जनगणमन अधिनायक जय हे' हे भिंतीवर लिहिले आहे. हिंदीतून बोर्ड लिहिले आहेत. कै.पंडित नेहरु, कै.इंदिरा गांधी व इतर राजकीय पुढाऱ्यांचे फोटो व चित्रे भित्तीफलकावर लावली आहेत. शिक्षिका हिंदी छानच बोलतात. पहिली ते आठवी अखेर वर्ग आहेत. शाळेचे नांव लालबहादुर शास्त्री असे आहे. गाईड माहिती देत होता. तिथल्या एका चौकात एक मोठा घडीव दगड आहे. एका भूकंपात तो दगड दुभंगला, तो भूकंप किती वाजता झाला ती नोंद त्याच दगडावर खोदून घड्याळ काढून ५ वाजून तेवीस मिनीटांनी झाला असे दर्शविले आहे.

हॉटेलकडे परतलो, परतत असतांना एका ठिकाणी पितळेचे स्त्री, पुरुष, मुले यांचे पुतळे पहिले. मोठ्या चौथऱ्यावर हे पुतळे आहेत. आमच्या ग्रुपच्या अनेकांनी एकमेकांचे फोटो काढले. सौ. मीनाताईनीही आमचे दोन फोटो काढले आहेत. हे सर्व करत असतांना माझा गॉगल मात्र हरवला आहे. केव्हा? कुठे? कसा? कांहीही माहीत नाही. आज सकाळपासूनच मूड ऑफ झाला आहे. नि त्यात आणखी एक एक घटनांची भर पडत आहे.

माझे २५० डॉलर्स व विमानांत बसण्याच्या आदल्या दिवशी मिळालेले वीस डॉलर्स, एकूण २७० डॉलर्स मॉस्कोत पोहचल्यावर बँक्त हावऱ्या हावऱ्या (उताविळपणे) मोडले. काळ्याबाजाराने चलन बदलेले असते तर अधिक रुबल्स मिळाले असते, बरं! मला वाटलं होतं मॉस्कोत फिरत असतांना कांही घेवू. आधी महागाई, त्याहून 'ह्यांचा' विरोध! काय घेणार आहेस? कशाला घेते आहेस. कांहीही घेवू शकले नाही. मला म्हणाले, "माझे डॉलर्स आहेत ते तू घे नि तुझे आहेत ते रुबल्स मी खर्च करतो. लोक विचारतील रशियाहून काय आणले? कांही घ्यायला हवं." रुमाल, पेन्स इ. घेतले मन चाहेल तसे खर्च केले आणि आता म्हणतात, "आहेत ते डॉलर्स माझ्या नांवे आहेत. ते माझेच आहेत." आता काय भोग की जुलूम. संस्थेत काम करताना जेव्हा ग्रँटने पगार दिले जायचे तेव्हा सतत माझा पगार मागे ठेवला जायचा. तो साठून २८,००० रु. इतका झाला तो अजून दिला नाही. आता मी रशियाला येताना, स्वतःचे पैसे भरुन आले आहे. निआताही पैशाबद्दल वाद आहेच. माझे मोडलेले डॉलर्स सर्व संपविले गेले आहेत. शंभर डॉलर्स आज मोडले आहेत. ५९ रुबल्स मिळाले काही घ्यायचे नाही तर बाजारात कशाला जायचे? पण जावे लागले काही पहायला लागले की चल लवकर, वेळ नाही. काही घ्यायला लागले की कशाला घेतेस ? नुसती बनियन्स घेतली आहेत तीही घाईन, नुसता मनस्ताप. इतकं भयंकर डोके दुखतंय. बनियन्स घेतल्यावर थोडा वेळ फिरत राहिलो. बनियन्स ठेवण्यासाठी पिशवी घ्यायची, अहो घ्यायची तर मोठी घ्या, वेळ कुठे आहे पिशव्या बघायला. घेतली लहान, जिचा कशासाठी ही उपयोग नाही.

ताश्कंदचे रस्ते स्वच्छ व मोठे आहेत. ट्राम्स, बसेस, टॅक्सीज् धावत असतात. फुटपाथला लागून गुलाबाचे ताटवे आहेत. हवा स्वच्छ असतांना ही

गुलाबफुले वाऱ्यावर दिमाखाने डोलून येणाऱ्या जाणाऱ्यांचे मन मोहून घेत असतात. पण कोणी ती तोडत नाहीत.

ताश्कंदचे जुने ताश्कंद व नवे ताश्कंद असे दोन भाग आढळले. नव्या ताश्कंदमध्ये सर्व अत्याधुनिक सोई उपलब्ध आहेत. रस्ते वहातूक पाणी, लाईट, शो, शाळा, बँका, पोस्टस्, इस्पितळे, बागा, आधुनिक शॉपिंग सेंटर्स, उद्योगधंदे इ. जुन्या ताश्कंदमध्ये दगडमातीची साधीसुधी घरे आढळली. घरे उंचीला कमी असून घरांत चुली असाव्यात. कारण घराच्या वर धुराडी आढळली. सांडपाण्याची खास सोय केलेली दिसली नाही. आपल्याकडील भारतीय खेड्यासारखे वाटले.

रस्त्यावरुन जाणारे येणारे वयस्कर बरेच लोक आढळले. म्हणजे आर्युमर्यादा बरी आहे. भारतीय प्रवाशाबद्दल त्यांच्या मनात आपुलकी आहे. विमानातून उतरल्यावर लगेच म्हणजे सर्वांच्या अगोदर भारतीय प्रवाशांना बस दिली. आमचे सहप्रवासीही ग्रुप-ग्रुपने भटकण्यास गेले मग आम्ही दोघेही गेलो. काही घ्याचे नव्हतेच, भाषाही येत नव्हती थोडे इकडे तिकडे फिरल्यावर परत येण्यास लागलो, थोड्या वेगळ्या मार्गाने, व्हायचे तेच झाले. आमचे हॉटेल काही आम्हाला सापेडना. मग टॅक्सीला हात केला. टॅक्सी थांबली. हॉटेलचे नांव सांगितले. त्या टॅक्सी ड्रायव्हरने Indian शब्द उच्चारला. मानेनेच होय म्हणून सांगितले हॉटेल जवळच होते, पण सापडत नव्हते. टॅक्सी ड्रायव्हरने टॅक्सी हॉटेलच्या समोर थांबविली. उतरण्याच्या आधीच भाडे म्हणून त्याला एक रुबल देवू केला. पण त्याने माझ्या हातातील रुबल घेवून माझ्याच पर्समध्ये घातला. फसवून, हटून भाडं अधिक घ्यायचे नाही. म्हणजे आश्चर्यच! भारतात सध्या असे कोठे आढळेल का? टांग्याच्या काळातील पुणेरी टांगेवाल्या ची गोष्ट प्रसिध्द आहेत. पण सध्या रिक्षाच्या काळातही, मीटर असेल तर ठीक नाहीतर, पुणेरी टांगेवाल्याप्रमाणेच रिक्षावाले वागतात. त्यांच्याबरोबरच हुज्जत घालावी लागतेच नि अनोळखी किंवा अनभिज्ञ माणूस असेल तर मग बोलायलाच नको. परदेशी प्रवाशांना नाश्ता, भाडेही न घेता इच्छित स्थळी पोहचवणं, हा त्या ड्रायव्हरचा दिलदारपणा, मनाचा मोठेपणा मी आयुष्यात कधीही विसरु शकणार नाही. या तुलनेने आपल्या देशात टांगा, रिक्षाबाबत आलेले अनुभव डोळ्यापुढे चित्राप्रमाणे सरकल्याशिवाय रहात नाहीत.

'आधीच उल्हास त्यात आणि फाल्गुन मास', 'न कर्त्याचा वार शुक्रवार' आज इथे मुक्काम आहे. कशाचीच घाई नाही. नेहमीप्रमाणे सर्व उरकले. १० रुबल्स म्हणजे १०० रुपये असे असतांना दहा रुबल्सला एक याप्रमाणे दोन कॅलेंडर्स घेतली. न्यायचे ओझे शिवाय यापेक्षा सुंदर कॅलेंडर्स आपल्याकडेही मिळतील. पण म्हणतात ना, 'सत्तेपुढे शहाणपण मुर्खपणाचे' तसेच नको म्हणत असतांना 'शो' साठीही पैसे दिले आहेत. आज प्रवासाचा अखेरचा दिवस! उद्या सकाळी अकरापर्यंत दिल्लीत पोहोचू. मन पुढे जाण्यास आसुसले आहे नि मागे आपण काय काय पाहिलंय याचा आढावा घेवू लागलंय. पहिलं नि शेवटचं दर्शन या प्रदेशाचं! पुन्हा इकडे येणं नाही म्हणून ओढाळ मन खट्टू झालंय.

आमचे सहप्रवासी रशियन चलन संपवू लागलेत. कारण भारतात त्याचा कांहीही उपयोग नाही. आमच्याकडे अजून अठरा रुबल्स आहेत.

दुपारचे तीन वाजलेत. सूर्यराजाने आपले काम आवरत आणलंय, तो मावळतीला झुकू लागलाय. टाईमपास करणे सुरु आहे. संध्याकाळ झाली आहे. सहा वाजून तीस मिनीटे झालीत. खरं म्हणजे हवा स्वच्छ व कोरडी आहे. तरी हवेत गारठा आहेच. स्वस्थपणे- स्वच्छंदपणे भटकता आले असते व मनमुराद आनंद लुटता आला असता, पण कुठले काय?

पावणे-सातला खाली गेलो तिथून थिएटरवर शो पहाणयास गेलो, थिएटर तीन मजली असून सुंदर आहे. वरच्या मजल्यावरून लाईट फिरवीत होते. सर्वत्र नक्षीकाम केलेले होते. मध्यभागी घुमटाकार होता त्यास काचेचे झुंबर होते व त्याच्यामध्ये लाईट लावलेले होते. सहाशे प्रेक्षक बसतील एवढे थिएटर होते. खुर्च्या मखमलीच्या व सुंदर होत्या. निम्मे थिएटर रिकामे होते. रंगमंच मोठा होता. पहिला पडदा चॉकलेटी रेशमी होता. पार्श्वभूमीचे पडदे चारदा बदलले. ते चारी पडदे अप्रतिम होते. हुबेहुब खरे देखावे आहेत असे भासत होते. डोअरकीपर म्हणून कोठेही पुरूष नव्हता. वयस्कर सर्व स्त्रियाच होत्या. आमच्याशी त्या सौजन्याने वागल्या. फक्त मूकनृत्ये होती. वेशभूषा चांगली होती. स्त्रिया व पुरूष नृत्य करत होते. विविध नृत्ये सादर केली. पण आम्हास तरी नृत्यात फरक जाणवला नाही. नृत्य पाहिली पण मन बहरून आले नाही. भारतीय नृत्यापुढे ही नृत्ये काहीच नव्हेत, म्हणून जायलाच

नको म्हणत होते. रात्री ९ वाजून २५ ला हॉटेलवर आलो. लागलीच जेवून खोलीवर आलो. बॅगेज तयार करून बाहेर ठेवायचे होते. रात्र झालीय. डोक खूप दुखतंय. झोप लागायला हवी आहे.

आज १९ तारीख, रात्रीचे बारा वाजून गेल्यावर 'हयांनी' आंघोळ केली आहे. अगोदरच बॅगेज तयार करून ठेवले आहे. नंतर खोलीबाहेर ठेवले. मीही माझे आवरले. १ वाजल्यावर खोली सोडून खाली आलो अजून कोणी आले नव्हते. आमच्या नंतर एक-एक येवू लागले. रात्री अडीचला विमानतळावर आलो. विमानतळ व ही प्रवासी हॉटेल्स दिवसरात्र गजबजलेली असतात. सामानाची तपासणी केली. ज्यांनी विविध व बरीच खरेदी केली होती त्याना कर भरावा लागला. आम्ही कांहीच खरेदी केली नव्हती त्यामुळे सर्व त्रासातून चटकन मुक्त झालो. कुठेही अडविले नाही. इतराप्रमाणे आम्हालाही तपासतील म्हणून एखादया ठिकाणी थांबलो तर लगेच निघून जाणयासाठी खूण करीत. कर भरावा लागला. सामान उचकटले म्हणून इतर सर्वजण हिरमुसल्या चेह-याने विमानात बसले. मॉस्कोपासून आलेले अगोदरचे प्रवासी विमानात मस्त झोपले होते.

अखेरच्या टप्प्याचा परतीचा प्रवास सुरू होत आहे. आताही दोघांचे वेगवेगळे नंबर त्यामुळे वेगवेगळया ठिकाणी बसलो. विमान मोठे होते. 'भारत-मॉस्को' किंवा 'मॉस्को-भारत' ही विमानसेवा आठवडयातून एकदाच असते. विमान प्रवाशांनी पूर्ण भरलेले आहे.

विमान सुरू झाल्यावर अर्ध्या तासाने हवाई सुंदरीने नाश्ता म्हणून एक पाव, चहा-कॉफी हवी असेल त्याप्रमाणे दिले. मी फक्त कॉफी घेतली. ताशकंदहून दिल्लीस पोहचणयास फक्त दोन तास लागतात. विमानात असतानाच उषासुंदरीने कुंकुममिश्रित सडा-संमार्जन करून ठेवले . तोच अरूणराजाने तिथे पदार्पण केले न केले इतक्यांत सूर्यदेव रथारूढ होवून तिथे अवतीर्ण झाले, ते देवदृश्य इतकं मनोहारी होत की त्याचे शब्दांकन करण्यास शब्द असमर्थ आहेत. धीरेधीरे रंगछटा बदलत होत्या. मन प्रसन्न व उल्हासित झाले, मोहरून आले. ते दृश्यच मनःरूपी फलकावर कोरत मी माझ्या तंद्रीत मशगुल झाले होते. इतक्यांत माझ्या शेजारच्या गोऱ्या बाईनी ते दृश्यच दाखविले. मी ही स्मितहास्य करून त्यांना प्रतिसाद दिला. आपला आनंद

व्यक्त करण्याससुध्दा जवळ कोणीतरी असावे लागते. आमच्या 'ह्यांना' कधीच हे कळणार नाही का ?

विमानातून उतरण्या अगोदरच एक फॉर्म प्रत्येकास देण्यात आला, विमानात असतानाच भरुन खाली उतरल्यावर लगेच येणाऱ्या ऑफिसरला तो द्यायचा असतो. लाईट होते तरी प्रकाश अंधूक होता. अवघडून लिहावे लागत होते. फॉर्म भरणे मला कळू लागल्यामुळे मी दोघांचे फॉर्म्स भरुन दिले. म्हणून म्हणतात, 'जग ही एक शाळा आहे नि अनुभव तिथलं ज्ञान आहे.' त्या फॉर्ममधील अर्धा भाग कट करुन पुन्हा आम्हास दिला. तिथून बाहेर पडत असतांना तोही घेतला. बॅगेजचे वजन व त्यांतील असणाऱ्या सामानाची तपासणी हे सर्व स्वयंचलित यंत्राने करतात, नंतर बॅगेज आपल्या ताब्यात मिळते. इतकं सर्व असूनही स्मगलर कसे काय चोरटा माल आणतात कांही कळत नाही.

आम्ही दिल्लीच्या विमानतळावर पोहचलो. विमान रनवेवरुन हळुहळू जमिनीवर टेकले. प्रथम विमानातून आम्ही खाली उतरलो चेक होवून पट्टयावरुन येणारी एक बॅग उशीरा मिळाली. दोन्ही बॅगा एकदम ठेवल्या होत्या. एक लवकर मिळाली पण एक खूपच उशीरा मिळाली. त्यामुळे बाहेर पडण्यास आम्हास उशीर झाला. बस हजर होती. एजंटने सांगितल्याप्रमाणे बसने ठरलेल्या ठिकाणी आणून सोडले नंतर I.I.P.A. च्या खोलीवर आलो. (Indian Institution Public Administration) अजून जेवणाला वेळ होता म्हणून 'ह्यांनी' पुन्हा आंघोळ केली. अजून डोके दुखत होतेच. एक वाजता जेवून आलो नि झोपलो. अतिशय गाढ झोप लागली होती. कसलाही ताण मनावर नव्हता ना ? त्यामुळे लागली असेल गाढ झोप! तोवर सौ.मीनाताई आल्या. रशियाला जातांना त्यांनी एक बॅग I.I.P.A. मध्ये ठेवली होती तसेच त्यांनी व मी खर्चासाठी घेतलेले पैसेही तिथल्या प्यून-मंगलकडे ठेवले होते. त्याने लगेच सर्व रक्कम व्यवस्थित परत केली. आपली बॅग त्या घेवून गेल्या. दिल्ली ते मुंबई या रात्रीच्या विमानाने त्या जाणार आहेत. पुन्हा झोपण्याचा प्रयत्न केला पण झोप लागली नाही.

रात्री आठला जेवल्यानंतर वाळव्याहून फोन आला. आम्हा दोघांच्या प्रकृतीची चौकशी केली. ह्यांनी सांगितले, ''ही म्हणते आहे, माझे डोके दुखते आहे, अजुन

दुखते की राहिलंय माहित नाही.'' साखरेची रिकव्हरी विचारली. तसेच सर्व ठीक आहे असे कळविले.

वाळव्यात पोहचलो. घरी पाऊल ठेवले तरी ओढाळ मन अजूनही सोविएत संघराज्याचाच विचार करत आहे नि त्यांच्या विविध योजना, विकास, प्रगती एखाद्या चलचित्रपटाप्रमाणे डोळ्यांपुढून सरकत आहे. एवढा खंडप्राय मोठा देश तरी त्यांनी निवासस्थानाचा प्रश्न सहज चुटकीसारखा सोडविला आहे. जगातील सर्व लोकांना निवारा द्यायचा असेल तर संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अंदाजाप्रमाणे आणखी एक अब्ज जागा लागतील. जगातील बऱ्याच लोकांना आजही निवारा नाही.

क्रांती झाल्यानंतर सोविएत सरकारने प्रथम जमिनीवरील खाजगी मालकी नष्ट केली, त्यामुळे जमीन ही खरेदी विक्रीची बाब राहिलीच नाही. त्यामुळे घरे बांधण्यासाठी जागा फुकट मिळाली. तसेच शहरातील स्थावर जागेवरील मालकीही रद्द करण्यात आली. त्यामुळे जागांची पुर्नवाटणी करणे सोपे झाले. काही मोठमोठ्या इमारती शाळा, शिशुगृहे, बालकमंदीरे, दवाखाने, ग्रंथालय याकरिता वापरण्यात आल्या.

क्रांतीनंतर सरकारला लगेच घरांचा प्रश्न निकालात काढता आला नाही. कारण लगेच यादवी युध्दाला सुरुवात झाली. तदनंतर मात्र अगदी मोठ्या प्रमाणात घर बांधणी प्रश्न सोडविला. १९२३ ला पहिली ५ मजली इमारत बांधली. घराचा प्रश्न त्वरीत सोडवायचा असेल तर घरबांधणी नव्या पध्दतीने करायला हवी. घराला लागणारे भाग बांधकामाच्या जागेवर एकत्र करण्यात येवू लागले. त्यामुळे घर बांधायचा प्रश्न सुटला तसेच नऊ ते सोळा मजली इमारती बांधू लागले. अमेरिकेत अगदी वरच्या मजल्यावर रहाणे प्रतिष्ठेचे मानतात. पण येथे तळमजल्यावर रहाणे सर्वजण पसंत करतात. कारण त्यामुळे जमीनीशी व निसर्गाशी जवळीक साधता येते असे सर्व रशियन नागरिकांचे मत आहे. गरजूना लोकप्रतिनिधी मंडळाकडून जागा दिली जाते. जागा हवी असेल त्यांनी या मंडळाकडे आपली नांवे नोंद करायची असतात. ज्याना जागेची अधिक गरज असेल त्यांना हे मंडळ अगोदर जागा देते. एखाद्या भाडेकरुने भाडे दिले नाहीतरी त्यास जागेतून काढता येत नाही. त्यांच्या बाबत फक्त हे मंडळच निर्णय घेवू शकते. तरी त्या भाडेकरुस बेघर करता येत नाही.

घरबांधणी मुख्यतः सरकार करते. घरबांधणीचे साहित्य तयार करणारे देशात

चारशेहून अधिक कारखाने आहेत. घर बांधणीचा व्यवसाय येथे मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. यादवी युध्द संपल्यावर घरबांधणीचे काम सुरु झाले. तेव्हा जे भाडेकरु होते नि जे भाडे देत होते तेच भाडे आताही आहे. म्हणजेच १९२२ साली जो भाड्याचा दर होता तोच सध्याही आहे. त्यात वाढ झालेली नाही. भाड्याचा दर चौरस मीटरला चौदा कोपेक भाडे (एक कोपेक म्हणले १० पैसे) आकारले जाते. यात प्रवेशाची खोली, स्वयंपाक घर, स्नानगृह, संडास व गॅलरी इतके असते. भाडे चेकने अगर रोख स्टेट बँकेत भरायचे असते. अनेक मजली इमारतीत रहाताना सोळा कोपेक आकार पडतो. प्रत्येक महिन्याला दर माणसी सोळा कोपेक भरावे लागतात. ते केवळ गॅस करताच. प्रत्येक तासाला दर किलोवॅटला चार कोपेक द्यावे लागतात. एक हजार लिटर थंड पाण्यास चार कोपेक व गरम पाण्यास दरमाणसी पन्नास कोपेक द्यावे लागतात. एक चौरस मीटर जागा गरम ठेवण्यास व सफाई करण्यास सहा कोपेक लागतात. म्हणजेच जागेच्या आकारमानाप्रमाणे भाडे द्यावे लागते. त्यांत भाडे फ़क्त सहा रुबल्स असते. पाणी, गॅस, वीज इत्यादीचा आकार वेगळा द्यावा लागतो. म्हणजेच कुटूंबाच्या कमाईच्या हे भाडे चार ते पाच टक्के असते. स्वतः तीन खोल्याचे घर बांधायचे झाल्यास त्याला आठ हजार रुबल्स खर्च येतो. पण भाडे मात्र सहा रुबल्सच असते. कोणालाही जागा विकता किंवा विकत घेता येत नाही. मंडळाच्या मदतीने बदलता येते. १९२८ साली भाड्याचे जे दर होते तेच आताही आहेत. प्रत्येकास जागा मिळालीच पाहिजे असे घटनेने ठरवून दिलेय. प्रत्येकास जागा देण्याची जबाबदारी सरकारने घेतली आहे. १९९० सालापर्यंत सर्वांना जागा मिळेल तसेच प्रत्येक घरांत टेलिफोन असेल. भाडेही कमी आकारले जाईल.

सहकारी पध्दतीनेही घरे बांधतात यांत तीस ते चाळीस टक्के रक्कम अगोदर सहकारी संस्थेस द्यावी लागते. बाकीची रक्कम सरकार घालते. ती रक्कम पंधरा ते वीस वर्षात फेडायची असते. त्यावर फक्त अर्धा टक्का व्याज आकारले जाते. सध्या मोठमोठ्या इमारतीच्या वसाहती बांधू लागलेत. शहरी गोंगाटापासून या दूर आहेत. एक बालकमंदीर, बाग, क्रिडांगण, माध्यमिक शाळा, दवाखाना, चित्रपटगृह, जीवनाश्यक वस्तूंचा बाजार अशा सोई उपलब्ध असतात. सध्या प्रत्येकाच्या वाट्यास नव्वद चौरस मीटर हिरवळीची जागा येत असल्यामुळे हवामान शुध्द रहाते.

अडतीस टक्के रशियन जनता खेड्यात रहाते. प्रत्येक शेतकरी कुटुंबाचे स्वतःचे घरकुल आहे पण त्यांत सर्व सुखसोई नाहीत. त्या देण्याचा सरकारचा प्रयत्न सुरु आहे. काही कुटुंबे नव्या वसाहतीत हलवली जात आहेत. ग्रामीण भागाचा विकास व्हायचा असेल तर प्रत्येक शेतकऱ्यास स्वतःचे घर, थोडी जमीन, जनावरांसाठी गोठा, कोंबडी, बदकांसाठी खुराडे हवेच असे सरकार म्हणते. खेड्याच्या व वसाहतीच्या मध्यभागी सरकारी कार्यालये, सांस्कृतिक गृह, हॉटेल्स, शाळा, बालकमंदीर, पाळणाघरे, पोस्ट, दवाखाने, दुकाने इत्यादी नित्योपयोगी सेवा उपलब्ध असतात. ग्रामीण भागातील घरानाही हिटर बसवू लागलेत.

भारतात मात्र घराबाबत अगदी विचित्रस्थिती आहे. श्रीमंतांचे बंगले सर्व सुखसोईनीयुक्त आहेत. पण मध्यमवर्गीय व गरीब यांची घराची परवड संपलेली नाही. मध्यमवर्गीय माणूस आयुष्यभर जीव मारुन पैसे साठवतो व आपल्या मालकीचे घरकूल असावे म्हणून व प्रसंगी कर्जही काढून एखाद्या अपार्टमेंटमध्ये दाखल होतो. कर्ज मंजूर होवून पैस हातात पडेपर्यंत त्याचा जीव हैराण होतो. पैसे मिळाल्यावर तो अपार्टमेटच्या कार्यालयात येतो. नियमाप्रमाणे पैसे भरतो, हप्ते समजून घेतो. धीरेधीरे इमारत तयार होते. सांगितलेल्या नंबरचा फ्लॅट पहातो, तयार झाला आहे म्हणून रीतसर रहायला येतो. वास्तुशांति, पूजा सारे सोपस्कार झालेले असतात. 'याची देही याची डोळा' घरकुल मिळाले म्हणून समाधानांत, आनंदात घरचे लोक असतात. पण तो आनंद, ते समाधान दुःखात बदलले जाते. कारण त्या वास्तुत संडासमध्ये पाणीच नाही, तर बाथरुममधला नळ अहोरात्र वाहत असतो. किचनमध्ये लाईट लागत नाही. कुठे गिलावा व्यवस्थित नसतो, अशा अनेक तक्रारी दिसून येतात. तो फ्लॅटच्या कार्यालयात जातो. तिथले लोक प्रथम आदबशीर वागायचे तेच त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. बोलण्याचा प्रयत्न करतो तोवर त्याला हाकून लावले जाते. आता दाद कोणाकडे मागायची. जवळ पैसा नाही वेळ नाही नि मिळालेला फ्लॅट असा गैरसोईचा. मग तो पुरता हताश होतो.

गरीबांने घर बांधायचे कां? घरात रहायचे का? घर बांधायचा प्रयत्न केला तर सारंच महाग! कर्ज काढायचं, तर घरं बांधायच नि दहा पंधरा वर्षे कर्ज फेडत बसायचे. फ्लॅटच्या सुखसोई त्यात नसतात नि गरीबांना त्या सोईची अपेक्षाही नसते.

तरी तो कर्जबाजारी बनतो.

ग्रामीण भागात 'इंदिरा गांधी' घरकुल योजना राज्यकर्त्यांनी राबविली. तांबड्या मातीने विटांची घरं बांधून दिली जी पावसाळ्यात पडू लागली नि एव्हढी मोठी की श्रीमंतांच्या बंगल्यातील बाथरुम या घरकुलांपेक्षा मोठी आहेत. काय करणार? गरीबी हा त्यांचा गुन्हा आहे ना! एव्हढी तरी दया केली म्हणून गप्प बसतात सरकारला दुवा देत!

शिवाय शहर, नव्या वसाहती वाढत आहेत. त्याबरोबरच झोपडपट्ट्याही वाढत आहेत. या झोपड्या, पत्रे, कार्डबोर्ड, मेनकापड, प्लॅस्टीकचे मोठे कागद जे काही मिळेल. त्याच्या बनवलेल्या आहेत तिथे पाणी, लाईट, संडास इ.कशाचीच सोय नाही. नव्हे त्या बेकायदेशीर बांधलेल्या तर तिथे सोई कशा असणार? दिवसभर लोक झोपडीच्याबाहेर बसलेले असतात. रात्रीही सोईप्रमाणे कुठेतरी झोपायचे, ही आहे झोपडवासियांची कटू कहाणी. पण ज्यांना निवाराच नाही, झोपडी नाही त्यांचे काय? नुसत्या मुंबईत कित्येक लाख लोक फुटपाथवर रहातात एका ठिकाणाहून पोलिसांनी हाकलले की दुसऱ्या फुटपाथवर जायचे सतत पोलिसांचा ससेमिरा पाठीमागे असतो. ऊन-पावसात हे लोक इमारती, दुकाने यांच्या आडोशाने जीवन जगत असतात. बेचाळीस वर्षे झाली स्वातंत्र्य मिळून नि असा आहे निवाऱ्याचा प्रश्न स्वतंत्र भारतातला. वहातूक व्यवस्था भारतातील मोठमोठ्या शहरातल्या ट्रामगाड्या बंद करण्यात आल्या आहेत. उदा. मुंबई दिल्ली इ.ठिकाणची ट्राम वहातूक बंद केली आहे. पण मॉस्को, लेनिनग्राड इ.शहरांत अद्याप ट्रामगाड्या आहेत, तसेच रशियातील छोट्या, अगर मोठ्या शहरात ट्रामगाड्या, ट्रॉलीबसेस, बसेस व टॅक्सीज वहातूक करतात. शहरात कोठेही जाण्याचे ट्रामचे भाडे फ़क्त तीन कोपेक आहे. ट्रॉलीबसला चार कोपेक भाडे असते. टॅक्सीजना मात्र भाडे जास्त असते. एक किलोमीटर जायला वीस कोपेक भाडे द्यावे लागते. शिवाय सर्व प्रवास झाल्यावर आणखी वीस कोपेक्स द्यावे लागतात.

भारतात रेल्वे, बस (S.T.) व टॅक्सीने प्रवासी वहातूक करतात. रेल्वे, एस.टी.पेक्षा टॅक्सी महागच असतात. सध्या रिक्षा वहातूकीचे प्रमाण वाढले आहे. एस.टी. अगदी खेड्यापाड्यातही जात असतात.

**मेट्रो भुयारी रेल्वे :** जमिनीवरील वहातुकीचा भार कमी करण्यासाठी रशियातील मोठमोठ्या आठ शहरांत भुयारी रेल्वे आहेत. भुयारी रेल्वेचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करत आहेत. मेट्रो रेल्वे सुरु करण्याचा प्रस्ताव १९०२ मध्ये मांडला. परंतु लगेच तो नाकारला. कारण रेल्वे चर्चच्या खालून जात होती. म्हणजे पवित्र वास्तुची शांतता नष्ट होत होती. सोविएत सरकारने १९३१ मध्ये ही रेल्वे बांधण्यास घेतली नि चार वर्षात पूर्णही केली. प्रथम फक्त तेरा स्टेशने होती. पण आता त्यांची संख्या एकशे सात इतकी आहे. रोज कमीत कमी पन्नास लाख लोक भुयारी रेल्वेने प्रवास करतात. मेट्रो स्टेशनमध्ये गेल्यावर बाजूस नाणी टाकण्याचे एक मशीन असते. या मशीनमध्ये पाच कोपेकचे नाणे टाकल्यावर लाल दिव्याऐवजी हिरवा दिवा लागतो. नंतरच आपणास प्लॅटफॉर्मवर जाता येते. कमी कोपेक टाकले तर लाल दिवा तसाच रहातो. नि मशीन आपणास अटकाव करते. मेट्रोतून कोठेही प्रवास करण्यास फक्त पाच कोपेक्स भाडे आहे. स्टेशनच्या आत गेल्यावर जिन्यावरुन खालील प्लॅटफॉर्मवर जायचे. गाडी आल्यावर दारे उघडली जातात. प्रवासी चढल्यावर-उतरल्यावर दारे बंद होतात तसेच पुकारुन पुढील स्टेशन कोणते हे सुचविले जाते. बसण्यास आत गाद्या असतात. बाके व खुर्च्या खिडकीच्या बाजूने असतात. गर्दी कधी होत नाही पण समजा झाल्यास मध्ये उभे रहावे लागते. गाडी धावत धरण्या, पकडण्याची गरज नसते. दर पन्नास सेकंदाला दुसरी गाडी येते. एव्हढ्या मोठ्या शहरांतील कुठल्याही भागांत आपण केवळ तीस ते चाळीस मिनीटांत पोहचू शकतो. गाडीचा वेग दर ताशी नव्वद किलोमीटर असतो. रेल्वे, ट्राम व बस या तिन्हीचा मासिक पास सहा रुबल्सला मिळतो. फक्त रेल्वेचा पास हवा असेल तर नवीन रुबल्स भरावे लागतात.

प्रत्येक स्टेशनची ठेवण वेगवेगळी आहे. स्टेशने सुंदर व देखणी आहेत. त्या त्या भागात वैशिष्ट्ये, त्या त्या स्टेशनात चित्ररुपाने अगर अन्य मार्गाने सूचित केलेले आहे. उदा. 'दि नामा' स्टेशनजवळ 'डायनामो' स्टेडियम आहे म्हणून तिथल्या स्टेशनामध्ये भालाफेक, गोळाफेक इ. खेळाडूंची चित्रे कोरली आहेत.

शहरातून किंवा शहराच्या जवळपास वहाणाऱ्या नद्यांचा वहातुकीसाठी उपयोग करुन घेतला आहे. मस्कवा नदीतून जलविहार व वहातुक सुरु असते. तेरा बंदरे

आहेत. भाडे तीस कोपेक्स आहे. एकूण पहाता वहातुक स्वस्त आहे. वहातुकीच्या खर्चाचा कांही भाग सरकार उचलत असते.

**सोविएट रशियातील शिक्षणपध्दती** : एकदा अमेरिकन शिक्षणतज्ञांचे एक पथक रशियात गेले तेव्हां त्यांना सांगण्यात आले की क्रांतीनंतर वर्गहीन समाजरचना येथे करण्यात आली आहे. कोणालाही खास हक्क नाहीत. पण पहाणी करत असता त्या पथकाला असे दिसून आले की, इथे एक खास वर्ग आहेच नि तो सर्व हक्क भोगत आहे. शिवाय सर्व समाज व सरकार या वर्गासाठी जागृत व दक्ष आहे. हा भाग्यवान वर्ग म्हणजे रशियातील मुले. राष्ट्राचे भावी शिल्पकार, राष्ट्राचे भावी आधारस्तंभ, राष्ट्राची साजरी गोजिरी चिमुकली भावी पिढी!

**सोविएत सरकारने** : (१) शिक्षण सार्वत्रिक केले आहे. (२) शैक्षणिक संस्थेत प्रवेश देताना राष्ट्रीय व सामाजिक बंधने नष्ट केली आहेत. (३) खाजगी व हक्कदार वर्गासाठी असलेले शिक्षण बंद केले आणि एकाच पध्दतीची शाळा सुरू केली - सरकारी शाळा (४) सर्वच शिक्षण मोफत देण्याची सोय केली. (५) मातृभाषेतून शिकवलं जावं असं जाहीर केलं. (६) शिक्षणाची एकच पध्दत अंमलात आणली. रशियन शासन ३२०० कोटीपेक्षा अधिक रुबल्स दरसाल शिक्षणावर खर्च करते. हा खर्च संरक्षणावर होणाऱ्या खर्चाच्या दुप्पटीपेक्षा जास्त आहे.

याउलट इथे भारतात मराठी चौथीपर्यंत शिक्षण सक्तीचे केले आहे. तरी ग्रामीण भागात जुन्या पध्दतीच्या शेतीव्यवसायामुळे गळतीचे प्रमाण अधिक आहे. शिवाय मिळावा तसा प्रतिसादही मिळत नाही.

भारतातही कोठल्याही शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतांना राष्ट्रीय वा सामाजिक बंधन नाही. कांही विदेशी विद्यार्थीही इथे विविध अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत. सर्वांना सारखेच शिक्षण दिले जाते. कांही संस्था खाजगी आहेत पण सरकार त्यांना अनुदान देते. काही खाजगी संस्था इथे नवीन आहेत. त्यांना अनुदान दिले जात नव्हते. पण संस्थेचे व्यवस्थापन, मॅट्रीकचा निकाल इ.पाहून अनुदान देणं सरकारने जाहीर केले आहे.

सर्व शिक्षण मोफत नाही. विशिष्ट शाखेचा अभ्यास करायचा तर शासकीय संस्थेत मेरिटचा प्रश्न येतो. शिवाय गरीबाने वशिला कोणाचा आणायचा? नि खाजगी

संस्थेत प्रवेश घ्यायचा तर हजारांच्या रक्कमेने डोनेशन कुठून मिळवून भरायचे? गुणवत्ता असून, पात्रता असून सुध्दा गरीब विद्यार्थ्यांला आपल्या इच्छेप्रमाणे विशिष्ठ शाखेचा अभ्यास करता येत नाही. सध्यातर पुण्यासारख्या शहरांत मुलाला एखाद्या विशिष्ठ बालवाडीत घालायचे तर दोन हजार डोनेशन दिल्याशिवाय प्रवेश नाही.

उच्चशिक्षण किंवा पदवी परीक्षेसाठी असणारे शिक्षण इंग्रजीतूनच दिले जाते. तसेच विशिष्ट शाखेचा अभ्यास करायचा असेल तर तो इंग्रजीतूनच करावा लागतो उदा. वैद्यकिय शाखा, तांत्रिक शाखा (इंजिनिअरिंग) इ.

भारतात शिक्षणापेक्षा संरक्षणावर अधिक खर्च करावा लागत आहे. विविध सीमाप्रश्न व शेजारी राष्ट्रांचे अतिक्रमणाचे वागणे, त्यामुळे संरक्षणावर खर्च करणे आवश्यक व गरजेचेच आहे नि त्याप्रमाणे केला जात आहे.

रशियन स्त्रिया विविध क्षेत्रात नोकरी करतात. अशा स्त्रियासाठी शासनाने बऱ्याच सोई केलेल्या आहेत. बाळंतपणाची रजा पूर्णपगारी चार महिनेपर्यंत मिळते. जर मातेला आपल्या लेकराजवळ रहायचे असेल तर ती एक वर्षभरसुध्दा राहू शकते. तिचा नोकरीवर हक्क असून तिला कांही थोडा पगारही मिळतो. एक वर्षानंतर बाळाला शिशुगृहात ठेवावे लागते. शिशुगृह नुसते नसते, तर ते शाळेच्या पूर्वीची किंवा अगोदरची शाळाच असते. जिल्हा पूर्व प्राथमिक शाळा म्हणता येईल.

या शिशुगृहात तीन वर्षापर्यंत मुलाला ठेवता येते. आपल्या मुलासाठी पालक फक्त वीस टक्के खर्च करतात, तर सरकार ऐंशी टक्के खर्च करते. प्रत्येक मुलासाठी पाचशे रुबल्स खर्च केला जातो. शिशुगृहात काम करणारी माणसेही प्रशिक्षित असतात. तिथं एक डॉक्टर, एक शिक्षक व इतर मदतनीस अशा तऱ्हेचा संच काम करत असतो. दिवसाचा कार्यक्रम व खाण्याचे वेळापत्रक शास्त्रीय पध्दतीने तयार केलेले असते. सर्व साहित्य व सर्व परिसर स्वच्छ राखण्याची खबरदारी घेतात. शारीरिक वाढीबरोबर बौध्दिक वाढीकडेही लक्ष पुरविले जाते. लहान मुलांचे बिछाने म्हणजेच आंथरुण, पांघरुण छोटे छोटे असते.

या गृहात चार महिने ते एक वर्ष, एक वर्ष ते दोन वर्षे ते तीन वर्षे असे विभाग केलेले असतात. प्रत्येक गटाचे निरनिराळे कार्य सुरु असते.

नोकरी करणारे स्त्रीपुरुष आपल्या मुलांना इथे आणून सोडतात व संध्याकाळी

घेवून जातात. कांही ठिकाणी पाच दिवस रहाण्याची सोय असते. दोन दिवस मुले घरी रहाण्यास जातात. इथे मुले आचार-विचार, शिस्त-स्वावलंबन इ. शिकतात. त्यांना एकमेकांबद्दल आत्मीयता वाटते. तीन वर्षानंतर मुलांना बालक मंदीरात घालतात. शिशुगृहामधील व्यवस्थेप्रमाणेच इथे व्यवस्था असते.

शिवाय एक संगीत शिक्षक, एक कलाशिक्षक व एक स्वयंपाकीही असतो. मुलांना तीनदा जेवण दिले जाते. इथे नि या वयातच मुले स्वावलंबन शिकतात. दात घासणे, बुट स्वच्छ ठेवणे, जेवणे, कपडे ठेवणे अगर घालणे इ. कामे करतात तसेच मातृभाषेतून बोलणे, उत्तरे देणे, वाचणे, प्रश्नांची उत्तरे देणे इ. शिकतात. या सर्वाबरोबरच नृत्य करणे, चित्रे काढणे, मातीची खेळणी करणे, शिवणकाम करणे इ. शिकतात. इथे खेळ, व्यायाम याला अधिक महत्व आहे. प्रत्येक गटाला क्रिडांगणाचा एक एक भाग दिला जातो. तिथे छोटी छोटी मुले खेळत असतात. दरवर्षी शिशुगृहे व बालकमंदीरे यांची संख्या वाढत आहे. ग्रामीण भागातही अशी शिशुगृहे बालकमंदीरे आहेत.

बालकमंदीरानंतर मुल प्राथमिक शाळेत जायला लागते. प्राथमिक शाळेपासून ते विश्वविद्यालयातील सर्व शिक्षण मोफत दिले जाते. पुस्तकेही मोफत दिली जातात. १९७७ सालापासून इ.१० वी पर्यंतचे शिक्षण सक्तीचे केले आहे. मुलाला पाचव्या वर्षी शाळेत घातले जाते. पहिली ते तिसरीपर्यंत पूर्व प्राथमिक शाळा असते. बालकमंदीरानंतर मुल या शाळेत जाते. प्रथम हे पहिली ते तिसरीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर, चौथीपासून आठवीपर्यंत सर्वांना एक प्रकारचेच शिक्षण. ज्याला साधारण शिक्षण म्हटलं जातं ते देतात. यालाच अपूर्ण माध्यमिक शिक्षण असे म्हटले जाते. आठवीनंतर म्हणजे विद्यार्थी साधारणपणे पंधरा वर्षाचा झाल्यावर त्याच्या इच्छेप्रमाणे तो शिक्षण विभाग निवडू शकतो. आठवीनंतर विविध तीन प्रकारच्या शाळांची सोय आहे. (१) सर्वसाधारण शाळा (२) व्यावसायिक शाळा (३) विशेषीकृत माध्यमिक शाळा ह्या होत. अधिक विद्यार्थी सर्वसाधारण शाळांकडेच धाव घेतात. पण राष्ट्राला उद्योगधंद्यात, शेतीक्षेत्रात कुशल व तज्ञ लोकांची गरज आहे. म्हणून अशा शाळांत विद्यार्थ्यांनी अधिकात अधिक प्रवेश घ्यावा याकरिता त्यांना पुष्कळच सवलती दिल्या आहेत. जेवण, गणवेश, पुस्तके इ. सर्व विनामुल्य देण्याची सोय केली आहे.

विशेषीकृत शाळामध्ये तेराशे विविध व्यवसाय शिकविले जातात यांत

औद्योगिक, बांधकाम, वहातूक, शेती, आर्थिक, वैद्यकीय, संगीत, कला, नौकानयन, नाट्य व परकीय भाषा इत्यादिंचे शिक्षण दिले जाते.

सोविएत रशियात सर्वत्र एकाच प्रकारची शिक्षणपध्दती आहे. चौदा प्रजासत्ताक राज्यात मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. तरी राष्ट्रभाषा म्हणून रशियन भाषेस आगळे महत्व प्राप्त झाले. दोन तृतीयांशपेक्षा अधिक लोक रशियन भाषा बोलतात. आपल्याकडील हिंदी प्रमाणे, रशियन भाषा - दुसरी भाषा म्हणून शिकवतात.

उच्चशिक्षण घ्यायचे असेल तर अगोदर प्रवेश परीक्षा घेतात. या परीक्षेचे गुण व दहावी पास झाल्याचे गुण यांची बेरीज करुन प्रवेश देतात.

सोविएत युनिटमध्ये एकूण ६७ विश्वविद्यालये आहेत. तसेच संशोधन केंद्रही आहेत. त्यांत नैसर्गिकशास्त्रे व वाङ्मयाचा अभ्यास केला जातो. विद्यार्थ्यांना होस्टेल फ्री असून दरमहा साठ रुबल्स स्टायपेंड दिला जातो.

आशिया, आफ्रिका, लॅटीन, अमेरिका इ. देशातील विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी 'लुमुप्वा विश्वविद्यालय' स्थापन केले आहे. येथे देशी-विदेशी हजारो विद्यार्थी शिकत आहेत.

शालेय वर्ष सप्टेंबर पासून सुरू होते. नोव्हेंबरमध्ये पाच दिवस व डिसेंबर व जानेवारीमध्ये बारा दिवस, मार्चमध्ये वसंतऋतुमध्ये सात दिवस व जून, जुलै, ऑगस्टमध्ये दीर्घकालीन नव्वद दिवसांची सुट्टी त्यांना दिली जाते. विद्यार्थी सुट्टीत शिबीरे किंवा आरोग्यधामाचा फायदा घेतात. सरकार सर्व खर्च करते. अगदी थोडा खर्च आईवडिलांना करावा लागतो.

शिक्षण पूर्ण झाले रे झाले की नोकरी त्यांना शोधत येते. त्यामुळे तरुणवर्ग उत्साही व कामसू आहे. आपल्याकडे शिक्षण पूर्ण होवून काम करण्याची इच्छा व तयारी असूनही काम नाही, नोकरी नाही त्यामुळे तरुण मंडळी निराश व वैफल्यग्रस्त झाली आहेत. ही निराशा, वैफल्य विसरण्यासाठी व्यसनाधीन बनत आहेत. वास्तवापासून पळून मरणाला कवटाळत आहेत. अशिक्षित, अगणित बेकार आहेतच. पण सुशिक्षित बेकारांची फौजही काही कमी नाही, लाखोंच्या घरांत आहे. स्वतंत्र भारतात राज्यकर्ते निरक्षरता व बेकारी हटवण्यास असमर्थ झालेले आहेत.

वैद्यकीय सेवेच्या बाबतीत विचार करतांना सोविएत संघात वैद्यकीय व्यवसाय

हा खाजगी राहिलेला नाही. रशियन सरकारने सर्व सुत्रे स्वतःच्या हाती घेतली आहेत. त्यामुळे ही सेवा उत्तम व मोफत तिथे दिली जाते. रोगाला प्रतिबंध करणे हे या वैद्यकीय सेवेचे महत्वाचे लक्षण मानले जाते. दरवर्षी लाखो लोकांना आरोग्य केंद्रात तपासतात नि उपचार करतात. दरवर्षी चाळीस हजार डॉक्टर्स शिकून बाहेर पडतात. ही संख्या जगातील डॉक्टरांच्या संख्येच्या एक चतुर्थांश आहे. शारीरिक तपासणी सतत चालू असते. त्यामुळे आयुर्मान वाढले आहे. सरासरी सत्तर वर्षे इतके झाले आहे.

भारतात सरकारी दवाखाने आहेत पण त्यांत व्यवस्थितपणा नाही. डॉक्टर आहेत तर नर्सबाई नाहीत. दोन्ही आहेत तर औषधे नाहीत. अशीच अवस्था असते. खाजगी दवाखाने अनेक आहेत, म्हणतात 'ठेचेला दवाखाना' म्हणजे ठेच लागली की लगेच दवाखान्यात जायचे जवळच्या, इतके दवाखाने आहेत. पण या दवाखान्यांत पंधरापासून तीस रुपयापर्यंत केवळ केसपेपर करण्यासाठी फी घेतात. मग रक्त, लघवी, एक्स-रे अशा तपासणी होतात. लघवी तपासणी पंचवीस, रक्त तपासणी पंचवीस, फोटो पासष्ठ इ. तपासणी झाल्यानंतर रोगाचे निदान करुन औषधे लिहून दिली जातात. ती पेशंटने मेडिकल स्टोअरमधून विकत घ्यायची असतात. गरीबांना अशा दवाखान्यात जाण्यापेक्षा मरण बरे असे वाटू लागते.

सोविएत रशियात गरोदर स्त्रियांना कमी श्रमाचे काम देतात. बाळंतपणाअगोदर विश्रांतीसाठी छप्पन दिवस रजा देतात. तसेच बाळंतपणानंतर बाळ-बाळंतीणीची प्रकृती सुधारण्यासाठी छप्पन दिवसांची रजा देतात. म्हणजेच एकूण ११२ दिवस रजा दिली जाते. भारतात बाळंतपणासाठी एकूण नव्वद दिवसांची रजा देतात. नव्वद दिवसापेक्षा अधिक रजा हवी असल्यास अर्धपगारी दिली जाते. नोकरीवरील हक्क मात्र कायम असतो.

सोविएत रशियात ११२ दिवसांची रजा भोगून मातेस आपल्या लेकरासमवेतच रहायचे असेल तर सोळा महिने रहाता येते. या काळात तिचा नोकरीवरील हक्क कायम असतो. शिवाय थोडा पगारही दिला जातो. मुलेबाळे असणाऱ्या स्त्रियांना कामांत काही सवलत मिळते. तसेच ज्यांची लेकरे लहान आहेत अशा मातांना मुलांना पाजण्यासाठी सुट्टी मिळते. मुले देवून मातांनी राष्ट्राच्या संपत्तीत भर घातली

आहे असे मानून शासन त्यांना पारितोषिक देवून त्यांचा सन्मान करते. याउलट भारतात लोकसंख्या आधीच जास्त असल्यामुळे, कुटुंब नियोजनासारखे कायदे केले आहेत. अधिक मुले झाल्यास त्या पालकांना कुठल्याही सोई सवलती नाहीत मग पारितोषिके खूपच दूर!

**प्रदुषण नष्ट करा :** सोविएत रशियात औद्योगिक प्रगती झाली. कारखाने, गिरण्या वाढल्या. त्यामुळे प्रदुषण वाढणे साहजिकच आहे पण नाही! रशियन सरकारने प्रदुषण हटविण्याचा चंगच बांधला आहे. प्रत्येक व्यक्तीस वीस चौरस मीटर हिरवळीची जागा येईल इकडे लक्ष पुरविले गेले आहे. ही वीस चौरस मीटरची मर्यादा पंचवीस चौरस मीटर करण्याचा सरकारचा प्रयत्न सुरु आहे. हवेत किती प्रदुषण आहे हे वारंवार तपासून ते कमी करण्यासाठी त्यावर लगेच उपाय केले जातात. वाहनांत द्रवरुप गॅस वापरतात. कारखाने, गिरण्या, रस्ते रहाण्याच्या ठिकाणाहून लांब आहेत. त्यामुळे प्रदुषणाचा धोका कमी झाला आहे.

भारतातील मोठ्या शहरात गिरण्या, कारखाने आहेत पण प्रदुषण हटविण्यासाठी तशी कांही खास योजना अगर यंत्रणा नाही असेच म्हणावे लागते. नि सध्या ग्रामीण भागही अशा प्रदुषणातून सुटत नाही. कारण खेडोपाडीही, जिथे जागा मुबलक आहे तिथे लहान-मोठे उद्योगधंदे व्यापारी व श्रीमंत उभारत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातही प्रदुषणाचा धोका निर्माण झाला आहे.

सोविएत रशियात सरकारी व सामुदायिक शेती योजना आहे. रशियाच्या सर्व घटक राज्यात सहकारी व सामुदायिक शेती केली जाते. २६ ऑक्टोबर १९१७ रोजी सोविएत सरकारने शेती संबंधी हुकूम जाहीर केला. तो हुकूम असा होता की, ''जे लोक स्वतःच्या श्रमाने जमीन नांगरतात, त्यांच्या मालकीची जमीन असेल.'' लेनिनच्या जमीन विषयक या हुकूमामुळे जमीनदारांची जमीन त्यांच्याकडून घेवून कसणाऱ्या शेतकऱ्यांना वाटून दिली आणि त्यावरील शेतसाराही माफ केला. शेतकऱ्यांना जमीन मिळाली म्हणून तो खूष झाला, नि तो अधिक राबू लागला, श्रम करु लागला तरी उत्पन्न काही वाढत नव्हते. घोडा व जुना लाकडी नांगर यांच्या मदतीने तो शेताची मेहनत करत होता, पण त्याला पुरण्या इतकेही धान्य पिकत नव्हते. शहरांत व कारखान्यात काम करणाऱ्यांना धान्य कोठून पाठवायचे? मग सोविएत सरकारने

शेतकऱ्यांचे मन वळवून, त्यांना समजावून सांगून सामुदायिक शेतीची योजना अंमलात आणली. लोकांना ही योजना पटली नि त्यांनी सामुदायिक शेती करण्यास सुरुवात केली. तसेच जमीनदारांच्या शेकडो हेक्टर जमीनी सरकारने ताब्यात घेवून तेथे सरकारी शेती केली. दुसऱ्या महायुध्दात सरकारी व सामुदायिक शेतीवरील कष्टकरी शेतकरी लढाईवर गेला. त्यामुळे दोन्ही शेती उध्वस्त झाल्या. युध्द संपले. शेतकरी पुन्हा शेती करु लागले. त्यांनीच सामुदायिक शेतीची सरकारी शेती बनवली नि तीच अधिक फायदेशीर झाली. सामुदायिक शेतीतून जे धान्य येते ते शेती उत्पादन स्थिर पुरवठ्याच्या योजनेनुसार आणि नक्की केलेल्या किंमतीनुसार सरकारलाच विकतात.

खेडेगावात व उपनगरात रहाणाऱ्या कामगारांना व कचेरीतील नोकरांना तसेच सामुदायिक शेतीवरील सभासदांना जमीनीचे लहान भाग दिलेत. त्यावर त्यांनी आपल्या इच्छेप्रमाणे उत्पन्न काढावे. त्या जागेवर लोक डुकरे, मेंढ्या, कोंबड्या, बदके इ. पाळतात. भाजीपाला पिकवतात. गरजेपेक्षा अधिक वा काही भाग शहरात बाजारात अथवा खरेदी विक्री संघात विकतात. नव्यान्नव टक्के धान्य मात्र सामुदायिक व सरकारी शेतीतूनच मिळते.

सामुदायिक शेती व सरकारी शेती यंत्रानेच करावी लागू लागली त्यामुळे मानवी श्रम वाचले नि उत्पन्नही वाढले. तेथील निवडलेले मंडळ प्रत्येकाच्या कामाप्रमाणे वेतन अथवा धान्य वाटून देते. हे धान्य मात्र वर्षाअखेरीस मिळे. नंतरच्या काळात धान्य देणे बंद करुन राबणाऱ्या शेतकऱ्यास कामगाराप्रमाणे पगारच देवू लागलेत. तसेच स्त्री कामगारासाठी त्यांच्या मुलासाठी शिशुगृहे व बालगृहे सामुदायिक शेताच्या खर्चाने चालविली आहेत.

गाव किंवा खेडेगाव असले तरी सर्व खर्च सामुदायिक शेतातून केला जातो. तिथे शिशुगृह असतेच, अद्ययावत शाळा असतात. एक सांस्कृतिक केंद्र, वाचनालय नि म्युझियम असते. अपना बझारसारखे मार्केट असते. अगदी सर्वसामान्य शेतकऱ्यांचे घर पहाता त्या घरात चार खोल्या असतातच. ही घरे सामुदायिक शेताकडून मिळालेली असतात. वीज, गरम पाणी इ. सोई त्या घरात असतात. शहरांत व खेड्यात फारशी तफावत राहिलेली नाही. शहरी लोकांना ज्या सुखसोई आहेत. त्या सर्व खेडेगावातील लोकांना देण्याचा प्रयत्न केला आहे. माणसाच्या दुप्पट धान्य जनावरांना लागते.

आणि ते सर्व बाहेरुन आणावे लागते. तसे पाहिले तर मांस, दूध, अंडी इत्यादीचे उत्पन्न वाढले आहे.

**उद्योगधंदे :** क्रांतीनंतर सोविएत रशियाने उद्योधद्यांत कमालीची वाढ केली आहे. जगाच्या औद्योगिक उत्पादनापैकी २० टक्के उत्पादन सोविएत रशियात होते. उद्योगधंदे जनतेच्या मालकीचे आहेत. इथ खाजगी, नफा मिळवणारा कारखानदार वर्ग अजिबात नाही. हेच तर इथल्या वाढत्या उद्योगधंद्याचे रहस्य आहे, खास वैशिष्ट आहे.

एका राष्ट्रीय योजनेखाली सर्व उद्योग चालू असतात. उद्योगधंद्यांचे उद्दिष्ट फायदा नसून जनतेच्या गरजा पूर्ण करणे हे असते. त्यामुळे उद्योगधंद्याचा प्रत्येक विभाग दुसऱ्या उद्योगधंद्यास मदत करणारा असतो. 'प्रावदा' इथले मुख्य वर्तमानपत्र आहे. ह्या वर्तमानपत्राने ऑक्टोबर क्रांतीच्या तेराव्या वाढदिवशी म्हणजेच ७ नोव्हेंबर १९३० रोजी प्रसिध्द केले की, ''कामगार-किसानांच्या सहाय्याने सरकारने बेकारीचे समूळ उच्चाटन केले आहे.'' यावरुन तेथील उद्योगधंद्यांची कल्पना येते.

**औद्योगिकीकरण :** सन १९१७ च्या क्रांतीनंतर सोविएत सरकारने उत्पादनाची सर्व साधने समाजाच्या मालकीची केली आहेत. कामगारच उद्योगधंद्याचे मालक बनले आहेत. कामाचे आठ तास केले आहेत. युध्दामुळे व नैसर्गिक अडचणीमुळे औद्योगिक विकासास थोडा म्हटले तरी एक तपाचा अवधी लागला. कारखाने तांत्रिकदृष्ट्या मागासलेले राहिले. इतर राष्ट्राकडून मदतीची अपेक्षा करणे वेडेपणाचे होते. मग उद्योगधंदे, वाहतूक व देशातील नि परदेशातील व्यापार यातून मिळणाऱ्या नफ्यातून स्वावलंबनाने जड उद्योगधंदे ठरविले व त्याप्रमाणे केलेही, अंतर्गत कर्जे उभारली. लोकांनी चांगला प्रतिसाद दिला. अशातऱ्हेने पहिली व दुसरी पंचवार्षिक योजना यशस्वीपणे राबविली. दुसऱ्या महायुध्दातील नुकसान भरुन काढले. औद्योगिक क्षेत्रात विकासाची घोडदौड करुन आघाडी पटकावली.

सोविएत संघ राज्यात खनिज पदार्थांचेही उत्पादन होते. तेलही येथे उपलब्ध आहे. जगाच्या एकूण कोळश्याच्या एक चतुर्थांश कोळसा येथे मिळतो. मेकॅनिकल इंजिनियरींगमध्येही नेत्रदिपक कामगिरी केली आहे. अवकाशयान व रॉकेट तंत्रज्ञान, अणुशक्ती केंद्राची उपकरणे, मायक्रोइलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक व बोअरिंग इ.उपकरणे

बनविण्यात व त्यात प्रगती करण्यात रशिया अग्रेसर आहे. सोविएत रशियाने १९५० मध्ये जगातील पहिले अणुशक्तीकेंद्र सुरु केले. याची नोंद प्रतिस्पर्ध्यांना सुध्दा घ्यायला हवी आहे. तसेच १९५७ मध्ये मानवनिर्मित पहिला उपग्रह सोडून जगाला आश्चर्यचकीत केले आहे. शेतकामासाठी लागणारी सर्व यंत्र, वीज व डिझेलवर चालणारी सर्व इंजिने व यंत्रसामुग्री सोविएत रशिया मोठ्या प्रमाणावर बनवत आहे.

रशियात यंत्रमानवाचा उपयोगही उत्पादनात करुन घेत आहेत. कामगार अपुरे पडतात म्हणून यंत्रमानवास कामास लावतात. भांडवली देशात यंत्रमानवामुळे बेकारी वाढते. उलट येथे उत्पादन वाढते. असे शेकडो यंत्रमानव रोबो येथे आहेत. इंधनासाठी येथे वीजनिर्मितीची अनेक केंद्रे आहेत.

रासायनिक उद्योगधंद्यात सोविएतचा जगात दुसरा क्रमांक आहे. जीवनोपयोगी वस्तूंचेही शेकडो कारखाने आहेत. कपडे, चप्पलजोड, टी.व्ही., टेपरेकॉर्डर, फ्रीज यांचे त्यात उत्पादन करतात.

हा देश अन्नधान्यांच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे. इथून इतरत्र अन्नधान्य पाठविले जाते. स्वयंचलित बेकरीज्, डेअरीज् व साखर कारखाने आहेत. तसेच फळे व भाज्या पॅकबंद करण्याचेही कारखाने आहेत.

**लोकांची कमाई व त्यांचे राहणीमान :** पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या वेळीच औद्योगिकरण केले व राज्यघटनेतही लिहिले की, ''प्रत्येकास काम करण्याचा हक्क आहे.'' रशियन सरकारने १९३० मध्ये बेकारी कायमची नष्ट केली. तेव्हापासून प्रत्येक व्यक्तीस काम मिळणे शक्य झाले आहे.

प्रत्येकास काम असेल त्याप्रमाणांत दाम दिला जातो. काम देतांना स्त्री, पुरुष, वय किंवा राष्ट्रीयत्व यापैकी कांहीही पाहिले जात नाही. सामान्य कामगारापेक्षा कुशल कामगारास अधिक वेतन मिळते. तसेच जे अधिक श्रम करतात व जे अवघड जागी काम करतात त्यांना वेतन अधिक मिळते. तरी सुध्दा ह्या अधिक वेतनालाही मर्यादा आहेतच. सोविएत रशियात कमीत कमी पगार ८० रुबल्स इतका मिळतो. तज्ञ, कुशल तंत्रज्ञास ५०० रुबल्स दिला जातो. ८० ते ५०० म्हणजे कमाईत तफावत आलीच. ही तफावत कमी करण्यासाठी सामाजिक विनियोग निधी स्थापन केला आहे. यात किती व कसले काम करतो हे न पहाता त्याचे वेतन पाहून त्यांना सर्व सोई

उपलब्ध करुन दिल्या जातात. थोडक्यात असे म्हणता येईल की, सर्वांना समान सोई कशा प्राप्त होतील हे पाहिले जाते. साधारणपणे चारजण असणाऱ्या कुटुंबाला या निधीतून २००० रुबल्स मिळतात.

सरकार मांस, दूध इ. खरेदी करते व निम्म्या किंमतीस जनतेस विकते. जीवनावश्यक वस्तू कमी व स्थिर किंमतीत विकल्या जातात. मुलांना लागणाऱ्या वस्तूंच्या किंमती कमी आहेत. उत्पादनाचा खर्च कमी आला असेल तर किंमती कमी असतात. रशियात न होणाऱ्या वस्तूंच्या किंमती महाग असतात.

इथे आठवड्याचे कामाचे तास ४०.६ असून शनिवार-रविवार सुट्टी असते. खाणकाम करणाऱ्यांना आठवडा ३५.५ तासांचा असतो. सुट्टीच्या दिवशीही काम केले तर दुप्पट पगार दिला जातो. सोळा वर्षापर्यंतच्या किशोरांना काम करण्यास कायद्याने बंदी आहे. भारतातही अशी कायद्याने बंदी आहे, पण ती कागदावरच आहे. देशात आज हजारो बालकामगार आहेत. रशियात पुरुष कामगार वयाच्या ६० व्या वर्षी व स्त्री कामगार ५५ व्या वर्षी सेवेतून मुक्त होतात. पेन्शन पगाराच्या ६० ते ७० टक्के मिळते तरी त्याला कमाल मर्यादा १२० रुबल्स असते. पण काहीजणांना १२० ते १५० रुबल्स पेन्शन मिळू शकते. सेवानिवृत्तीनंतरही जे काम करतात त्यांना पगार व पेन्शन दोन्ही मिळते. पण त्यास एक ठराविक मर्यादा असतेच.

**कुटुंब व्यवस्था :** आपल्यासारखीच रशियांत ही कुटूंब व्यवस्था आहे. लग्नाअगोदर मुले आपल्या मात्यापित्याबरोबर रहातात, लग्नानंतर मात्र ती विभक्त रहातात, पण त्यांचे आपापसातील संबंध जिव्हाळ्याचे असतात. आजी-आजोबा मायेने नातवंडांना सांभाळतात. नोकरीहून परतताना मुलगा व सून आपल्या मुलांना घेवून घरी जातात. कुटूंबातील तरुण मुलं आईला अधिक मानतात. पगाराचे पैसे आईकडेच देतात, तसेच विचार विनिमयाने खर्च करतात. ग्रामीण भागात कुटूंबप्रमुख वडील असतात, तर शहरी भागात कुटूंबप्रमुख आई असते. ती घरकाम करते. मुलांचा अभ्यास घेते. बाजारहाट करते. कुटूंबातील सर्वजण नोकरी, शाळा निमित्याने सकाळी जातात व रात्री परत येतात. सर्वजण आपल्या आवडीप्रमाणे वेळ व्यतीत करतात. सोविएत नागरिकास वाचून ज्ञानसंवर्धन करणे आवडते. कुटूंबात पतिपत्नीचा हक्क समान असतो. नागरिक विवाह नोंदवत नाहीत. मात्र तरुण पिढी विवाह नोंद

करतात. विवाह करतांना मुलीचे वय १९ ते २१ व मुलाचे वय २३ ते २५ वर्षे असले पाहिजे. लग्न समारंभास शे-दोनशे माणसे हजर असतात.

घरचे सर्व काम स्त्रियाच करत असतात. ज्या स्त्रीला जेवण करता येत नाही, घरची इतर कामं येत नाहीत तिला सोडचिठ्ठी घटस्फोट देतात. पण हे प्रमाण कमी आहे. सोडचिठ्ठीचा प्रश्न उद्‌भवू नये म्हणून मुलींना शाळेत गृहशास्त्र शिकवत आहेत.

**रशिया व शांतता :** युध्दाचा शेवट झाला नि १९१७ च्या क्रांतीच्या दुसऱ्याच दिवशी रशियाने शांततेचा कायदा केला. परराष्ट्र धोरण शांततेचे, सुरक्षिततेचे व न्यायाचे असावे. राष्ट्राराष्ट्रांत सहकार्याची भावना वाढीस लागावी.

शांतता स्थिर करावी, निःशस्त्रीकरण करावे, यापुढे कधीच जागतिक युध्द होवू न द्यावे यासाठी सोविएत संघराज्य सतत प्रयत्नशील आहे. सोविएत रशियाने कुठलेही बाँब अगोदर बनविलेले नाहीत. पण प्रतिस्पर्ध्यांनी जेव्हा अणुबाँब, हायड्रोजन बाँब व न्युट्रॉन बाँब बनविले तेव्हा रशियास बाँम्ब बनविणे भाग पडले. जागतिक पातळीवर निःशस्त्रीकरणाचा ठराव मांडत असतानाच सोविएत रशियाने आपला संरक्षण खर्च कमी करत आणला आहे.

सोविएत रशियाने जाहीर केले की, जगातील शांतताप्रेमी देश व सोविएत संघराज्य हे नेहमीच एका बाजूस असतील आणि त्यांचा शस्त्रस्पर्धेविरुध्द लढा असेल असे हे मानवतावादी उदात्त धोरण रशियाचे आहे. शस्त्रस्पर्धेला आळा घालण्यात आला तर जगातील आर्थिक, सामाजिक किंवा तंत्रशास्त्रीय प्रश्न सोडविण्यास साधन सामुग्री उपलब्ध होईल. एखादी विमानवाहू युध्दनौका किंवा पाणबुडी बांधायला अतोनात खर्च येतो. अशाप्रकारे लष्करावर व शस्त्रावर खर्च न करता जागतिक आरोग्य संघटना, निरक्षरता निर्मुलन योजनावर खर्च करावेत. जगात १० लक्षपेक्षा अधिक लोक उपासमारीने तडफडत आहेत. त्यांची उपासमार दूर करावी, त्यासाठी पैसे खर्च करावेत असे सोविएत रशियाचे म्हणणे आहे.

यावरून स्पष्ट होते की जागतिक युध्दाचा धोका कायमपणे टाळणे, शस्त्रस्पर्धा नष्ट करणे असे रशियाचे ध्येय आहे. तसेच आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान पूर्णपणे मानवाच्या सेवेसाठी वापरणे, भल्यासाठी वापरणे असा सोविएटचा निर्धार आहे. हा

निर्धार यशस्वी होवो.

अशा तऱ्हेने सोविएट रशिया पहाण्याचे स्वप्न साकारलं. प्रत्यक्षात उतरलं. जीवाला कृतकृत्य वाटलं. भरल्या अंतःकरणाने व तृप्त मनाने सोविएट संघराज्याचा निरोप घेवून विमानात पाय ठेवला. हुरहूरत मन विचारत होतं, 'आता कधी येणे गं?' भारताकडे ओढ घेणाऱ्या मनाने उत्तर दिलं, 'आता पुन्हा येणं नाही.' खरंच! मी पुन्हा या देशी कशी नि कशाला येणार? हा निरोप पहिला, तसाच शेवटचाही आहे.

ठरलेल्या कालावधीनंतर भारतात पोहचले नि लेक जशी माहेरी येते व आसुसल्या भावनेने आईच्या गळा पडते तसेच काहीसे माझे झाले. रशिया आपला मित्र–देश, बंधु–देश आहे. पण भारताची सर जगातल्या कोणत्याही दुसऱ्या देशाला नाही. भारताच्या पूर्वेस बंगालचा उपसागर खळाळत आपलं अस्तित्व दर्शवित आहे. पश्चिमेला अरबी समुद्र रात्रंदिवस भारताच्या किनाऱ्यावर जागता पहारा करत आहे. दक्षिणेला हिंदी महासागर भारताचे चरण कमल अहोरात्र प्रक्षाळून भारताला शूचिर्भूत बनवित असतो. उत्तरेला सीमारक्षण करणारा हिमालय जगप्रसिध्द आहे त्याची बर्फाच्छादित शिखरे एकापेक्षा एक उंच असून आपल्या धवल कांतीने झळाळत असतात. अशा या नैसर्गिक सीमारक्षणाने भारत एखाद्या सम्राटाच्या रुबाबात मध्ये विराजमान आहे. या हिमालयात उगम पावणाऱ्या छोट्या, मोठ्या नद्या नावाप्रमाणे जीवनदायिनी आहेत. गंगेचे पावित्र्य, गीतेतील स्थितप्रज्ञतेचे विचार नि हिमालयातले मनोहर व गंभीर सृष्टिसौंदर्य फक्त इथंच आहे. निसर्गाने तर दोन्ही हाताने भरभरुन आपल्या वैभवाचे दान केले आहे. मैलोगणती सुपीक जमीनी आहेत, पर्वत, डोंगर, दऱ्याही आहेत. वाळवंटे आहेत. घनदाट जंगलेही आहेत. जिथं सूर्यप्रकाश भूमीला स्पर्शण्याचा प्रयत्न करतोय, पण तिथं जंगलाची घनदाटता हटवादीपणाने स्पर्शू देत नाही. चेरापुंजीसारख्या ठिकाणी पाऊस सुपाने पडतोय तर राजस्थानमध्ये पावसाच्या थेंबासाठी चातकासारखी प्रतिक्षा करावी लागते. असे असतांना सर्व प्रकारचे धनधान्य, मसाल्याचे पदार्थ, वृक्ष वेली, फुले, फळे इथे निर्माण होतात. फणस, नारळ इ. फळे नि आंबा तर फळांचा राजा इथेच होतो. तसेच अनेक पशुपक्षी इथे आहेत. पक्षांचा राजा मोर भारताचा राष्ट्रीय पक्षी फक्त भारतातच दिसतो. त्याच्या पिसाऱ्याचे सौंदर्य शब्दातीत आहे. मोरपीस कोणाला आवडत नाही!

भारत देश विशाल आहे. या खंडप्राय देशात अनेक जाती धर्मांचे लोक रहातात. त्यांच्या भाषा वेगळ्या आहेत, तसेच पेहरावही विभिन्न आहेत तरी ते सर्व भारतीयच आहेत. भारताच्या प्रत्येक धुलीकरणात सूर्यवंशी राज्यांच्या पराक्रमाच्या यशोगाथा दडलेल्या आहेत. आदर्श राजा, आदर्श पुत्र, आदर्श पति, आदर्श बंधु नि एकवचनी, एकपत्नि, एकबाणी अशा प्रभू रामचंद्राची ही जन्मभूमी आहे.

महावीर, गौतम बुध्द, गुरु नानक इ. धर्मसंस्थापक इथलेच आहेत. ऋषीमुनींनी वेदाभ्यास करून चौसष्ट कला व अठरा विद्या जतन केल्या. सम्राट अशोक, चंद्रगुप्तसारखे राजधुरंधर इथे झालेत की, ज्यांच्या राज्यात सोन्याचा धूर निघत होता. ज्यांनी अत्तराचे दिवे जाळले होते. शालिवाहन राजा, शिवाजी महाराज, राणा प्रताप स्वाभिमानी, स्वराज्य संस्थापक, स्वराज्य रक्षक होते. शालिवाहन व शिवाजी महाराज हे शककर्ते राजे झाले.

चांदबिबी, राणी लक्ष्मीबाई झाशीवाली, राणी चन्नम्मा यांनी येथेच पराक्रम गाजवला आहे. संत एकनाथ, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, मीराबाई यांनी समाजाला उपदेश केला. स्वामी परमहंस, स्वामी विवेकानंद, गुरूदेव टागोर इ. नी ही भूमी उज्ज्वल बनविली. ईश्वरचंद्र विद्यासागर, जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्यागाची व सेवेची शिकवण दिली.

अगदी आजच्या युगात पाहिलं तरी एकापेक्षा एक राजकारण धुरंधर शास्त्रज्ञ, साहित्यिक, वैद्यानिक आहेत. अंतराळवीर आहेत. राकेश शर्मा व रवी मल्होत्रांनी अंतराळात उड्डाण केले. कै. इंदिरा गांधीनी विचारले, ''भारत दिसतोय का? कसा दिसतोय?'' राकेश शर्माने उत्तर दिले, ''होय, सारे जहाँसे अच्छा'' केवढं समर्पक उत्तर आहे! सर्व जगापेक्षा सुंदर दिसतोय! खरंच! आम्ही भारतवांसी भाग्यवान आहोत. अहो! तिसऱ्या शतकात भारतामध्ये असलेल्या विदेशी प्रवाशाने भारताचा गुणगौरव केला होता नि विसाव्या शतकात आलेल्या परदेशी पाहुण्याने (प्रवाशाने) भारताबद्दल प्रशंसोद्‌गार काढले आहेत. भारत हे निसर्गाचे सर्वश्रेठ शिल्प आहे. भारत महान आहे पण भारतीयच आपल्या ओंगळ कृतींनी त्याला हीन बनवायला लागलेत, हीच मनाला खंत आहे.''

***

# * आभार *

१. भारती विद्यापीठ, पुणे
२. हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि., वाळवे
३. किसान शिक्षण संस्था, वाळवे
४. हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवे
५. हुतात्मा बझार लि., वाळवे
६. हुतात्मा दुध संघ लि., वाळवे
७. भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
८. श्री. पी.एन.पाटील नागरी सहकारी पतसंस्था, कोल्हापूर
९. तांबटकाका विद्यानिकेतन, कोल्हापूर
१०. डॉ.पतंगराव कदम फ़ाऊंडेशन, कोल्हापूर
११. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

दै. सकाळ, पुढारी, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, तरुण भारत, सत्यवादी, समाज, अग्रदुत, राष्ट्रशक्ती, प्रभात दर्शन, लोकमत, ऐक्य, सांगली आकाशवाणी, कोल्हापूर आकाशवाणी.


श्री. वसंतराव पंदारे
श्री. किरण नायकवडी
श्री. वैभवकाका नायकवडी
श्री. रामचंद्र पाटील
श्री. पंडितराव कंदले
सौ. वसुधा जयसिंगराव पवार
श्री. संदिप पाटील
श्री. दिनकर पाटील
श्री. राजेंद्र मगदूम
डॉ. बाबुराव गुरव
श्री. सरोवदे (सर)
कु. कीर्ती दि. पाटील

श्री. पी. जी. माने
श्री. अरुण नायकवडी
श्री. भारत पाटणकर
श्री. तानाजीराव निकम
श्री. जे. के. पवार
सौ. मनिषा पंडितराव कंदले
श्री. बाळासाहेब सरनोबत
सौ. शकुंतला दिनकर पाटील
श्री. दिलीप खोत
श्री. सारंग वसंतराव देशमुख
श्री. लोहार (चंदरमामा)
चि. अजिंक्य दि. पाटील

* * *



मॉस्को येथे रशियन क्रांतीनंतर कामगार व शेतकऱ्यांसह लेनिन



श्री. नागनाथअण्णा नायकवडी



सौ. कुसुमताई नायकवडी

क्रांतिवीर श्री. नागनाथअण्णा नायकवडी व सौ. कुसुमताई नायकवडी यांना समाजात अनन्य साधारण स्थान प्राप्त झाले आहे. समाजासाठी चंदनाप्रमाणे झटणाऱ्या या व्यक्ती आहेत. संघर्षमय जीवन जगत आहेत. क्रांतीच्या होमकुंडातील व्यक्तिमत्त्व क्रांतिवीर श्री. नागनाथअण्णा नायकवडी यांच्या विचाराला पूर्ण आकार देण्याचे काम सौ. कुसुमताई नायकवडी यांनी केले आहे. क्रांतिवीर श्री. नागनाथअण्णा नायकवडी या वादळाशी सौ. कुसुमताई नायकवडी ऊर्फ माई यांनी विवाह केला. आयुष्याच्या संध्याकाळी ५० वर्षाच्या सहवासात अनेक संकटांना तोंड दिले. वादळाशी यशस्वी संसार करुन समाजाचाही संसार केला, ही सन्माननीय गोष्ट आहे. भारतीय स्वातंत्र्याचा लढा, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, धरणग्रस्तांची संघटना, दलित आदिवासी ग्रामीण साहित्य संमेलन, राजकारण, सहकार, समाजकारण, शेतकरी व विद्यार्थी परिषद, पाणी परिषद, हुतात्मा साखर कारखान्याची स्थापना, मनुस्मृतीचे दहन, स्त्रीयांची संघटना, पुणे विद्यापीठाला छत्रपती शाहू महाराजांचे नांव देण्यासाठी चळवळ अशा एक ना अनेक लढ्यात क्रांतिवीर श्री. नागनाथ नायकवडी ऊर्फ अण्णा यांच्याबरोबर विचाराने व कृतीने ज्या माऊलीने सावलीप्रमाणे साथ दिली त्या सौ. कुसुमताई नागनाथ नायकवडी ऊर्फ माई होत. सावित्रीबाई फुले, कस्तुरबा गांधी, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, सुशिलाताई बापूजी साळुंखे, वेणुताई यशवंतराव चव्हाण यांच्या मालिकेत सौ. कुसुमताई नागनाथ नायकवडी यांचे स्थान आहे. साधी रहाणी व स्वावलंबी जीवन त्या जगत आहेत. सोव्हिएत रशिया दौऱ्यावरील प्रवास वर्णन 'इच्छापूर्ती' हे मराठी मुलखातील मराठी माणसांना सादर केलेले सुवर्णमहोत्सवी वर्षातील अक्षरलेणे मनाचा विरंगुळा आहे.

हुतात्मा प्रकाशन, वाळवा.